म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. 98836

IRBK-0118837

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ............ नों. दि. १९/५/९...
वि. ...नाटक..... क्र. ..................

# पु त्र का मे ष्टी

## अनिल बर्वे यांचे
## इतर प्रकाशित साहित्य

### कादंबरी

थँक यू मिस्टर ग्लाड
डोंगर म्हातारा झाला
स्टड फार्म
अकरा कोटी गॅलन पाणी

### नाटक

थँक यू मिस्टर ग्लाड
कोलंबस वाट चुकला
हमिदाबाईची कोठी

### इतर

रोखलेल्या बंदुका आणि उठलेली जनता
डु दाओ अन् चर्चबेल्स्

# पुत्रकामेष्टी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय विभाग.
दा. क्र. १८८३५ नों. दि १९५१५९
वि. ...नाटक..... क्र. ....................

अनिल बर्वे

IRBK-0118837
IRBK-0118837

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

पुत्रकामेष्टी
पॉप्युलर प्रकाशन
(म–४९५)

Putrakameshti
(Marathi play)
Anil Barve

© अनिल बर्वे

पहिली आवृत्ती
१९८०/१९०२

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
टिळक रोड, सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ४०००३४

या नाटकाच्या प्रयोगाचे सर्व हक्क लेखकाकडे आहेत. तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी लेखकाची लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.

पत्रव्यवहारासाठी पत्ता :
अनिल बर्वे
एकवीरा अपार्टमेंटस्
३६९, वीर सावरकर मार्ग
दादर, मुंबई ४०००२८

या नाटकाचा पहिला प्रयोग मंगळवार दि. ४ नोव्हेंबर १९८० या दिवशी डॉ. भालेराव सभागृह, साहित्य संघमंदिर, गिरगाव, मुंबई येथे नाट्यसंपदा, मुंबई या व्यावसायिक नाट्यसंस्थेने सादर केला.

## श्रेयनामावली

लेखक : अनिल बर्वे
दिग्दर्शक : कांती मडिया
नेपथ्य : छेल, परेश
गीतरचना : जगन्नाथ पसाले
पार्श्वसंगीत : पुरुषोत्तम उपाध्याय
स्वररचना : चंद्रचूड वासुदेव
पार्श्वगायिका : सीमा चंद्रगुप्त
ध्वनिमुद्रण : प्रदीप देशपांडे
प्रकाशयोजना : रवींद्र देसाई
रंगभूषा : राजा कराळे
वेशभूषा : राव टेलर्स, दादर

## पात्र परिचय

उर्मिला : सुधा करमरकर
राजा : अशोक समेळ
बी. के. : प्रभाकर पणशीकर
छंदिता : मधु कांबीकर
बुद्धी : कमलाबाई टिभे
बहादुर : हेमचंद्र देसाई
माळीणबाई : सरस्वतीबाई बोडस
मंत्री : हिरालाल जैन
वकील : नाना शिंदे
टोमॅटो : कुमार कोचे

# पुत्रकामेष्टी

म. ग्रं. ... वाचनालय शाखा.
दा. क्र. १८८३७ नों. दि १५.७.८१
वि. ....नाटक. क्र. ...................

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ पडदा उघडतो.

बी. के. इंडस्ट्रीजच्या मालकाच्या आलिशान बंगल्यातली सिटिंगरूम दिसू लागते. घराच्या डेकोरेशनमध्ये लहान मुलांचे फोटो, खेळणी यांची रेलचेल आहे. कापडाचे दोन मोठे बाहुले—चिमणराव आणि गुंड्याभाऊ—हसऱ्या चेहऱ्याने साईडबोर्डवर बसलेले आहेत. गुंड्याभाऊंचे धोतर निसटले आहे...

सकाळची वेळ.

कंपनीचा लीगल ॲडव्हायझर आणि बी. के. व त्याची बायको ऊर्मिला यांचा जवळचा मित्र 'राजा' पेपर चाळत बी. के. उठायची वाट पाहत बसला आहे. रेडिओवर सकाळची धून वाजत आहे... नि वरून घाईघाईने ऊर्मिला येते.

पस्तिशीच्या जवळ आली आहे, असे चेहऱ्यावरून दिसत नाही. ]

**ऊर्मिला :** अरे राजा... तू आज भल्या सकाळी, एकदम अर्ली मॉर्निंग ?

**राजा :** बी. के. च्या महत्त्वाच्या कागदावर सह्या घ्यायच्यात. संध्याकाळपर्यंत उठेल ना तो ?

**ऊर्मिला :** ( हसून ) निदान उठावा...
( वर पाहात ) अहो, बी. के. इंडस्ट्रीज उठा... पहिली शिफ्ट सुरू झाली... रोज रोज लेट मार्क नको. काय रे राजा... ( बोलता बोलता गुंड्याभाऊंचे माप घेत ) परवा आला नाहीस पार्टीला ?

**राजा :** कसा येणार ! नशिबात स्कॉच नाही. तिसऱ्यांदा हा प्रकार... तुम्हीच पार्टीला बोलवा नि तुमच्याच कामासाठी बाहेरगावी पाठवा...

**ऊर्मिला :** पुढल्या खेपेस असं नाही होणार.

**राजा :** बाय द वे, पार्टी कशासाठी होती ग ?

**ऊर्मिला :** सिंगापूर 'आशियाई रोज एक्झिबिशन'मध्ये, माझ्या गुलाबाला पहिलं बक्षिस मिळालं.

**राजा :** छान... आता पुढल्या वर्षी आफ्रिकेला वडाचं एक्झिबिशन आहे... त्यात

भाग घे. पैसे खर्च करायला बी. के. इंडस्ट्रीज आहेच.

**ऊर्मिला :** कर, टवाळी कर...तुझं पोरगं केवढं झालं रे ?

**राजा :** झालं की चार-पाच महिन्यांचं.

**ऊर्मिला :** ( खणातून बांबूचे खेळणे काढीत ) त्याच्यासाठी सिंगापूरहून सुंदर खेळणं आणलंय बघ...पाळण्यावर टांगून ठेव...त्याने सहज जरी दोरी ओढली ना की वाजायला लागेल. ( दोरी ओढते—पियानोचे सूर वाजू लागतात. ) फॉरेनमध्ये काय रे...अगदी खेळणीदेखील चाईल्ड सायकॉलॉजी स्टडी करून बनवतात.... बघ ना, एकदोनदा खेळणं चुकून जरी वाजलं...की मूल कुतूहलाने पुन्हा पुन्हा दोरी खेचायचा प्रयत्न करू लागतं. नॅचरली त्याच्या हाताला, चेस्टला व्यायाम होतो. एखादी वस्तू धरणं, खेचणं त्याला जमू लागतं...दुसरं म्हणजे त्याला नाद सूर कळू लागतात—

**राजा :** ( खेळणे हाताळत विचारपूर्वक ) उमा, स्वतःच्या चिक्कूपणावर चाईल्ड सायकॉलॉजीचं पांघरूण घालू नको...इंडस्ट्रियालिस्टची बायको—दोन पाच रुपयांचं खेळणं प्रेझेंट देते...

**ऊर्मिला :** मिस्टर, पस्तीस डॉलरचं खेळणंय्...

**राजा :** पस्तीस डॉलर ?

**ऊर्मिला :** सिंगापुरी डॉलर हं...अमेरिकन नाही.

**राजा :** तरी काय झालं ? शंभर सव्वाशे रुपये झालेच की !

**ऊर्मिला :** ( एकदम थबकून ) राजा, बोलता बोलता किंमत का काढून घेतलीस माझ्याकडनं ?

**राजा :** ( गडबडून ) सहज—जस्ट क्युरियॉसिटी.

**ऊर्मिला :** हलकट आणि क्षुद्र आहेस...उद्या तुझी बायको डिनरला येताना दोनशे रुपयांचं प्रेझेंट घेऊन येणार ! तिनं काही जरी आणलं...तरी एकदम बाहेरचा रस्ता....

**राजा :** एकदम गेट आऊट ?

**ऊर्मिला :** माझं घर म्हणजे काय हॉटेलय ? ... काही निमित्त, कारण नसताना जेवायला आलेला माणूस प्रेझेंट देऊन गेला ना ... की तो जेवणाचं बिल देऊन गेल्यासारखं वाटतं मला...

**राजा :** हे बघ उमा, आमच्याकडे वर्षातनं छप्पन्न कारणं, निमित्तं निघतात. कधी मोठ्या मुलाची मुंज, कधी धाकट्याचं बारसं, कधी मधलीचा वाढदिवस...दहा वर्षं झाली तुझ्या लग्नाला, अजून तू काही निमित्त काढलं नाहीस.

**ऊर्मिला :** ( उदास होऊन, पडल्या सुरात ) कशाला उगाच बी. के. इंडस्ट्रीजच्या कर्मचाऱ्यांना टॅक्सेशन ?

**राजा** : आम्ही स्वखुषीने टॅक्सेशन सहन करायला तयार आहोत ना. आणि, आम्ही तरी तुझ्या प्रेझेंटस्‌ची परतफेड कशी करायची ?

**ऊर्मिला** : माझी प्रेझेंटस् म्हणजे काय कर्जाऊ रक्कम आहे ?

**राजा** : नाही ग. कर्ज नाही, प्रेम आहे...पण प्रेमाची परतफेड ही प्रेमानेच करावी लागते; आणि एक सांगू, या घरात एखादं रांगतं पोर येणार नाही नां...

**ऊर्मिला** : ( विषय टाळत ) बहादूर, गाडी काढलीस ?

**बहादूर** : ( फक्त आतून आवाज ) 'जी मेमसाब.'

( ऊर्मिला जायला निघते. राजा तिला अडवतो. )

**राजा** : ए बाई,...माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही दिलंस ?

**ऊर्मिला** : राजा, पुन्हा कधी...आता हॉस्पिटलमध्ये जायचंय मला.

**राजा** : हॉस्पिटलमध्ये ?

**ऊर्मिला** : पपल्याला ठेवलाय...इंटेंसिव्ह केअर युनिटमध्ये...

( गाऊनचा पट्टा बांधत बांधत बी. के. खाली येतो. )

**बी. के.** : उर्मे, माझा चष्मा ?...

**ऊर्मिला** : ( त्रासिकपणे ) काय रोजची कटकट ? चार कारखान्यांबरोबर एक साधा चष्मा नाही सांभाळता येत ? तुझा तू शोध.

[ जाते. ]

**राजा** : कोणी नात्यातलं आजारीय का ?

**बी. के.** : नात्यातलं नाही, घरातलं...

**राजा** : कोण रे ?

**बी. के.** : आमचा पपल्या.

**राजा** : ( न कळून )...पपल्या कोण ?

**बी. के.** : आमचा कुत्रा !...राजा, लेका तुझ्या तिन्ही पिल्लांची नावं आम्हाला पाठ आहेत...आणि आमच्याकडच्या एका पिल्लाचं नाव तुझ्या लक्षात राहू नये ?

**राजा** : त्याचं असंय बी. के....माझी तिन्ही पिल्लं माझीयत, माणसाची ! तुझ्याकडे लेका कुत्र्याचं पिल्लू...

**बी. के.** : ( विषय टाळत, वरकरणी हसत ) खरंय्—खरंय्—बरं आज काय तुझा लीगल ॲडव्हाईस ?

**राजा** : या कागदांवर सह्या करा...

( बी. के. चष्म्याअभावी जरा कागद जवळ घेऊन वाचू लागतो. )...बारशाला नाही आलास माझ्याकडे ?

**बी. के** : खरं सांगू का,...मी विसरूनच गेलो. ऊर्मीने खूप वाट पाहिली माझी...

पण मला उशीर झाला म्हणून कोणीच आलं नाही...ऊर्मीनं सुंदर खेळणं देखील....

**राजा :** सिंगापूरहून आणलंय्...पस्तीस डॉलरचं. मिळालंय मला.

**बी. के. :** कसंय ?

**राजा :** छान...बी. के. तू जसं दीड-दोनशेचं खेळणं देऊ शकतोस ना वारशा-निमित्त...तसं मीसुद्धा पाच-सात रुपयाचं लाकडी भिरभिरं देऊ शकतो.

**बी. के. :** मान्यय्...गरज पडली की मागीन...

**राजा :** नाही, गेल्या दहा वर्षांत तुला गरज पडली नाही.

**बी. के. :** ( विषय बदलण्यासाठी काहीतरी बोलायचे म्हणून ) राजा, ड्राफ्टिंग नीट पाहिलंयस ना ? ...चष्मा नाहीय म्हणून विचारतो...अरे कधी कधी एखादी स्पेलिंग मिस्टेक काय हाहाकार उडवते...तुला ॲक्च्युअली फॅक्ट सांगतो... ( उगाचच हसत )...

**राजा :** टाइपिस्टने डी चा एम् केला. ठोंबे गुरुजी डेंटल ट्रीटमेंट ऐवजी मेंटल ट्रीटमेंटला गेले... [ बी. के. ओशाळतो. ] तुला हा एकच जोक माहितीय बी. के. आणि हा आम्ही नेहमी सक्तीने ऐकत असतो...माझ्या मुख्य मुद्द्याचं काय ?

[ बी. के. क्षणभर गोरामोरा होतो पण स्वतःला सावरत ]

**बी. के. :** कसला मुख्य मुद्दा ?

**राजा :** की ..तुला असं कधी वाटत नाही का, आपल्याला मूल असावं ?

**बी. के. :** हे बघ राजा, मूल नसावं असं काही वाटत नाही.

**राजा :** पण असावंच असं का नाही वाटत ?

**बी. के. :** अरे पण काय गरजय् ?...प्रत्येकाला मूल कशासाठी असावंच ?

**राजा :** आपल्या पश्चात आपलं नाव राहण्यासाठी.

**बी. के.** दादाभाई नौरोजीच्या वडलांचं नाव काय ? ... सुभाषचंद्रांच्या वडलांचं नाव सांग ...

**राजा :** जरा आठवलं पाहिजे.

**बी. के. :** दॅटस् इट्. आठवलं पाहिजे याचा अर्थ नाव राहिलेलं नाही...अरे माणसाचं नाव राहतं स्वतःच्या कर्तृत्वावर, पोरांच्या जिवांवर नाही...जोपर्यंत बी. के. इंडस्ट्रीज राहील...तोपर्यंत माझं नाव राहील...आणि खरं सांगू का, ज्याला खूप नाव असत ना...त्याला मूलच असू नये. कारण बापाचं नाव, पोरं बदनाम करतात आपल्या पुढाऱ्यांच्या पोराचे एकेक प्रताप पाहा...

**राजा :** ठीकय् रे, नावासाठी नाही पण म्हातारपणाची काठी म्हणून...

**बी. के. :** छी... छी... छी ... अतिशय घाणेरडा विचार...राजा, अरे हा सारा देश कर्जबाजाऱ्यांचा, दरिद्री, कंगाल... इथल्या प्रत्येक नागरिकावर परकीय

राष्ट्राचं कर्जंय ... बी. के. इंडस्ट्रीजवरदेखील कर्जंय...कर्जबाजारी नाही फक्त जन्माला येणारं तान्हं मूल. आणि त्या पोरांवरदेखील स्वतःच्या म्हातारपणाचं ओझं लादायचं ?

**राजा :** ( टाळ्या वाजवत ) सुंदर, बी. के. सुंदर...बांझोटा, खोटा का होईना... पण तू युक्तिवाद छान करतोस.

**बी. के. :** ( क्षणभर गहिवरून ) ...खरंय राजा, माणसाकडे जेव्हा उत्तर नसतं... तेव्हा फक्त त्याच्याकडं युक्तिवाद असतो.

**राजा :** अशा खोट्या युक्तिवादानं तुझं तरी समाधान होतं ?

**बी. के. :** नाही होत...म्हणूनच मग मी त्याच्यावर उपाय शोधून काढलाय.

**राजा :** काय ?

**बी. के. :** विषावर उतारा जसा जालीम विष, तसा दुःखावर उतारा जालीम दुःख...बस् ! अशक्य कोटीतील गोष्टींच्या मागे लागायचं...ज्या क्षेत्रात पाऊल टाकायला दुसरा कारखानदार धजावणार नाही...तिथं मी पाऊल टाकतो... पण...

**राजा :** पण काय ?

**बी. के. :** पण तिथेही मी दुर्दैवीच. मला चक्क अशक्य गोष्टी शक्य होतात. यश मिळतं. मग माझ्यापुढे बॅलन्सशीट येऊन पडतात. फुगलेला नफा पाहताना पुन्हा मला प्रश्न पडतो...ही सर्व धाप...ही सर्व हाव कोणासाठी ? याला कोण वारसय् ?...पुन्हा उत्तर नाही म्हणून खोटा युक्तिवाद सुरू...ऑल हंबग, ऑल हंबग...राजा, इतर व्यापारी, कारखानदार दुसऱ्यांची फसवणूक करतात...मी स्वतःचीच करतो. ( गुदमरत ) स्वतःला फसवणं फार कठीण. तरीही !

[ बराच वेळ सुन्न शांतता. ]

**राजा :** बी. के. एक ॲडव्हाईस करू ? लीगल नाही, पर्सनल—

**बी. के. :** जरूर..

**राजा :** अर्थात तू मला नोकर समजत नसलास.तर !

**बी. के. :** राजा, एक तर मी कुणाशी मैत्रीचं नाटक करत नाही. आणि नोकर ठेवायला मी काही वाण्या-उदम्याचं दुकान नाही टाकलं. मी एक इंडस्ट्री चालवतोय. करोडो रुपयांचा धंदा नोकरांच्या भरवशावर नाही, सहकाऱ्यांच्या जिवावर होतो...आणि मुख्य म्हणजे ऊर्मी तुला भाऊ मानते.

**राजा :** ठीक, तर मग मी बोलतोच ..

( बराच वेळ शब्दांची जुळवाजुळव करतो. )

बी. के. नुसतं पोर होणं पुरुषार्थाचं लक्षण नाही. पोरं काय कोल्ह्या-कुत्र्यांनाही होतात. पोरं होण्यातच पुरुषार्थ असता तर ब्रह्मचारी भीष्मापेक्षा शंभर कौरवांना

[जन्म देणारा धृतराष्ट्र मोठा ठरला असता.

**वी. के. :** ठीक. पुढे ?

**राजा :** सांगायचं काय,...मूल होणं ही एक निव्वळ शारीरिक प्रक्रिया रे...स्त्री-पुरुषांच्या विजातीय देहांतून...मशीन मशीन सारखंय रे...आणि मशीन बिघडलं की आपण दोष हुडकून ते दुरुस्त करतो.

**वी. के. :** हो करतो.

**राजा :** पण माणसांच्या बाबतीत काय होतं...म्हणजे सर्वच माणसांविषयी बोलतोय मी ... ( थोडे चाचरत ) म्हणजे बघ, ... प्रत्येक स्त्रीला स्वतःच्या स्त्रीत्वाचा अहंकार असतो ... आणि पुरुषाला आपल्या पुरुषत्वाचा ... म्हणजे असं की कोणतीही स्त्री आपण कुरूप आहोत ... आपल्यात सेक्स ॲट्रॅक्शन नाही...हे स्वतःशीसुद्धा कबूल करायला तयार नसते. तसंच प्रत्येक पुरुष...आपण कुठं कमी आहोत, नपुंसक आहोत हे कबूल करायला तयार नसतो.

**वी. के. :** मान्यय्...तुला काय म्हणायचंय् ?

**राजा :** नाही...म्हणजे मला असं म्हणायचं...सुचवायचं म्हणू हवं तर...आय मे बी रॉंग...म्हणजे माझी सूचना चुकीची असू शकते. ( बोलावे की न बोलावे म्हणून थबकतो. )

**वी. के. :** बोल—चुकीची असली तरी विचार करू...

**राजा :** तर मला असं म्हणायचं...मी, जे इकडून तिकडून ऐकलं...की उमाने नाना डॉक्टरांकडून स्वतःला तपासून घेतलं...कंटाळून मंत्र-तंत्र, गंडेदोरेही केले. म्हणजे तिनं स्वतःचा अहंकार बाजूला ठेवला. तसाच तूही जरा......

**वी. के. :** काय करू ?

**राजा :** डोंट मिसअंडरस्टॅंड मी...मी काय म्हणतो, मला तुझी पोझिशन, प्रेस्टीज या सर्वांची कल्पना आहे...आणि आपला भिकार हिंदू समाज...त्याची विचार-सरणीदेखील ठाऊक आहे.—पण मी काय म्हणतो... ( जरा जवळ सरकत ) नाहीतरी पुढल्या महिन्यात तू कंपनीच्या कामासाठी अमेरिकेला चाललाच आहेस ...तिथं कोण तुला ओळखतो. तेव्हा जर तू तिथंच...

**वी. के. :** ( थंडपणे ) स्वतःला तपासून घेतलंस तर—

**राजा :** काही तरी मार्ग सापडेल...म्हणजे मी तुझ्या जागी असतो तर हेच केलं असतं.

[ वी. के. राजाच्या पाठीवर थाप मारत हसत उठतो. ]

**वी. के. :** राजा—फार जिव्हारी विनोद केलास मित्रा—हसवता हसवता रडवणारा—तुला कुठल्या गाढवानं सांगितलं की माझ्यात काही दोष आहे ?

**राजा :** नाही, कोणी म्हणालं नाही...पण मीच असा अंदाज केला...

**बी. के.** : म्हणजे परिस्थितिजन्य पुराव्यावरून तू मला दोषी ठरवलंस ! राजा, अरे माझ्यात जर काही दोष असता...तर मी स्वतःच ऊर्मीला घटस्फोट दिला असता...मला काही लाज वाटली नसती...

**राजा** : ( संशयाने ) खरंच लाज वाटली नसती ?

**बी. के.** : नसती वाटली. राजा, हा स्वतःला फसवण्यासाठी युक्तिवाद नाही. कारण मी स्वतःला केव्हाच तपासून घेतलंय...तुला पटण्यासाठी एक विचार सांगतो—

**राजा** : सांग.

**बी. के.** : राजा...नपुंसक याचा अर्थ काय ?

**राजा** : ( अडखळत )...जे स्त्री-पुरुष प्रॉडक्टिव्ह...क्रिएटिव्ह ...

**बी. के.** : बरोबर. म्हणजे जे स्त्री-पुरुष प्रॉडक्टिव्ह क्रिएटिव्ह नाहीत ते नपुंसक... करेक्ट ?

**राजा** : करेक्ट !

**बी. के.** : राजा, स्त्री-पुरुष आणि नर-मादीमध्ये फरक आहे रे ! माणसाची नर-मादीमध्ये विभागणी फक्त नवकाव्यात किंवा शिवीगाळीत असते. सुजाण माणसं ...माणसांची विभागणी स्त्री-पुरुष यांमध्ये करतात. कारण ?

**राजा** : काय ?

**बी. के.** : कारण, माणूस हेच एक असं निसर्गातलं जनावरंय्...की जे निव्वळ शारीरिक पुनरुत्पादन करत नाही. मानसिक, वैचारिक उत्पादन... निर्मिती म्हणू आपण....देखील करतं ! अरे, स्त्री-पुरुष दोघेही कविता करू शकतात ... दोघंही चित्रं काढू शकतात...संगीत निर्माण करू शकतात...

**राजा** : तुला म्हणायचंय काय ?

**बी. के.** : म्हणायचं असं की, प्रॉडक्टिव्हिटी अनेक प्रकारची असते. किमान माणसांच्या बाबतीत... अरे एखाद्याला गाता येत नाही, एखादी भूमिका करता येत नाही म्हणून आपण त्याला इंपोटंट म्हणतो का ?

**राजा** : नाही !

**बी. के.** : बस्...मग एखाद्याला पोर झालं नाही म्हणून, कशाला त्याला नपुंसक म्हणायचं ? ..राजा, चार हजार माणसांना रोजगार देणारा बी. के. इंपोटंट नाही...नवीन नवीन गुलाबाची कलमं तयार करणारी...ऊर्मी देखील वांझ नाही. पण राजा, कविता करता आली नाही म्हणून कोणाला आपण षंढ वाटत नाही... मूल झालं नाही तर वाटतं...नशीब रे बाबा. नशीब. माझं...ऊर्मीचं.

**राजा** : बी. के. तुझ्यासारख्या रॅशनल माणसानं देव, दैव...नशीब, अशा गप्पा माराव्यात—

**बी. के.** : राजा, अरे देव, दैव, नशीब या साऱ्या वादांत खोट्या कल्पना आहेत,

माहितीय...तरी पण, जगण्यासाठी माणसाला या खोट्या कल्पना सोय म्हणून मानाव्या लागतात. (अरे लहान मुलं जशी खेळताना पहिलं दान देवाला टाकतात ना, तसा हा बी. के.—बी. के. नाही, प्रत्येक माणूस—शेवटचं दान, शेवटचा सवाल...नशिबाच्या नावानं टाकून मोकळा होतो.) निसर्गानं, समाजानं निर्माण केलेला एकेक प्रश्न...त्याला उत्तर द्यायला एका व्यक्तीची बुद्धी, शक्ती, प्रतिमा पुरत नाही. हे हरलेलं दान देवाला–नशिबाला !

**राजा :** तू...तू हरलास बी. के. ?

**बी. के. :** हो हरलो...नाहीतर तूच सांग राजा, ऊर्मी-बी. के. सारखं तरुण जोडपं–हेल्दी, हॅंडसम...तीळ म्हणूनदेखील डाग नाही रे...छोटासा ॲक्सिडेंट होतो–वांझोटं ठरतं ?

**राजा :** ( चमकून ) म्हणजे तू त्या उटीच्या ॲक्सिडेंटबद्दल बोलतोयस् ?

**बी. के. :** हो...ॲक्सिडेंट झाला–हसता–हसता. तोंदेखील किती किरकोळ... गाडी जस्ट पंधरा वीस फूट नाल्यात घसरली. ऊर्मीला थोडा ओटी-पोट-कमरेला मार बसला...मी तिला उचललं, म्हटलं... 'ऊर्मे, वाईटातून चांगलं निघतं ते असं, तू फुलासारखी हलकी आहेस एवढं तर कळलं !'

**राजा :** मग ?

**बी. के. :** मग कायरे, सारं आयुष्यच दगडासारखं जड होऊन छाताडावर येऊन पडलं...गावातल्या डॉक्टरनं शांतपणे सांगितलं...मिस्टर बी. के. तुमच्या बायकोला कधीच मूल होऊ शकणार नाही !

[ राजा सुन्न झाला आहे.]—आणि मी हसलो रे राजा, खदखदून हसलो...म्हटलं हा आडगावचा डॉक्टर काय बंडल मारतोय...मेडिकल सायन्स किती ॲडव्हान्स झालंय–आणि मला काय कमी ?...मी जगाच्या कानाकोपऱ्यात कुठंही जाऊ शकतो.

**राजा :** नंतर मग...

**बी. के. :** ऊर्मिला घेऊन जगाचा कानाकोपरा धुंडाळला. कुठंही उपाय सापडला नाही. बुद्धीची खात्री पटली, तरी मनाचीही खात्री पटावी...म्हणून मग इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सचा हा कारखानदार गंडे, दोरे, मंत्रतंत्र सारं सारं करता झाला. महालक्ष्मीचं दर्शन, औदुंबरला नवस.

[ बराच वेळ सुन्न शांतता. ]

**राजा :** बी. के. तू जसं मघाशी म्हणालास—

**बी. के. :** तसंच ऊर्मीही मला म्हणाली, कशाला माझ्या वांझोट्या नशिबाशी स्वतःच्या दैवाची गाठ घालतोस...डायव्होर्स घे...दुसरं लग्न कर ...

**राजा :** मग तू—

**बी. के.** : नाही म्हणालो...मी म्हटलं. ' ऊर्मे, माझं तुझ्यावर खूप प्रेमंय ग. तुझ्याशिवाय मी जगूच शकत नाही. '

**राजा** : (बी. के. चा हात हातात घेत, दाटून येत) खरंच तू असं बोललास बी. के. ?

**बी. के.** : खरंच असं बोललो–पण ' खरं ' नाही बोललो !

**राजा** : म्हणजे ?

**बी. के.** : राजा, सत्य हे इतकं जालीम जहरी असतं, की स्वतःशी बोलताना देखील चोरूनच बोलावं लागतं...राजा, ॲक्सिडेंट झाला...त्याच दिवशी माझी खात्री पटली असती, ऊर्मीला मूल होणार नाही...तत्काळ मी दुसरं लग्न केलं असतं... पण तेव्हा खोटी आशा, खोटा आत्मविश्वास होता...बघता बघता पाच वर्षे गेली. आणि तोपर्यंत खूप बदल झाला रे...खूप बदल झाला.

**राजा** : काय ?

**बी. के.** : राजा, जेव्हा ॲक्सिडेंट झाला...तेव्हा परस्परांविषयी काहीही प्रेम ॲफिनिटी नसलेलं ...वडीलधाऱ्यांच्या संमतीनं, देवाब्राह्मणांच्या साक्षीनं, ॲरेंज्ड मॅरेज झालेलं, ' हनिमूनला ' निघालेलं आमचं वधू-वराचं जोडपं होतं...पण नंतरच्या पाच वर्षांत आम्ही वधू-वर राहिलो नाही रे ... ( कासावीस होत ) आम्ही नवरा-बायको झालो राजा...नवरा-बायको झालो. आमची सुखदुःखं एक झाली. आम्ही एकमेकांवर प्रेम करू लागलो. आता तिच्याशिवाय जगणं शक्य नाही.

**राजा** : मग, मी खरंच असं बोललो पण ' खरं ' नाही बोललो असं का म्हणालास ?

**बी. के.** : ( हसून ) अरे राजा, मी तिला अर्धसत्य सांगितलं... आता मी तुझ्याशिवाय जगू शकत नाही...तेव्हा मी जगू शकलो असतो. हे नाही सांगितलं...

**राजा** : का ?

**बी. के.** : कारण, हे मी सांगेन...तेव्हा ती दुखावेल...ती स्वतःशी खरं बोलू शकणार नाही.

**राजा** : काय ?

**बी. के.** : की तेव्हा तिची जरी स्वतःची खात्री पटली असती...तरी तिनं मला डायव्होर्स दिला नसता. कारण, तिचा स्वाभिमान... अहंकार आडवा आला असता.

**राजा** : आता नाही येत तो आडवा ?

**बी. के.** : नाही. कारण आता तिचं माझ्यावरचं प्रेम जास्त मोठंय...अरे आता ही खुळी...मला तासन् तास कन्व्हिन्स करत असते. बी. के. आत्ताच दुसरं लग्न कर. अजून तू तरुण आहेस...जशी काही ही म्हातारी झालीय... [ राजा हळूच डोळे पुसतो ]

अरे,...काय उपमा देते...उदाहरण देते...म्हणते, ' प्रभू रामचंद्रानं नव्हता का

केला सीतेचा त्याग ? '

**राजा :** मग तू काय उत्तर देतोस ?

**बी. के. :** कसलं उत्तर द्यायचं ? तो रामचंद्र—राम्या...त्याला मी लिमिटेड गॉड म्हणतो...लिमिटेड गॉड ! (मर्यादा पुरुषोत्तम नाही. मर्यादित पुरुषोत्तम.) त्याचं देवत्वही मर्यादित. म्हणून तर साल्यानं...चवदा वर्षं—राजा, चवदा वर्षं जिने आपल्याबरोबर वनवास भोगला—त्या सीतेला एका फालतू धोब्याच्या सांगण्यावरनं टाकून दिलं...हा बी. के. इतका क्षुद्र नाही, मला ब्रह्मदेवाच्या बापानं जरी येऊन सांगितलं तरी मी ऊर्मीला सोडणार नाही ! [ पुन्हा बराच वेळ शांतता ] जाऊ दे राजा, हा विषयच नको. उगाच एक्साईट होतो मी. तोंडात अपशब्द येतात.

**राजा :** ( उठून बी. के. ला थोपटत ) सॉरी बी. के., खरा प्रकार माहीत असता तर...मीच विषय काढला नसता...

**बी. के. :** मला मोठं आश्चर्य वाटतं...तू एवढा ऊर्मीचा भाऊ...नि तुला खरा प्रकार माहीत नसावा ?

**राजा :** बी. के., तुझ्याकडेच त्याचं उत्तरंय्...सत्य फार कटू असतं. मी उमाचा भाऊ वगैरे काही नाही-खरं म्हणजे मी आश्रित. वडलांच्या पश्चात उमाच्या आईबाबांनी आम्हा निराधार भावंडांना सांभाळलं ... आऊटहाऊसमध्ये राहायला जागा दिली. त्या वेळी काही कळत नव्हतं. आणि उमा–मी एका वयाचे म्हणून आमची गट्टी जमली...मोठे झालो...

**बी. के. :** मग ?

**राजा :** आम्ही फक्त जिवलग दोस्त राहिलो. आपल्या गलिच्छ समाजात अशा दोस्तीला मान्यता नसते. म्हणून मग उमाचे आई-बाबाच सांगू लागले, राजा उमाचा मानलेला भाऊय !... थोडक्यात, खरं म्हणजे मी उमाचा आश्रित दोस्तच. आणि कितीही दोस्ती असली... तरी इतक्या नाजूक विषयाबाबत बोलताना...जीभ जरा जडावतेच...

**बी. के :** मग आज बरा विषय काढलास ?

**राजा :** मला सतत वाटायचं रे...उपकाराची फेड असा शब्द नाही वापरत—पण, आजवर माझे सर्व प्रॉब्लेम उमाच्या जिवावर मी सोडवले, उमा, बेकारय, नोकरी दे...उमा, घर घ्यायचंय, कर्ज दे...उमा, मुलाला शाळेत घालायचंय, वशिला लाव. .निदान तुमचा एखादा तरी प्रॉब्लेम सोडवावा —

**बी. के. :** असं दहा वर्षांनी वाटलं ?

**राजा :** तसं नाही...पहिली दोन-तीन वर्षं तुमच्या घरात पाळणा हलत नाही हे मला जाणवलंच नाही...म्हटलं ठीकय, नवी नवलाई आहे...कशाला पाहिजे

इतक्यात पोरांचं लोढणं ?

**बी. के. :** नंतर ?

**राजा :** नंतर मात्र बी. के...मला उमाचाच संशय येऊन लागला...

**बी. के :** काय ?

**राजा :** आता तुला माहितीच्चंय्...उमा स्वतःच्या सौंदर्याविषयी, फिगरविषयी किती कॉन्शस असते...मला वाटलं सौंदर्य कमी व्हायला नको म्हणून उमा पाळणा लांबवतीय.

**बी. के. :** मग ?

**राजा :** मग काय ? जरा आडून आडून पण घालूनपाडून बोललो मी उमाला... म्हणालो—'स्त्रीचं खरं सौंदर्य फिगर आणि कॉम्प्लेक्शनमध्ये नाही. मातृत्वामध्ये आहे.' ... 'बाईचे ब्रेस्टस् किती टच्चंय याला महत्त्व नाही...पान्हा फुटतो की नाही महत्त्वाचंय..' समजावलंही...'योग्य वयात मूल झालेलं चांगलं...' बस, उमा ऐकायची...चेहरा टाकायची...नंतर मला, इकडून 'तिकडून कळलं .. उमा या डॉक्टरकडे त्या डॉक्टरकडे जातीय...मग मी चूप बसलो.

**बी. के. :** का ?

**राजा :** म्हटलं, उमात जर काही दोष असेल तर.. कशाला आपण तिच्या वर्मावर बोट ठेवा. पुढं लक्षात आलं...तिनं सर्व प्रयत्न सोडलेत...ती मनातल्या मनात कुढतीय...खंतावलीय...मग मात्र वाटलं, तुझ्यातच काही कमीय...पण बोलायला धजावलो नाही.

**बी. के. :** का ?

**राजा :** स्वार्थासाठी नाही रे...तरी अस्तित्वासाठी माणूस अगतिक होतोच ..माझं ...माझ्या घरादाराचं अस्तित्वच तुझ्या नोकरीवरंय..

**बी. के. :** मग आज का धजावलास ?

**राजा :** धजावलो नाही, पण ठरवलं...कालच्या दिवेच्यांच्या पार्टीनंतर !

**बी. के. :** दिवेचांची पार्टी ?

**राजा :** हो ! दिवेचांचा मुलगा एफ. आर. सी. एस. होऊन परतला म्हणून त्यांनी जंगी पार्टी दिली. मलाही बोलावलं होतं...मी जरा उशिरा पोचलो...तेव्हा सायकिएट्रिस्ट दिवाण आपले एकेक अनुभव सांगत होते. मला पाहताच एकदम ते थांबले. विषय बदलला

**बी. के. :** का ?

**राजा :** कारण, ते अपत्यहीन स्त्रियांमध्ये हळूहळू कशी वेडाची झलक दिसू लागते—

**बी. के. :** ( ताडकन् उभा राहत ) बस् कर राजा, बस् कर ! मला त्यांनी चार महिन्यांपूर्वीच इशारा दिला नि एकेक झलक सध्या मी पाहतोय...

**राजा** : तरी तू स्वस्थ ?

**बी. के.** : काय करू शकतो ?... माझ्याकडे काय उपाय आहे ?

**राजा** : बी. के. उपाय आहे...

**बी. के.** : काय ?

**राजा** : नाहीतरी माझ्या छोट्याचा उमाला खूप लळा आहेच... दत्तक घे... [बी. के. खदखदून हसतो. ] जस्ट ए मिनिट. बी. के. तुझ्या इस्टेटीच्या लोभाने बोलत नाहीय...

**बी. के.** : ( आवाज चढवून ) राजा, कशाला स्वतःचं दारिद्र्य सांगून, पुन्हा पुन्हा मला माझ्या बेवारशी ऐश्वर्याची जाणीव करून देतोयस ?

**राजा** : तसं नाही बी. के... पण लोक बोलतात. मी तुला छुवाडतो.

**बी. के.** : लोकांना मार गोळी... निदान आज तू तोंडावर तरी बोललास, पाठीमागे लोक बडबडतच असतात... बी. के. साहब नामर्दय्. पण मला त्याची फिकीर नाही. आठ आठ पोरांचे वीर्यशाली बाप माझ्यापुढे हात जोडून उभे असतात... मुद्दा तो नाही राजा. अरे उत्तर एवढं साधं, सोपं, सरळ असतं तर केव्हाच एखादं मूल अनाथाश्रमातून मी आणलं नसतं ?

**राजा** : खरंय, काय हरकतय् एखादं मूल ॲडॉप्ट करायला ? नाहीतरी शेकडो रुपये कुत्र्या-मांजरांवर उडवताच तुम्ही.

**बी. के.** : हरकत माझी नाही... ऊर्मीची आहे !

**राजा** : का ?

**बी. के.** : सारी हकीकत सांगू ?

**राजा** : सांग.

**बी. के.** : तुला माहितीय गेल्या महिन्यात मी दिल्लीला—

**राजा** : बोर्डाच्या मीटिंगसाठी गेलातास...

**बी. के.** : ठरल्याप्रमाणे संध्याकाळीच मी परतणार होतो... पण मला यायला उशीर झाला...

[ हळूहळू अंधार. रिव्हॉल्विंग फिरू लागते. पोर्चमध्ये गाडी थांबल्याचा आवाज —बेल वाजते. दरवाजा उघडला जातो. नुसते आवाज– ]

**बी. के.** : बहादूर, गाडीतनं सामान आण.

**बहादूर** : जी साब.

**बी. के.** : मेमसाब कुठायत ?

**बहादूर** : घरीच. वर बेडरूममध्ये झोपल्यात ! ( जिना चढल्याचा आवाज. )

( रंगमंचकावर पुन्हा प्रकाश. फ्लॅश बॅक सुरू होतो. )

प्रवेश पहिला समाप्त

## प्रवेश दुसरा

फ्लॅश बॅक सुरू होतो.

[ मध्यरात्रीची वेळ. बेडरूममध्ये पडल्या पडल्या बेडलॅंपच्या उजेडात ऊर्मिला एक जाडजूड इंग्रजी पुस्तक वाचण्यात मग्न झाली आहे. बी.के. येतो. कोट टाय काढून वार्डरोब मधल्या हॅंगरला लावता लावता अपराधी सुरात बोलू लागतो. ]

**बी. के. :** सॉरी ऊर्मी, बोर्डाची मीटिंग लांबली...प्लेन मिस झालं...म्हणून मग रात्रीच्या फ्लाईटनं यावं लागलं.

**ऊर्मिला :** ( वाचता-वाचता ) अं ?...काय म्हणालास ?

**बी. के. :** म्हटलं, सॉरी. यायला उशीर झाला.

**ऊर्मिला :** ( अजून वाचनातच दंग ) किती वाजलेत ?

**बी. के. :** पहाटेचे तीन.

**ऊर्मिला :** ( गडबडून उठत ) तीन वाजले ?...माझ्या लक्षातच नाही आलं.

**बी. के. :** ( बसत ) एवढं काय देहभान हरपून वाचत होतीस ?

**ऊर्मिला :** ( उदासपणे ) काही नाही...असंच. चाईल्ड-सायकॉलॉजी...

**बी. के. :** कशासाठी ?

**ऊर्मिला :** ( उत्साहाने ) आज माझी सहा चिल्ल्या-पिल्ल्यांशी ओळख झाली. आणि माझ्या लक्षात आलं बी. के....प्रत्येक मूल म्हणजे एक समस्या असते...आणि या समस्येला उत्तर नसतं द्यायचं, तिला सोडवायचंही नसतं..ती फक्त समजून घ्यायची असते.

**बी. के. :** (कंटाळत) ठीकय् ग, ही अर्धा डझन पोरं तुला भेटली कुठे ते आधी सांग.

**ऊर्मिला :** पहिला भेटला, आपल्या फॅक्टरीमागच्या झोपडपट्टीत.

**बी. के. :** तिकडे कशाला गेलीतीस ?

**ऊर्मिला :** फॅक्टरीत गेले होते रोपं आणायला ... येताना तो भेटला. पाच-सहा वर्षांचा. उघडा-नागडा, शेंबडा पोरगा. अंग धुळीनं मळकटलेलं. रागारागाने फणफणत एकटाच उभा होता. मला त्याचं खूप कौतुक वाटलं...मी त्याच्याकडे पाहून, हसून टुकटुक माकड करत नाक खाजवलं... ( गंभीर होत ) आणि बी. के. तो एकदम माझ्याकडे पाहून थुंकला. आणि संतापाने खालचा दगड उचलून त्याने ताड्कन आपल्या गाडीवर मारला...

**बी. के. :** ( इन्वॉल्व्ह होत ) कशासाठी ?

**ऊर्मिला :** त्याचाच दिवसभर मी विचार करतेय ! त्याने का दगड मारला ? कशा-साठी ?...मी चिडवलेलं त्याला आवडलं नाही ?...का त्याला कोणी गोंजारायला

नसताना मी आपल्या कुत्र्याला कुरवाळत होते म्हणून? का तो थंडीवाऱ्याचा, उन्हापावसाचा फुटपाथवर राहात असताना मी एअरकन्डिशंड गाडीमध्ये बसले होते म्हणून?

**बी. के.** : (झटकत) फर्गेट इट ऊर्मी, ज्या प्रश्नांची आपल्याकडे उत्तरं नाहीत त्यांचा विचारच करायचा नाही...बाकी पाच पोरं कुठं भेटली?

**ऊर्मिला** : (पुन्हा उत्साहाने) हं...ती भेटली सुमी सोमणच्या लेकुरवाळया म्युझियममध्ये...

**बी. के.** : ही कोण सुमी सोमण?

**ऊर्मिला** : माझी कॉलेजमधली क्लासमेट...तिचा नवरा आपल्याच कंपनीत पर्चेस मॅनेजरय्...एकदम मस्तय हं...

**बी. के.** : कोण मस्तय्? सुमी सोमण की तिचा नवरा?

**ऊर्मिला** : (लटक्या रागाने दटावत) ...ए मिस्टर, तुझ्या बायकोसारखी सुंदर बायको या शहरात दुसऱ्या कोणाची नाही...आं...

**बी. के.** : (समजावत) नसेल ग...'माझ्या बायकोसारखी सुंदर नसेल', तरीपण सुंदर असेल की नाही? सौंदर्याचेही खूप प्रकार असतात...

**ऊर्मिला** : अच्छा, म्हणजे सुमी कोणत्या सौंदर्य-प्रकारात मोडते हे जाणून घ्यायची महाशयांची इच्छा आहे.

**बी. के.** : ऑफ कोर्स, अजून काही मी म्हातारा नाही झालो.

**ऊर्मिला** : ठीकय्, तर ऐक. (थंडपणे) आम्ही सुमीला कॉलेजमध्ये हत्तीण म्हणायचो.

**बी. के.** : (नर्व्हस होत) कॉलेजमधे असतानाच हत्तीण होती. मग आता केवढी गरगरीत—

**ऊर्मिला** : काही नाही. हाडं निघालीयत, गालफडं बसलीयत...

**बी. के.** : हाडं निघाली?

**ऊर्मिला** : निघतील नाहीतर काय?...पाच वर्षांत पाच बाळंतपणं रे!

**बी. के.** : (डोकं खाजवत) पाच वर्षांत पाच...बापरे...

**ऊर्मिला** : कसला विचार करतोयस?

**बी. के.** : मी विचार करतोय, तिच्या नवऱ्याला पर्चेस मॅनेजरचा प्रॉडक्शन मॅनेजर करावा की काय?

**ऊर्मिला** : नको. त्यानं आता लॉकआऊट जाहीर केलाय!

**बी. के.** : एवढ्यात टाळेबंदी?

**ऊर्मिला** : नाहीतर काय?...मुलगी होण्यासाठी जंग जंग पछाडलं. घरात म्हणे लक्ष्मीची पावलं पाहिजेत...कंटाळला शेवटी बिचारा. आता सुमी घालते स्वतःची

समजूत...' माझे अगदी कसे पाच पांडव आहेत !... (हसत हात जोडत) अरे तिच्याकडून पोरांचे एकेक प्रताप ऐकले नि म्हटलं...' आहेत अगदी पाच पांडव —शंभर कौरवांचा धुव्वा उडवतील.... (बी. के. ला थापट मारत) काल बरं का, सुमीचा मोठा मुलगा बंट्या...सात वर्षांचाय...घरातल्या घरात गावसकर गावसकर खेळत होता.

**बी. के.** : काय खेळत होता ?

**ऊर्मिला** : गावसकर, गावसकर. आपण कसे लहानपणी शिवाजी शिवाजी खेळायचो. आत्ताची मुलं गावसकर–गावसकर खेळतात. चाईल्ड सायकॉलॉजीच्या थर्ड चॅप्टरमध्ये सुंदर डिस्क्रिप्शनय...प्रत्येक जनरेशन गॅपबरोबर, चिल्ड्रन्स गेम्स... टॉईजमध्ये फरक.

**बी. के.** : त्या गावसकरचं काय झालं ?

**ऊर्मिला** : हां—तर काल बंट्या गावसकर गावसकर खेळत होता...नि इम्रानखानच्या एका फास्ट बॉलला त्यानं जीऽऽऽ सणसणीत सिक्सर ठोकली—की बस्—टी. व्ही. ची ग्लास गूल ! (दोघे खदखदून हसतात) सुमीनं जे झोड झोड झोडलं बंट्याला...नंतर तिचं तिलाच वाईट वाटलं...म्हणाली, 'वळ येईपर्यंत मी मेलीनं मारलं ग त्याला—' गेल्याच महिन्यात तिने टी. व्ही. चा शेवटचा हप्ता भरला होता. या महिन्यात फ्रिज घ्यायचा होता तर हा खर्च.

**बी. के.** : चांगली गोष्टय !

**ऊर्मिला** : काय चांगली गोष्टय !

**बी. के.** : नाही माझ्या पर्चेस मॅनेजरकडे तीन वर्षं झाली फ्रिज नाही म्हणजे तो प्रामाणिकय्.. पैसे खात नाही. चांगली गोष्टय्...नाहीतर आपला सेल्स मॅनेजर मुखर्जी ग...कोठे पैसे खातो कळत नाही. —तू मला सांग, चार हजार रुपये पगारात, चार वर्षांत खंडाळ्याला बंगला बांधता येईल काय ?

**ऊर्मिला** : सुमीचा नवरा बिचारा अगदी साधाय हं. छोटा टूरूम किचनचा फ्लॅट... उठण्या-बसण्यापुरतं किरकोळ फर्निचर...बाकी काही नाही. ना दागदागिने ना बँक बॅलन्स...ए आपल्या वर्क्स मॅनेजर, सेल्स मॅनेजरला गाडी दिलीयस...पर्चेस मॅनेजर जुन्या स्कूटरवरनं हिंडतो. त्याला गाडी द्यायला कंपनीची काय हरकतय ?

**बी. के.** : सुमीनं तुझा वशिला लावला असला तर काही हरकत नाही. पुढल्या आठवड्यात सुमी सोमणच्या नवऱ्याला गाडी देतो !...पण काय ग...तो बंट्या 'ड्रायव्हर, ड्रायव्हर' खेळायचा नाही ना ? नाहीतर गाडीचा सत्यानाश.

**ऊर्मिला** : (हसत) नाही खेळायचा.

**बी. के.** : मग ठीकय् ... (उठून गाऊन चढवता चढवता...) एकंदरीत तुझा आजचा दिवस आनंदात गेला.

**ऊर्मिला :** असंच काही नाही... दुखावलेही खूप वेळा...म्हणजे तिनं मुद्दाम मला दुखवलं असं नाही...पण सांगू का, (एखादी गोष्ट आपल्याकडे असली ना... की ती नसल्याचं दुःख माणसाला कळतच नाही.)

**वी. के. :** ( काळजीच्या सुरात ) का, काय झालं ?

**ऊर्मिला :** काही नाही रे,...मी सुमीबरोबर तिच्या घरी गेले. तिचा छोटा-नागडधुय्या मोठ्या रांगत होता. मोठ्या कौतुकानं मी त्याला उचललं नि सुमी एकदम कैदाशिणीसारखी धावत आली, खसकन् त्याला ओढून घेतलं...

**वी. के. :** का ?

**ऊर्मिला :** म्हणे त्याची 'शी'ची वेळ झालीय...तुझी साडी खराब होईल. ( खेदाने ) मी मनात म्हटलं,...'बाईग, तुझ्याकडे चारच नेटक्या साड्यायत, पण त्या दहा वेळा खराब होतात. माझ्याकडे हजार साड्यायत. त्यातली एकही कधी खराब होत नाही.

**वी. के. :** पुढे काय झालं ?

**ऊर्मिला :** काही नाही. तासाभरानं त्याला न्हाऊ धुऊ घालून, नीट काजळ रेखून आणून ठेवला माझ्या मांडीवर...म्हणे सांभाळ आता...पण त्याला सांभाळायचा चार्मच गेला.

**वी. के. :** कशानं ?

**ऊर्मिला :** अरे, त्याला न्हाऊ धुऊ घातलेला...अंगावर थपाथपा पावडर थापलेली ...जवळ घेतला तर नुसता पावडरचा वास. दुधाचा वासच नाही !

**वी. के. :** दुधाचा वास ?

**ऊर्मिला :** हो. लहान मुलांच्या अंगाला इतका सुंदर वास येतो दुधाचा...तू घेतलायस कधी...हा पाहा. ( मनगट पुढे करते. )

**वी. के. :** ( वास घेत ) बाजारात दुधाच्या वासाचीही अत्तरं मिळायला लागली का ?

**ऊर्मिला :** नाही...मीच बनवलं हे, घरातल्या घरात.

**वी. के. :** कसं ?

[ ऊर्मिलाच्या बोलण्यात, डोळ्यांत थोडीशी विचित्र झलक दिसू लागते. ]

**ऊर्मिला :** अरे, संध्याकाळी मी घरी आले ना ... सारखं वाटू लागलं ... दुधाचा वास घ्यावा...मग मी काय केलं...किचनमधे जाऊन थोडी दुधाची साय मनगटावर घेतली...खसाखसा घासली...आणि हातच नाही धुतला. आला की नाही दुधाचा वास ? [ वी. के स्तंभित होऊन पाहत राहतो. ] वी. के. (प्रत्येक आयुष्याला स्वतःचा असा एक गंध असतो ! छापखान्याला कसा शाईचा, पुस्तकाच्या दुकानाला कागदांचा...तसा लेकुरवाळ्या घराला लहान मुलाच्या मुतीचा ... दुधाचा गंध असतो.)

**बी. के. :** खरंय्...( विषय बदलत ) तू त्या पांचगणीच्या बंगल्याचं इंटिरियर कसं करणार आहेस ?

**ऊर्मिला :** करणारच नाही .. इंटिरियर डेकोरेशन केलं, की घर हॉटेलसारखं दिसायला लागतं...आपल्या घरासारखं...सुमीचं घर कसं साधं-काही प्लॅनिंग नाही, डेकोरेशन नाही—तरी भरल्यासारखं वाटतं...का माहितीय ?

**बी. के. :** का ?

**ऊर्मिला :** हे बघ, हा पेसल् ग्रीन कलर का दिला आपण भिंतीला ?

**बी. के. :** शांत वाटावं म्हणून...या रंगात काय फीलिंगय...

**ऊर्मिला :** पण स्मशानशांतता वाटते...कारण ही भिंत भरलेली नाही. लहान मुलांनी एकदा कशिदा काम केलं ना भिंतीवर की घर भरल्यासारखं वाटतं... सुमीचं घर...साऱ्या फ्लॅटला पिवळी माती फासलेली...पण पोरांनी इतक्या रेघोट्या, चित्रं काढलीती त्याच्यावर...बस्, त्या तेवढ्यामुळं घर भरल्यासारखं वाटत होतं...हॉटेलच्या भिंतीवर कोणी अशा रेघोट्या मारत नाही. मग माझ्या लक्षात आलं आपलं घर का हॉटेलसारखं वाटतं. घरी आल्या आल्या पेन्सिली हातात घेतल्या नि चित्रं काढली भिंतीवर...

**बी. के. :** ( थक्क होत ) चित्रं काढलीस ?

**ऊर्मिला :** ( दाखवत ) बघ ना...पण जमली नाहीत. लहान मुलांचा हात हलका असतो. आपला जड...हे असं, इतकं नीटनेटकं घर...निर्जीव वाटतं. घरात कसा पसारा पाहिजे. म्हणजे मग वाटतं आपण संसार मांडलाय...आता बघ ना, घरात किती खेळणी मोठ्या हौसेनं मी जमवलीयत...पण ती अशी शो-केसमधल्या शो पिसेससारखी वाटतात. मुलांची खेळणी वाटतच नाहीत.

**बी. के. :** का ?

**ऊर्मिला :** अजून मुलांचा हात लागला नाही रे त्यांना...मी प्रयत्न केला. दोनचार खेळणी मोडली...पण तू पाहिलीस तर ओळखशील मी मोडलीयत...चिमणरावचं नाक वाकडं केलं, गुंड्याभाऊंचं धोतर ओढून ठेवलं... सिस्टिमॅटिकली. मुलं सिस्टिमॅटिकली काही करत नाहीत ..अभावितपणे करतात...मी बंड्याला विमान दिलं...तासाभरात त्यानं त्याची बैलगाडी केली...सुमी लागली ओरडायला ... तरी मी तिला समजावलं.

**बी. के. :** काय समजावलं ?

**ऊर्मिला :** सुमे—जरा चाईल्ड सायकॉलॉजी समजून घे. प्रत्येक मुलामध्ये एक डिस्ट्रक्टिव्ह इन्टिंक्ट असते...तिचं क्रिएटिव्ह इन्स्टिंक्टमध्ये रूपांतर करणं हे तर खरं आईचं काम...

**बी. के. :** मग ?

**ऊर्मिला** : मग काय ? ...एकदम फिस्कारली माझ्यावर ..' तुझी चाईल्ड सायकॉलॉजी मुलांना देखील बसवायच्या लायकीची नाही. तुला काय कळतंय यातलं ? ...मी पाच मुलं वाढवलीत.'

[ बी. के. शेजारी बसून ऊर्मीच्या पाठीवरनं हात फिरवतो. ऊर्मीचे डोळे पाणावलेले. ]

**ऊर्मिला** : बी. के. ...खरंच तिने पाच मुले वाढवली. स्वतःचं, कुटुंबाचं आयुष्य, भविष्य घडविलं. तिचं आयुष्य किती कर्तृत्वानं भरलेलं आहे...सुमी, साधी शाळामास्तराची मुलगी, दिसायला कुरूप, बुद्धीनंही जड. अठरा विश्वं दारिद्र्य, हुंडा नाही म्हणून लग्न लागलं—एका गरीब, शेळपट कारकुनाशी.

**बी. के.** : मग ?

**ऊर्मिला** : सुमी जिद्द नाही हरली...तिनं स्वतः नोकरी पकडली, अहोरात्र खस्ता काढल्या...मन मारलं... इच्छा मारल्या... नवऱ्याला शिकवलं. नुसतं कॉलेज नाही, चांगलं पॉश राहणं...बोलणं...सर्व सर्व...केपेबल पुरुष घडवला तिनं... आज तो पर्चेस मॅनेजर... आणि मी ?

**बी. के.** : तुझं काय ?

**ऊर्मिला** : माझं काहीच नाही. कर्तबगारी, कर्तृत्व नाही. जन्माला आले श्रीमंत आईबापांच्या पोटी. निसर्गाची कृपा...सौंदर्य होतं...बुद्धी होती...मोठी झाले... लग्न लावलं ... तेही आईबापांनीच. नवरा छोटा कारखानदार.... पण इतका कर्तबगार...बघता बघता मोठा इंडस्ट्रियालिस्ट झाला. त्यात माझा काय वाटा ?

**बी. के** : ऊर्मी,(तू माझी वायकोयस्... अर्धी वाटेकरीण आहेस...

**ऊर्मिला** : फक्त सात फेऱ्या होमाभोवती घातल्या...म्हणून नवऱ्यानं दिलेला हक्क. मिळालेला हक्क. मिळवलेला नाही.)साधा साठ सत्तर हजाराचा फ्लॅट. पण सुमी किती अभिमानाने सांगते ... हे माझं घरय्. बरोबरंय रे. त्या घराची प्रत्येक वीट नि वीट तिनं मिळवलेली आहे. हा एवढा दहा लाखांचा बंगला... मला नुसता मिळालाय...सुमी गर्वाने सांगते... माझा नवरा पर्चेस मॅनेजरंय...मी नाही सांगू शकत माझा नवरा इंडस्ट्रियालिस्टंय. कारण मी त्याला कधी साथ नाही केली. मी फक्त सोबत करते. पपल्या कसा मला नुसती सोबत करतो. बास् ... तसंच. घरी आल्यावर नवऱ्याला एकटं एकटं वाटू नये म्हणून मी त्याला सोबत करते ... साथ सोडाच, त्याला साधा वारस नाही देऊ शकत मी.

**बी. के.** : (चिडून) जरूर नाही मला कोणा वारसाची. मरताना सारी इस्टेट फुंकून टाकीन मी दानधर्मात.

**ऊर्मिला** : बी. के., तू सारा विचार पैशातच का करतोस ?... वारस काय फक्त इस्टेटीसाठी पाहिजे असतो ?

वी. के. : मला म्हातारपणी कोणती काठी नकोय... नावदेखील राहायला नकोय.

ऊर्मिला : [अरे नावासाठी, म्हातारपणासाठी नको—पण पितृऋण फेडण्यासाठी तर वारस हवा.]

वी. के. : कसलं पितृऋण ? बाप मेला तेव्हा आठ लाखांचा छोटासा कारखाना आणि सतरा लाखांचं मोठं कर्ज ठेवूनच मेला. हे सारं ऐश्वर्य, वैभव मी उभं केलंय्...

ऊर्मिला : वी के. ... कधीतरी एकदा स्वतःला, स्वतःच्या कर्तृत्वाला वगळून या आयुष्याचा—जीवनाचा विचार कर...आपण कुत्र्या-मांजराच्या जन्माला नाही आलो. माणसाच्या जन्माला आलो हे निसर्गाचं आपल्यावर ऋण नाही?... अरे, आपल्या पूर्वजांनी खस्ता खात खात, कष्ट करत करत अश्मयुगापासून अणुयुगापर्यंत वाटचाल केली.... म्हणून ना आपण ही विसाव्या शतकाची सुखं भोगतोय ?... त्यांचं आपल्यावर काहीच ऋण नाही ? [ वी. के निरुत्तर होऊन उभा आहे ] वी. के., मला कधी कधी प्रश्न पडतो...जर आपण कधी कोणाला अ—अ 'आईतला' म—म 'मक्यातला' शिकवणार नसू... तर ज्ञानेश्वरीवर आपला काय अधिकारंय रे ? ... तुकोबाची गाथा कोणत्या तोंडानी आपण आपली म्हणायची ? ( बराच वेळ सुन्न शांतता. )

ऊर्मिला : वी. के. सिगारेटय् ?

[ वी. के. सिगारेट देतो. पेटवतो. उर्मिला झुरका घेत ]

विचार करून करून डोकं फुटायची वेळ येते. वाटतं वेड लागेल वेड...

वी. के. : ( समजावणीच्या सुरात ) हे बघ... ज्या दुःखावर उपाय नाही ना... त्याचा विचार नाही करायचा.

ऊर्मिला : उपाय आहे रे. पण तुला नाही तो करायचा.

वी. के. : ( निक्षून ) मी तुला डायव्होर्स देणार नाही.

ऊर्मिला : नको देऊस. डायव्होर्स न देताही लग्न करता येतं. एवढं ऐश्वर्य पाहून कोणतीही मुलगी तयार होईल. आणि हिंदू कोड बिल सर्व धर्मांना लागू नाहीय... धर्म बदलून... नाही तरी तू देव, धर्म काही मानत नाहीसच...

वी. के : उर्मे, मी देव धर्म मानत नाही ... पण नीतिमूल्यं मानतो. मी व्यापारीय, कारखानदारंय ... पैशाच्या जोरावर डील करतो, सौदा करतो ... माणसांना विकत नाही घेत ... आणि ज्या बाईवर माझं प्रेम नाही ना, तिच्याबरोबर मी झोपूदेखील शकणार नाही ! लग्न कसं करू शकेन ? आणि मुख्य म्हणजे ऊर्मी ... पैशाच्या लोभानं एखादी बाई तयार होईल ... पण ती स्वतःचं मूल तुला कसं देईल ?

ऊर्मिला : खरंय रे, कोणीही आई आपलं मूल दुसरीच्या ओटीत घालणार नाही !

**बी. के.** : उर्मे, यावर साधा उपाय...अनाथाश्रमात जाऊन तुला आवडेल ते छान, गोंडस पोर आपण दत्तक घेऊ.

**ऊर्मिला** : ( तत्काळ ) नाही, बी. के. ते शक्य नाही !

**बी. के.** : काय शक्य नाही ?...अग तू कुत्र्या-मांजरावर देखील एवढं प्रेम करतेस, मुलावर नाही करू शकणार ?

**ऊर्मिला** : बी. के.—कुत्र्या-मांजरावर आपण भूतदयेनं प्रेम करतो... माणसांवर भूतदयेनं प्रेम करणं—माणसाचा अपमानय...कुत्र्या-मांजरावर आपण निरपेक्ष प्रेम करतो. कोणतेही आईबाप मुलावर निरपेक्ष प्रेम नाही करत ... आणि खरं सांगू...राजाच्या पासनं मी धसका घेतलाय...

**बी. के.** : राजाच्या पासनं धसका घेतलाय...का ?

**ऊर्मिला** : आई-वडील प्लेगच्या साथीत गेले म्हणून राजाला, त्याच्या दोघी बहिणींना माझ्या आईबाबांनी सांभाळलं. राजा आमच्याच घरात लहानाचा मोठा झाला. माझ्याचं आईला तो 'आई' म्हणायचा. माझ्याच बाबांना 'बाबा' म्हणायचा. आम्ही दोघंही स्वतःला सख्खी भावंडं समजायचो...तुला खोटं वाटेल बी. के.

**बी. के.** : काय ?

**ऊर्मिला** : हा राजा...लहानपणी इतका गुंड, व्रात्य, दांडगेखोर होता. नेहमी माझ्या खोड्या काढायचा, मला मारायचा...त्याच्यापुढे आई-बाबादेखील रडकुंडीला यायचे...पण एके दिवशी—

**बी. के** : एके दिवशी काय ?

**ऊर्मिला** : एके दिवशी दिवेलागणीला...परवचा म्हणून झाल्यावर राजानं अगदी सहज विचारलं—( भरून येते )—

**बी. के.** : काय विचारलं ?

**ऊर्मिला** : 'आई, मी आणि उमा दोघं बहीणभाऊ आहोत तर शाळेत आमचं आडनाव का वेगळं वेगळं लावतात ?'...आईच्या डोळयांत टच्चकन पाणी आलं... तिनं राजाला पोटाशी धरलं. आणि आडनाव का वेगळंय ते सांगितलं—बस... त्या दिवसापासून राजा एकदम बदलला. पुन्हा त्याने खाऊसाठी माझ्याशी भांडण केलं नाही. —शिल्लक राहील तर तो खायचा. माझ्याच पुस्तकावरनं तो अभ्यास करायचा...पण त्यानं कधी आईबाबांकडे हट्ट केला नाही. तो एकदम आज्ञाधारक, कामसू बनला...मी त्याची भाऊ म्हणून ओळख करून द्यायची... तो आवर्जून सांगायचा...'मानलेला भाऊ...' फक्त वेगळ्या आडनावामुळं मी एका सख्ख्या भावाला मेले रे बी. के...सख्ख्या भावाला मेले.... दहा वर्षं झाली बी के....भावाच्या नात्याने त्याने कधी विचारलं नाही—उर्मे, अजून तुझ्या घरात पाळणा का नाही ?

**वी. के. :** तरीच हा राजा नेहमी दबून, वाकून असतो. उर्मे तो तुझ्या आई-बाबांना — प्रेम, वागणूक सख्ख्या मुलासारखी मिळूनही—जन्मदाते नाही, तर अन्नदाते, उपकारकर्ते समजू लागला...

**ऊर्मिला :** आपला दत्तक मुलगा असंच समजू लागला तर ?

**वी. के. :** काळीज फुटून मरेन मी उर्मे...काळीज फुटून मरेन.

**ऊर्मिला :** खरंच रे, नातं कोणावर लादता येत नाही, ते रक्तात असावं लागतं... खरं तर आपल्या दोघांच्या रक्ताचं मूल आपल्याला हवंय...तसं होत नसेल तर, किमान कोणाच्या एकाच्या तरी रक्ताचं मूल हवं. जे तुझं नाही...माझंही नाही... ते आपलं म्हणून कसं सांभाळायचं ?

**वी. के. :** झालं तर, तू अनाथ मूल ॲडॉप्ट करू शकत नाहीस...मी दुसरी बायको करू शकत नाही...विषय संपला.

**ऊर्मिला :** विषय संपला...तरी प्रश्न नाही संपला.

**वी. के. :** उर्मे, प्रश्नपत्रिकेतले सर्वच प्रश्न सोडवायचे असतातच असं नाही. ( काही काळ शांतता ) अग टेस्टट्यूब बेबीचा शोध लागला तेव्हा किती आनंदलो होतो मी...अग तुझ्यात काय कमीय ? अपघातानं फक्त गर्भाशय काढून टाकावं लागलं...आपलं मूल टेस्टट्यूबमध्ये नऊ महिने वाढलं असतं...पण नाही— आपल्या हयातीत टेस्टट्यूब बेबीचा प्रयोग संपूर्ण यशस्वी होण्याची शक्यता नाही. आणि ...

**ऊर्मिला :** आणि काय ?

**वी. के. :** आणि...कोंबड्यांची अंडी उबवणारे इनक्युबिटर असतात तसं ह्युमन इनक्युबेटर उपलब्ध नाही.

[ ऊर्मिला एकदम उभी राहते. ]

**ऊर्मिला :** उपाय सापडला रे वी. के....उपाय सापडला.

**वी. के. :** काय ?

**ऊर्मिला :** हे बघ, अनाथ मूल आणायला नको. दुसरं लग्नही करायला नको.... फक्त सौदा करायचा.

**वी. के. :** कसला ?

**ऊर्मिला :** स्वतःचं मूल असायला आपल्याला कमतरता कशाचीय ? ... दोष नसलेल्या एका स्त्री देहाची...

**वी. के :** बरं मग ?

**ऊर्मिला :** सौदा करायचा... थोड्याश्या पैशासाठी वेश्या रात्रीपुरतं शरीर भाड्यानं देतेच...आपण दीड-दोन वर्षांसाठी तिला भाड्यानं घ्यायचं.

**वी. के. :** शी...घाण...

**ऊर्मिला :** काय घाण ? धंदा करते यापलीकडे तिच्या शरीरात काय दोष असतो...

**बी. के. :** अग...वेश्येचं मूल तू ॲडॉप्ट करशील ?

**ऊर्मिला :** अरे, ते तिचं असणार कुठे ? ती एक ह्युमन इनक्युबेटर. [illegible] तिच्या गर्भाशयात आपलं मूल वाढवलं समजायचं.

**बी. के. :** छीः काहीतरीच... काहीतरीच...

**ऊर्मिला :** उलट ते मूल खऱ्या अर्थानं माझं असेल. जरी तिच्या शरीरातून जन्माला येणारं असलं तरी, ते माझ्या इच्छेने जन्माला येणार आहे. आणि ती बाई त्याच्यावर हक्क सांगू शकणार नाही. कारण ती सौदा करणारंय—

**बी. के. :** (पिसाळून ओरडतो) चूप बस—चूप बस—मूर्खासारखं काहीतरी घाणेरडं बोलू नको. खुळचट, वेडी होत चाललीयस तू वेडी ..तू वेडी होशील आणि मलाही वेडं करशील–वेडं करशील—

[बी. के. ओरडत असतानाच अंधार होतो. रिवॉल्विंग फिरायला लागते. फ्लॅश बॅक संपतो. पुन्हा पूर्ववत प्रकाश. राजा सुन्न होऊन बसला आहे.]

(प्रवेश दुसरा समाप्त)

## प्रवेश तिसरा

[फ्लॅश बॅक संपतो पूर्ववत प्रकाश. सिटिंगरूममध्ये राजा, बी. के. बसलेले आहेत, राजा सुन्न भानावर येतो नि बोलायला लागतो.]

**राजा :** बी के., मी कुठंतरी वाचलं होतं. जगाची प्रगती आणि विकास शहाण्यांनी नाही... वेड्यांनी केला. खूप वेड्यांना खूप वर्षे वाटलं आपण उडावं. त्यांनी विमान शोधलं... माशासारखं पाण्यात खेळावं, त्यांनी पाणबुडी शोधली.

**बी. के. :** तशीच या निपुत्रिक वेड्या ऊर्मीच्या डोक्यात ह्युमन इनक्यूबेटरची कल्पना आली.

**राजा :** अतिशय चांगली कल्पना...व्यवहार्य कल्पना

**बी. के. :** काय बोलतोस काय तू ?

**राजा :** अगदी बरोबर बोलतोय. ती स्वतः काही शास्त्रज्ञ नाही. आणि तिच्या आयुष्यात टेस्टट्यूब बेबीचा शोध संपूर्ण सिद्धीस जाणार नाही...तेव्हा तिनं विचार केला, आपलं मूल काचेच्या नळीत वाढवायच्या ऐवजी... दुसऱ्या स्त्रीच्या गर्भाशयात वाढवावं... त्याबद्दल तिला भाडं द्यावं... खलास !

**बी. के.** : काय भीषण बोलतोस रे ?

**राजा** : काय भीषणय् ? हे बघ, प्रत्येक काळामध्ये काही कल्पना भीषण वाटतात... त्या भीषण असतातच असं नाही. जुन्या लोकांना गर्भपात किती भीषण वाटायचा ? आपल्याला नियोग भीषण वाटतो.

**बी. के.** : नियोग काय भानगडय् ?

**राजा** : तुला माहीत नाही ?... आपल्या धर्मशास्त्राप्रमाणे प्रत्येक स्त्रीचा मातृत्वाचा हक्क मान्य करण्यात आला होता. एखाद्या स्त्रीला नवऱ्यापासून मूल होत नसेल, तर पुत्रप्राप्तीपुरती दुसऱ्या पुरुषाबरोबर संबंध ठेवायची तिला परवानगी होती.... आणि विशेष म्हणजे, तिच्या इच्छेमुळे ते मूल जन्माला यायचं म्हणून ते तिच्या... तिच्या नवऱ्यांच्याच नावाने ओळखले जायचं... कौरव, पांडव काय आहेत ?... हे असेच.

**बी. के.** : घाण... घाण कल्पना वाटते.

**राजा** : कारण आपल्यातला पुरुष. कुटुंब व्यवस्था प्रस्थापित झाली नि जे पुरुषाचं वर्चस्व स्थापन झालं... की त्यांनी मुलं देखील स्वतःच्या एकट्याच्या नावे घोषित केली.

**बी. के.** : म्हणजे ?

**राजा** : पूर्वी... फार न्यायी मंडळी होती हं ती. कुळी फक्त बापाची, मुलं ओळखली जायची आईवरनं... गांगेय... गंगेचा मुलगा. राधेय... राधेचा मुलगा. कौंतेय... कुंतीचा मुलगा.

**बी. के.** : तरी पण... रांडेपासून मूल...

**राजा** : पुन्हा पुरुष... बी. के. डॉक्टरचं स्त्रीलिंगी रूप काय ?

**बी. के.** : डॉक्टरीण.

**राजा** : साहेबाचं स्त्रीलिंगी रूप काय ?

**बी. के.** : मेमसाहेब.

**राजा** : रांडेचं पुल्लिंगी रूप काय ?

[बी. के. विचारात पडतो.]

नाही ! कारण बाई चारजणांबरोबर झोपली की ती रांड... ... ... पुरुष झोपला तर ?... चालतं. त्याला शिवी नाही... कारण पुरुषी समाज.

**बी. के.** : म्हणायचं काय तुला ?

**राजा** : इतकंच... रांड ही कल्पना डोक्यातून काढून टाक. त्या बाईला...

**बी. के.** : कोण बाई ?

**राजा** : जी तू आणणार आहेस...तिला तू टेस्टट्यूब समज. ह्यूमन इनक्यूबेटर ... म्हणजे तुला घाण वाटणार नाही.

**बी. के :** पण मी नाहीं... मी नाही अशी बाई आणणार.

**राजा :** मग असं कर...

**बी. के. :** काय ?

**राजा :** मला तुझा ट्रस्टी कर. कारण, ऊर्मी तर वेडी होत चाललीय ... भिंती काय रंगवते, दुधाचा काय वास घेते, खेळणी काय तोडते... भयंकर चाईल्डसिक झालीय...तेव्हा ती ठार वेडी होणारच—मग पाठोपाठ तू ... तेव्हा तुझ्या इस्टेटीची मी देखभाल करीन... ( उठून जायला निघतो. )

**बी. के. :** —राजा, ऊर्मी वेडी होईल ही कल्पनाच भीषण वाटते रे.

**राजा :** कोणती कल्पना जास्त भीषण, ती तू ठरव. ऊर्मी वेडी होणार ही... का बाई आणायची ही ?

**बी. के. :** ( विचारात पडत )—पण कोण बाई तयार होणार ? मी कधी बदफैलीपणा केलेला नाही...

**राजा :** आपल्या ॲडव्हरटाईजिंग मॅनेजरला सांग—त्याला चांगल्या माहितीयत सोफिस्टिकेटेड कॉलगर्ल्स्...

**बी. के. :** नको, कॉलगर्ल नको. त्या हायर सर्कलमध्ये हिंडतात.

**राजा :** म्हणजे तुझ्या सर्कलमध्ये.

**बी. के. :** हो रे ! उगाच चारचौघांत बभ्रा व्हायचा...पुन्हा सालीनं नंतर ब्लॅकमेल केलं तर पंचाईत.

**राजा :** ठीक,...मी तपास करतो. अनेक क्रिमिनल साईडचे वकील दोस्तयत माझे... त्यांना विचारीन. एकदम थर्डक्लास दर्जाची, जी आमच्या सर्कलमध्ये हिंडत नाही अशी रांड कोणत्या कुंटणखान्यात, कोठ्यात भेटेल...

... अंधार ...

[ रिवॉल्विंग फिरायला लागते. ]

प्रवेश तिसरा समाप्त

## प्रवेश चौथा

[ धूसर मंद प्रकाशात मर्गीचा कोठा दिसू लागतो. घुंगरा-तबल्याचे आवाज. दरवाज्यावर टकटक. आतून थोडा हँग ओव्हर, थोडी डोळ्यावर झोप असलेली अस्ताव्यस्त कपड्यातली पोरसवदा देखणी वेश्या येते. दरवाजा उघडते. ]

**छंदा :** ( जांभई देत ) सेठ, इतक्या रात्रीचं आलात ?

**बी. के. :** ( आत येत बसत ) का, इथं सकाळीही माणसं येतात का ?

**छंदा :** ( सहजपणे ) येतात की, दूधवाला भैया येतो. बिल्डिंगचा भंगी येतो — ( फतकल मारून कोचावर बसते. )

**राजा :** ते माहितीय...घरात तू एकटीच का !

**छंदा :** सेठ याला घर नाय—मर्गीचा कोठा म्हणतात...माझ्यासारख्या धा पोरी हायती इथं—

**राजा :** मग बाकीच्या दिसत नाहीत कुठं ?

**छंदा :** गेल्यात गिऱ्हाइकांबरोबर—जागा लहान पडते ना, म्हणून फुलनाईटची गिऱ्हाइकं घेऊन साऱ्या पोरी बाहेर जातात...

**राजा :** तुला कोणी गिऱ्हाईक नाही भेटलं का ?

**छंदा :** सेठ, माझ्यासाठीच गिऱ्हाइकं इथं येतात. माझ्याइतकी सुंदर पोरगी साऱ्या मोहोल्ल्यात नाही !

**राजा :** मग—तू कशी इथं—कोठ्यावर ?

**छंदा :** आजचा दिवस मी धंदा करत नाय ...माझ्या देवाचा दिवसय आज --

**राजा :** देवाशी बराच जवळचा संबंध दिसतो तुझा.

**छंदा :** व्हय तर—त्याची बायको लागत्ये मी.

**बी. के. :** ( चमकून ) बायको ?

**छंदा :** व्हय मग, मुरळी हाय मी. खंडेरायाशी माझं लगीन लागलंय ..बारा वर्सं झाली—आजच्या दिवसालाच त्याचं माझं लग्न झालं—म्हणून मी आज धंधा करत नाय...

**बी. के. :** (कुत्सिततेने) बारा वर्सं ! संसार कसा काय चाललाय ?

**छंदा :** चांगला चाललाय की—तो बसलाय तिकडं देवळात दगड होऊन—मी पडलीया ईथं कोठ्यात रांड बनून...

**बी. के. :** ( सहानुभूतीने ) नाव काय तुझं ?

**छंदा :** छंदिता—

**बी. के. :** आईबापानी किती सुंदर नाव ठेवलंय...

**छंदा :** ( हसून ) सेठ, जे आईबाप आपल्या पोरींची नावं छंदिता, रुपाली, चैताली ठेवतात ना त्या आईबापांच्या पोरी आमच्यासारख्या रांडा नाय होत—बंगलेवाल्या लोगांशी लगीन करतात त्या—हे माझं नाव अम्मानं ठेवलंय...

**बी. के. :** किती दिवस झाले, इथं कोठ्यावर येऊन ?

**छंदा :** झालं की सा महिनं.

**बी. के. :** सहाच महिने ना ?—

छंदा : म्हणून काय मी नवी पोरगी नाय हां—कोणत्याही गिऱ्हाइकाला खूष करते-—बारा वर्षं धंदा करतीया मी आज—

वी. के. : बारा वर्षं ?...अग तुझं वय तरी किती ?

छंदा : (बेफिकीरपणे) कुणास ठावं ? आता न्हाण येऊन झाल्या सात दिवाळ्या...

राजा : म्हणजे वयाच्या दहाव्या बाराव्या वर्षापासनं धंदा करतेस ?

वी. के. : इतक्या कोवळ्या वयात—कोणा, नीच हलकटानं धंद्याला लावली ग तुला !

छंदा : (अर्धवट झोपेतच तंबाखू मळत) हाय एक रांड नि एक सोद्या—

वी. के. : कोणय ? सांग तर खरं ?

छंदा : सांगून काय उपेग ? माझीच आय नि माझाच बाप...

वी. के : तुझ्या स्वतःच्या आईबापांनी तुला मुरळी केली. धंद्याला लावली.

छंदा : किडं किडं पडून मरतील साले—जाऊन दे. आपली जिंदगी तर खराब झाली—आता फिटफिट करून काय उपेग ? (उठत—चुटक्या वाजवत) चला सेठ, उद्याच्याला या—अन् कोन बी एकानंच या—एकाच टायमाला दोन दोन गिऱ्हाइकांना घेत नाय मी ... (उभ्या उभ्या फणीनं केस विंचरायला लागते.)

वी. के. : (राजाला) राजा, याच मुलीला घेऊन जायचं—

राजा : दुसऱ्या मुली नाही पाहायच्या ?

वी. के. : नाही—(दगडांशी बांधलं गेलेलं हिचं नशीब नोटांशी बांधलं जाऊ दे. दोन्ही निर्जीव असले तरी, दगडाच्या देवापेक्षा नोटा जास्त कामी येतात माणसाच्या)—तू जा—खाली थांब.

[ राजा जातो. ]

वी. के. : ए, छंदा—उद्या बाहेर येशील ? थोड्या दिवसांसाठी ?

छंदा : आम्माला इचारलं पायजेल—किती रोजासाठी बाहेर चलायचं ?

वी. के. वर्षा-दीडवर्षासाठी.

छंदा : वरीस-दीडवरीस इथला धंदा सोडून यायला तू काय लाख रुपये मोजणारयस ?

वी. के. : मोजीन—लाख रुपये मोजीन.

छंदा : (झोप उडत.) ए सेठ, तू पियेलायस का' ?

वी. के. : (शांतपणे) नाही.

छंदा : मग तू पागलयस ?

वी. के. : नाही.

छंदा : लाख रुपयं—उभ्या जिंदगीत पायलंस का ?

**बी. के.** : रोज पाहतो.

**छंदा** : चल चल—रस्ता सुधार. लाख रुपये रोज पाहणारी माणसं अशी कोठ्यावर नाय येत...फिल्लमच्या नट्यांकडे जातात. [बी. के. खिशातून पाच पाच हजारांची दोन बंडलं काढून तिच्या पुढ्यात फेकतो. छंदा चमकते. एकदा नोटांकडे, एकदा बी. के. कडे पाहत राहते.]

**छंदा** : सेठ, तू फिल्लमवालाय ?

**बी. के.** : नाही.

**छंदा** : मग तू स्मगलर—हाय ना ?

**बी. के.** : हूं......

**छंदा** : वाटलंच मला...दुसरा कोण गाढव रांडसाठी लाखभर रुपय खर्च करणार ?—सेठ, पिनार का ?—इलायती नाय, गवरमेंटचीय...

**बी. के.** : नको.

**छंदा** : मग चाय चालेल ?

**बी. के.** : चालेल...

**छंदा** : हे बरं हाय...अमीर असो नायतर फकीर...चाय सगळ्यांना चालतो. ( आत डोकावत— ) ए अम्मा, तू काय लोळते उकिरड्यातल्या गाढवीवानी... उठ, सेठ लोग आलेत.

[ आतून पन्नाशीला आलेली ओंगळ, घाणेरडी अम्मा आळस देत बाहेर येते. ]

**अम्मा** : सलाम सेठ...

**बी. के.** : सलाम.

**अम्मा** : छंदा आज धंदा नाय करत—दुसऱ्या पोरी नाहीती...मी चालल का ?

**छंदा** : ए बुढी, मुँह धों अपना ..साली म्हातारी घोंगडीवर निघालीय तरी खाज नाही जिरली. (अम्मा मिचमिच्या डोळ्यांनी पैशाकडे पाहते.)

**अम्मा** : हे काय ते ?

**छंदा** : पैसत... (अम्मा उचलायला वळते.) काय करते ?

**अम्मा** : मोजून बगते.

**छंदा** : नगो बोटं मोडतील तुझी जा आत जाऊन चा कर.

[अम्मा जाते.] सेठ, हे पैसे बक्षिसी म्हणून का ?

**बी. के.** : नाही. काम झाल्या शिवाय मी कोणाला बक्षिसी देत नाही !

**छंदा** : काय काम करायचं तुझं ? माल इकडचा तिकडं करायचा ? ... का पोलिसला डोळा घालायचा ?

**बी. के** : काम जरा अवघड आहे.

**छंदा** : किती अवघड राहू दे ..करीन.

बी. के. : मुलाला जन्म द्यायचा.
छंदा : (सहज) देईन—(एकदम किंचाळते) काय बोलला तू ?
बी. के. : मुलाला जन्म द्यायचा.
छंदा : कुणाच्या ?
बी. के. : माझ्या—
छंदा : आरं मड्या...मग रांडेवर कशाला उधळतोस लाख रुपये ? सरळ बायकू कर की. हजार बाराशेला बायको मिळल.
बी. के. : माझं लग्न झालंय... माझ्या बायकोला मूल होत नाही.
छंदा : अरे मग दुसरी बायको करायची.
बी. के. मला करायची नाहीए—
[छंदा क्षणभर गोंधळते. मग सहानुभूतीने]
छंदा : तुझ्यात काय कमीय का ? हकीमच्या दवा घेऊन बघ...
बी. के. : माझ्यात काहीही कमी नाही !
[ छंदा क्षणभर विचारात पडते. ]
छंदा : (शाहरत) नाय्...जमायचं नाय...मूल झालं म्हंजे जवानी उतरते. इथं कोण इचारणार मग आम्हाला ?
बी. के. : किती रुपयांची जवानी उतरेल ? पन्नास हजाराची ?
छंदा : पन्नास हजार म्हंजे आता दीड लाख रुपये झालं... पण वळण तुटलं ना धंद्याचं... गिऱ्हाइकाला बी आमी सवयीच्या होतो.
बी. के. : वळण सरळ करायला पंचवीस हजार पुरतील ?
छंदा : ( नकार देत ) छ्या ! तरी नाय जमायचं... पोराचं डोकं एवढं मोठं असतं... म्हैस बी इताना बोंबाटते... म्यां तर बाई माणूस... त्रास किती ?
बी. के. : आणखीन पंचवीस हजार दिले... त्रास कमी होईल ?
छंदा : तू एका पोराचे दोन लाख रुपये देणार मला ?... दोन लाख रुपये ?
बी. के. : होय... दोन लाख रुपये !
छंदा : फसवणार नाही ?
बी. के. : नाही...
छंदा : खा माझी आण...
( बी. के. चा हात स्वतःच्या डोक्यावर टेवते )
बी. के. : मी तुला मुलासाठी दोन लाख रुपये देईन.
[ छंदा एकदम हात झटकते, नि आत पाहात रडक्या आवाजात ओरडते. ]
छंदा : ए अम्मा, काल रातीला मी जरा ज्यादा प्याली का ग ?
अम्मा : ( आतून ) नाय ग बा ...

छंदा : मग का असा इचित्र इचित्र सपान पडतंय ?

[कोचावर छंदा लवंडते. बी. के. तिला उठवून उभा करतो.]

बी. के. : स्वप्न नाही हे... खरंच मी तुला पैसे देईन.

छंदा : (भानावर येत) – ठीकयू... कवा यायचं तुझ्याबरोबर ?

बी. के. : केव्हाही – आत्ता देखील !

छंदा : आता इतक्या रातीची कुठली बस टॅक्सी भेटायला.

बी. के. : खाली माझी गाडी उभीय.

छंदा : हां— पैसेवाला ना तू— गाडी— व्हाणारच. पण नेणार कुठं तू मला ?

बी. के : माझ्या घरी ...

छंदा. : तुझ्या घरी ? तुझी बायको झिंज्या उपटून बाहेर काढंल की मला.

बी. के. नाही ... आम्हा दोघांना मूल हवंय. तुला ती मोठ्या बहिणीसारखी संभाळेल... देवीसारखी स्त्रीय ती !

छंदा : (हात ओवाळत) कशी रं, तुझ्यासारख्या हलकट मुडद्याला देवीवानी बायकू मिळाली ?

बी. के. : आणि हे बघ, जरा चांगलं वागयचं-बोलायचं-माझ्या बायकोसारखं.

छंदा : आता काय वाईट वागले बोलले मी ?—काय फरकाय रे तुझ्या बायकूत नी माझ्यात ?

बी के. : खूप फरकय...तिला भेट म्हणजे पाहशील...

[अम्मा चहा आणून ठेवते.]

छंदा : ए अम्मा— माझी कापडं बांध बोचक्यात—मी चालले सेठबरोबर.

अम्मा : कितनी रोजासाठी ?

छंदा : वर्ष-दीडवर्षासाठी.

अम्मा : इतना दिन ?

छंदा : ए बूढी...बोंबाटू नको खालीपिली...तू काय इकत नाय घेतलं मला, का पळवून नाय आणलंस...माझ्या मर्जीने मी आले...माझ्या मर्जीने मी चालले... खोली राहू दे माझ्या नावानं...परत आल्यावर मला लागंल...

अम्मा : माझ्या खोलीचा किराय ?

छंदा : (एक बंडल देत) ठेव—दोन वर्षांचं भाडं अॅडव्हॉन्स...आणि हे बघ...हे आणखी पैसं घे. बेस्तरवारी मोहल्ल्यात लंगर खोल. वैराग्या, फकिरांना फुकट जेवण घाल...रस्त्यावरच्या भिकाऱ्यांच्या पोरांना कापडं वाट...(चहा पीत) सेठ, हे किती पैसं होतं ?—माझ्या पैशातनं कमी करून टाका—

बी. के. : मी तुला दोन लाख रुपयेच देईन—हे पैसे दानधर्मात गेले समज.

छंदा : चाललं—(निघता निघता थबकते—नि कळवळून)

**छंदा** : अम्मा, त्यातल्या शंभर रुपयांचा—

**अम्मा** : काय करू ?

**छंदा** : शंभर रुपयांचा निवद दाव माझ्या नवऱ्याला...तो बसलाय ना तिकडं देवळात दगड होऊन—म्हन त्याला, मुडद्या तुझ्या किरपेने तुझी बायको रांड म्हणून एका सेठबरोबर गेली—

[ छंदा हुंदका देते. नि एकदम अंधार ]

अंक पहिला समाप्त

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ पडदा उघडतो. पांचगणीचा बी. के. चा बंगला दिसू लागतो. बंगला हवेशीर आणि प्रशस्त. पण फारसे इंटीरियर केलेले नाही, अथवा झगमगाट नाही. पावसाळ्याचे दिवस. कुंद वातावरण. अस्वस्थ आणि विमनस्क ऊर्मिला, एकटीच दिवाणखान्यात बसली आहे. गाडी पोर्चमध्ये आल्याचा आवाज. राजा दरवाजा उघडून आत येतो. . .पाठोपाठ बहादूर. राजाला ऊर्मिला बंगल्यात आहे याची कल्पना नाही. ]

**राजा** : बहाद्दूर,. . .सामान वर नेऊन ठेव. साहेबांचं साहेबांच्या खोलीत आणि पाहुणीचं गेस्टरूममध्ये. . .आणि फक्कडपैकी चहा टाक.

**बहाद्दूर** : साहेब, ही पाहुणी कोण ?

**राजा** : ( क्षणभर थबकत ) पाहुणी ? साहेबांच्या मित्राची धाकटी बहीण. तिच्या डोक्यावर थोडा परिणाम झालाय. वागणं बोलणं धड नाही. . .पाच सहा महिने विश्रांतीसाठी इथं राहणार आहे.

[ बहाद्दूर नुसता गप्प उभा. त्याचा विश्वास बसलेला नाही. ]

का रे,. . .काय आणखीन चौकशी करायचीय् ?

[ बहाद्दूर नुसती नकारार्थी मान हलवतो. ]

नोकर माणसांनी नसत्या चौकशा करू नयेत. जा—

[ बहाद्दूर जातो आणि कोट काढत, शीळ वाजवत राजा कोचावर बसायला लागतो. आणि समोर ऊर्मिलाला पाहतो. एकदम बावरून उभा राहतो. ]

**राजा** : उमा, तू कशी इकडं ?

**ऊर्मिला** : ( उद्वेगाने ) का ? स्वतःच्याच घरी यायला मला बंदीय् का ?

**राजा** : ( चाचरत ) नाही. असं कुठं म्हणलं मी ?

[ राजा बसतो. वातावरणात विलक्षण तणाव. ]

**ऊर्मिला** : ( तिरक्या सुरात ) पाहुणीच्या सेवेला बहादूरला आणलंस !

**राजा** : हो. बहादूर आणि म्हातारी माळीण !

**ऊर्मिला** : या दोघांना काय इथलं सगळं काम झेपणारंय ?

**राजा** : मॅडम...येणाऱ्या पाहुणीला सेवकांची नाही फक्त सोबतीची गरज आहे. आणि बी. के. ची गरज, फक्त कोणीतरी पाहुणीवर लक्ष ठेवणे.

**ऊर्मिला** : (प्रत्येक शब्दावर जोर देत) पाहुणीवर लक्ष द्यायला मी आहे की इथं...

**राजा** : (चमकून) म्हणजे तू इथंच राहणार ?

**ऊर्मिला** : का ? तुझी काय हरकतय् ?

**राजा** : (वरमून) हरकत घेणारा मी कोण ?

[बराच वेळ सुन्न शांतता.]

**ऊर्मिला** : तुझ्यावर काय कामगिरी सोपवलीय ?

**राजा** : नेहमीप्रमाणेच, कायदेशीर सल्लागाराची बेकायदेशीर कामे! तुझा पासपोर्ट तिच्या नावाने, तिचा पासपोर्ट तुझ्या नावाने...

**ऊर्मिला** : काय, प्लॅन काय केलाय बी. के. ने ?

**राजा** : प्लॅन असा की, पाहुणीला...

**ऊर्मिला** : (मध्येच तोडत) नाव काय म्हणालास पाहुणीचं ?

**राजा** : छंदिता.

**ऊर्मिला** : दिसायला कशीय ?

**राजा** : छान ! पण तुझ्याइतकी सुंदर नाही.

**ऊर्मिला** : पण माझ्यापेक्षा तरुण आहे, नाही का ?

**राजा** : हा निव्वळ योगायोग. तुझ्यानंतर जन्माला आली म्हणून ती तुझ्यापेक्षा तरुणय् एवढंच. (विषय बदलत) तर प्लॅन, असाय उमा. या छंदाला दिवस गेले, की तुम्हा दोघींना सरळ स्वित्झर्लंडला पाठवायचं. तिकडच्या मॅटर्निटी होममध्ये तुझं नाव तिचं म्हणून लावलं जाईल...(उगाच हसत) मग तिथून तुम्ही एकदम बी. के. खानदानच्या तीन महिन्याच्या वारसाला घेऊन परत यायचं. म्हणजे उद्या जगाला कधीही कळणार नाही, की हे मूल—

[ऊर्मिला निर्विकार. राजा अस्वस्थपणे सिगारेट ओढत बसतो.]

**ऊर्मिला** : (एकदम) राजा, मी आयुष्यातली मोठी घोडचूक तर नाही ना केलेली ?

**राजा** : उमा, तू जरी चुकलीस, तरी बी. के. कधी चुकायचा नाही.

**ऊर्मिला** : खात्री आहे. पण—अजून विश्वास नाही बसत. कधी कधी वाटतं हातचं सोडून पळत्याच्या पाठीमागे तर मी लागले नाही ?

**राजा** : उमा, आपल्याजवळ नसलेलं काही मिळवायचं झालं, की थोडी फार कॅलक्युलेटेड रिस्क घ्यावीच लागते.

**ऊर्मिला :** ही कसली कॅलक्युलेटेड रिस्क ? आयुष्याची रिस्क—

**राजा :** बी के. नं नाही घेतली...

**ऊर्मिला :** तो एकदा काय...हजारवेळा आयुष्य पणाला लावू शकतो. एकदा उद्ध्वस्त झाला तरी पुन्हा उभा राहू शकतो.

[ बराच वेळ सुन्न शांतता. ऊर्मिला सिगारेट पेटवते आणि थोडी ट्रान्समध्ये जाऊन बोलायला लागते. ]

**ऊर्मिला :** परवा सुमी सोमणकडे गेलेते...किती केलं रे तिने, स्वतःच्या घरासाठी, नवऱ्यासाठी ! आणि हा पाच मुलांचा बाप, चक्क आपल्या स्टेनोच्या प्रेमात पडला. सुमी अगदी कासावीस होत माझ्याकडे आली. बी. के. ला सांगून तडकाफडकी त्या स्टेनोची बदली मी बंगलोरला करून टाकली.

**राजा :** पुढं काय झालं ?

**ऊर्मिला :** कुठं काय ? दोन दिवसानं जणू काय घडलंच नाही...अशा आनंदा-उत्साहात सुमीचा संसार पुन्हा सुरू. तरी मी तिला विचारलं. ' सुमे, तुझ्या नवऱ्याच्या प्रेमप्रकरणाचा तुला काही संताप नाही आला ? '

**राजा :** सुमी काय म्हणाली ?

**ऊर्मिला :** संताप कसला यायचा; माझा नवरा खरंच तिच्या प्रेमात पडला असता तर त्यानं मला सोडून नसतं का दिलं ? त्याचं खरं प्रेम माझ्या-वरचंय. स्टेनोवर केलं ते चोरटं प्रेम.

**राजा :** ( हसून ) चोरटं प्रेम ?

**ऊर्मिला :** हो—आणि ती म्हणाली, हे चोरटं प्रेम प्रत्येक पुरुषाला हवंहवंसं वाटतं. कारण त्यात ' थ्रिल ' असतं. एकतर त्याची कधी पूर्तता होत नाही म्हणून ते कधी संपत नाही...खरं प्रेम काय लग्न झाल्या झाल्याच संपतं. मेहबूब आणि मेहबूबा एकदम नवरा बायको होतात. मनधरणी संपते, गोड गोड स्वप्नं संपतात, धुंदी संपते, रोख–ठोक व्यवहार सुरू होतो, दुधाचा भाव १० पैशानं वाढला की पहिली कपात बायकोच्या गजऱ्यांमध्ये ! म्हणून प्रत्येक पुरुष दोन प्रेमं करतो. खरं प्रेम संसारासाठी, स्थैर्यासाठी, बायका-मुलांसाठी. आणि चोरटं प्रेम निव्वळ दोन घटकेच्या आनंदासाठी.

**राजा :** ( हसत ) गुरू.....गुरूय, तुझी सुमी सोमण !

**ऊर्मिला :** या चोरट्या प्रेमात खरंच ' थ्रिल ' असेल ना, तर मला बी. के.ला जपलं पाहिजे !.....एखादा माणूस अल्कोहोलला ॲडिक्ट असतो ना, तसा बी. के. ' थ्रिल 'ला ॲडिक्ट आहे. त्याला आयुष्यात, अगदी धंद्यातसुद्धा—सतत काहीतरी ' थ्रिल ' पाहिजे असतं.

**राजा :** उमा, सुमीची फिलॉसॉफी ॲडॉप्ट कर. जरी बी. के. चोरटं प्रेम करू

**राजा :** मॅडम...येणाऱ्या पाहुणीला सेवकांची नाही फक्त सोबतीची गरज आहे. आणि बी. के. ची गरज, फक्त कोणीतरी पाहुणीवर लक्ष ठेवणे.

**ऊर्मिला :** (प्रत्येक शब्दावर जोर देत) पाहुणीवर लक्ष द्यायला मी आहे की इथं...

**राजा :** (चमकून) म्हणजे तू इथंच राहणार ?

**ऊर्मिला :** का ? तुझी काय हरकतय् ?

**राजा :** (वरमून) हरकत घेणारा मी कोण ?

[ बराच वेळ सुन्न शांतता. ]

**ऊर्मिला :** तुझ्यावर काय कामगिरी सोपवलीय ?

**राजा :** नेहमीप्रमाणेच, कायदेशीर सल्लागाराची बेकायदेशीर कामे ! तुझा पासपोर्ट तिच्या नावाने, तिचा पासपोर्ट तुझ्या नावाने...

**ऊर्मिला :** काय, प्लॅन काय केलाय बी. के. ने ?

**राजा :** प्लॅन असा की, पाहुणीला...

**ऊर्मिला :** (मध्येच तोडत) नाव काय म्हणालास पाहुणीचं ?

**राजा :** छंदिता.

**ऊर्मिला :** दिसायला कशीय ?

**राजा :** छान ! पण तुझ्याइतकी सुंदर नाही.

**ऊर्मिला :** पण माझ्यापेक्षा तरुण आहे, नाही का ?

**राजा :** हा निव्वळ योगायोग. तुझ्यानंतर जन्माला आली म्हणून ती तुझ्यापेक्षा तरुणय् एवढंच. (विषय बदलत) तर प्लॅन, असाय उमा. या छंदाला दिवस गेले, की तुम्हा दोघींना सरळ स्वित्झर्लंडला पाठवायचं. तिकडच्या मॅटर्निटी होममध्ये तुझं नाव तिचं म्हणून लावलं जाईल...(उगाच हसत) मग तिथून तुम्ही एकदम बी. के. खानदानच्या तीन महिन्याच्या वारसाला घेऊन परत यायचं. म्हणजे उद्या जगाला कधीही कळणार नाही, की हे मूल—

[ ऊर्मिला निर्विकार. राजा अस्वस्थपणे सिगारेट ओढत बसतो. ]

**ऊर्मिला :** (एकदम) राजा, मी आयुष्यातली मोठी घोडचूक तर नाही ना केलेली ?

**राजा :** उमा, तू जरी चुकलीस, तरी बी. के. कधी चुकायचा नाही.

**ऊर्मिला :** खात्री आहे. पण—अजून विश्वास नाही बसत. कधी कधी वाटतं हातचं सोडून पळत्याच्या पाठीमागे तर मी लागले नाही ?

**राजा :** उमा, आपल्याजवळ नसलेलं काही मिळवायचं झालं, की थोडी फार कॅलक्युलेटेड रिस्क घ्यावीच लागते.

**ऊर्मिला :** ही कसली कॅलक्युलेटेड रिस्क ? आयुष्याची रिस्क—

**राजा :** बी के. नं नाही घेतली...

**ऊर्मिला :** तो एकदा काय...हजारवेळा आयुष्य पणाला लावू शकतो. एकदा उद्ध्वस्त झाला तरी पुन्हा उभा राहू शकतो.

[ बराच वेळ सुन्न शांतता. ऊर्मिला सिगारेट पेटवते आणि थोडी ट्रान्समध्ये जाऊन बोलायला लागते. ]

**ऊर्मिला :** परवा सुमी सोमणकडे गेलेते...किती केलं रे तिने, स्वतःच्या घरासाठी, नवऱ्यासाठी ! आणि हा पाच मुलांचा बाप, चक्क आपल्या स्टेनोच्या प्रेमात पडला. सुमी अगदी कासावीस होत माझ्याकडे आली. बी. के. ला सांगून तडकाफडकी त्या स्टेनोची बदली मी बंगलोरला करून टाकली.

**राजा :** पुढं काय झालं ?

**ऊर्मिला :** कुठं काय ? दोन दिवसानं जणू काय घडलंच नाही...अशा आनंदा-उत्साहात सुमीचा संसार पुन्हा सुरू. तरी मी तिला विचारलं. ' सुमे, तुझ्या नवऱ्याच्या प्रेमप्रकरणाचा तुला काही संताप नाही आला ? '

**राजा :** सुमी काय म्हणाली ?

**ऊर्मिला :** संताप कसला यायचा; माझा नवरा खरंच तिच्या प्रेमात पडला असता तर त्यानं मला सोडून नसतं का दिलं ? त्याचं खरं प्रेम माझ्या-वरचंय. स्टेनोवर केलं ते चोरटं प्रेम.

**राजा :** ( हसून ) चोरटं प्रेम ?

**ऊर्मिला :** हो—आणि ती म्हणाली, हे चोरटं प्रेम प्रत्येक पुरुषाला हवंहवंसं वाटतं. कारण त्यात ' थ्रिल ' असतं. एकतर त्याची कधी पूर्तता होत नाही म्हणून ते कधी संपत नाही...खरं प्रेम काय लग्न झाल्या झाल्याच संपतं. मेहबूब आणि मेहबूबा एकदम नवरा बायको होतात. मनधरणी संपते, गोड गोड स्वप्नं संपतात, धुंदी संपते, रोख—ठोक व्यवहार सुरू होतो, दुधाचा भाव १० पैशानं वाढला की पहिली कपात बायकोच्या गजऱ्यांमध्ये ! म्हणून प्रत्येक पुरुष दोन प्रेमं करतो. खरं प्रेम संसारासाठी, स्थैर्यासाठी, बायका-मुलांसाठी. आणि चोरटं प्रेम निव्वळ दोन घटकेच्या आनंदासाठी.

**राजा :** ( हसत ) गुरू.....गुरूय, तुझी सुमी सोमण !

**ऊर्मिला :** या चोरट्या प्रेमात खरंच ' थ्रिल ' असेल ना, तर मला बी. के.ला जपलं पाहिजे !.....एखादा माणूस अल्कोहोलला ॲडिक्ट असतो ना, तसा बी. के. ' थ्रिल 'ला ॲडिक्ट आहे. त्याला आयुष्यात, अगदी धंद्यातसुद्धा—सतत काहीतरी ' थ्रिल ' पाहिजे असतं.

**राजा :** उमा, सुमीची फिलॉसॉफी ॲडॉप्ट कर. जरी बी. के. चोरटं प्रेम करू

लागला तरी ते संपेल.

**ऊर्मिला** : बी. के. म्हणजे काय सुमी सोमणचा नवरा नाही.

**राजा** : ( उठत ) काय तुम्हा नवरा बायकोची लॉजिकं—माझ्या आकलन शक्तीपलीकडची आहेत. आधी तूच त्याच्या पाठीमागे लकडा लावलास, 'बाई आण !' आणि आता त्या बाईच्या प्रेमात पडू नये म्हणून हा ठेका, कठीणय्...

**ऊर्मिला** : तिला घरी न आणता इकडं का ठेवावसं वाटलं बी. के. ला ?

**राजा** : मूर्ख बये, कुठं हाकबोंब व्हायला नको म्हणून ही निर्जन जागा निवडलीय. आठवड्यातनं एकदा केव्हातरी चक्कर टाकली की काम झालं. हिला तुझ्या मुंबईच्या बंगल्यावर ठेवलं असतं, तर तुझा पपल्या देखील बाहेर गावभर जाऊन भुंकला असता, 'आमच्या मालकानं बाई ठेवलीय' म्हणून !

**ऊर्मिला** : पण बी. के. एकदम तिच्याविषयी सहानुभूतीनं का बोलला ?

**राजा** : अगं बी. के. लाच काय, कोणाही सहृदय माणसाला तिच्याविषयी सहानुभूती वाटेल. दगडाशी लग्न लावून आईबापानीच बाराव्या वर्षी धंद्याला लावलेली पोर—

**ऊर्मिला** : तिला नको होतं निवडायला. जिच्याविषयी काहीही कणव, प्रेम वाटणार नाही...अशी मुलगी निवडायला पाहिजे होती. (सहानुभूतीचं प्रेमात रूपांतर व्हायला वेळ नाही लागत.)

**राजा** : घाबरू नकोस. सुरवातीला वाटली खरी सहानुभूती—पण आता बी. के. ने मध्येच तिला लाथ मारून हाकलून नाही दिली म्हणजे मिळवली.

**ऊर्मिला** : का ?

**राजा** : अग ती काय बाईय ? माणूसय ? जेन्युईन, ह्यूमन इनक्युबेटर. भाडोत्री मादीदेह ! स्त्रीत्वाचा थोडाही लवलेश नाही. फक्त पैसा, पैसा, पैसा. बी. के. तिला म्हणाला, आधी तुला डॉक्टरकडनं तपासून घेईन, तर ती म्हणते म्युनिसिपालटीच्या इस्पितळात जाऊ.

**ऊर्मिला** : म्युनिसिपालटीचं इस्पितळ ?

**राजा** : हो. म्हणजे फुकट तपासणी होईल ! खाजगी डॉक्टरकडून तपासून घेतलं तर पैसे तुम्ही द्यायचे...माझ्या दोन लाखातनं कमी करायचे नाहीत.

**ऊर्मिला** : स्वतःच्या मुलापेक्षा तिला दोन लाख रुपये मोठे वाटतात...

**राजा** : ( वाक्य मध्येच तोडत ) मोठे ? अगं मला तर वाटतं, नोटा पाहाताच ती वेडी होईल. आणि तिचं बोलणं इतकं व्हल्गर की अक्षरशः चार तासांत बी. के. कंटाळला. म्हणाला—

**ऊर्मिला** : काय ?

**राजा** : ( थोडे चाचरत ) म्हणाला....हिच्याबरोबर रात्र काढायची म्हणजे शिक्षाच. हिची बेडरूम म्हणजे जेल वाटेल जेल ! अगं, तिच्याकडे धड कपडे नाहीत. वी. के. म्हणाला चार चांगले ड्रेसेस घे. तर ही भररस्त्यात मोठ्यांदा म्हणते–' करायची काय कापडं ? रोज उतरायची तर असतात ! !' हॉरिबल...अखेर नवीन कपडे घ्यायला तयार झाली. पुन्हा अट...

**ऊर्मिला** : काय ?

**राजा** : पैसे तुमचे. माझ्या दोन लाखातून कापायचे नाहीत.

[ दोघेही खळखळून हसतात. थोडा वेळ शांतता. आणि राजा ]

**राजा** : ( एकदम ) तर उमा...तू काही काळजी करू नकोस. एखादं अस्वल नाहीतर माकडच तिच्या प्रेमात पडू शकेल—माणूस नाही. तेव्हा तू इथं राहायची काही गरज नाही !

**ऊर्मिला** : मी इथंच राहणार !

**राजा** : ( वैतागून ) आता तुला कसं समजावून सांगू ? आमचे थोरले चिरंजीव जरा थोडे मोठे झाले आणि आमची झाली पंचाईत. शेवटी त्याला दुसऱ्या खोलीत झोपवायला लागलो.

**ऊर्मिला** : ( तुटक तुटकपणे ) मीही दुसऱ्या बेडरूममध्ये झोपणारय !

[ तोच बाहेर गाडी पोर्चमध्ये येऊन थांबल्याचा आवाज ]

**राजा** : वी. के. आला वाटतं.

**ऊर्मिला** : उशीर झाला त्याला यायला ?

**राजा** : मी ट्रेनने आलो. तो बाय रोड, कुठं घाटात वगैरे अडकला असेल.

[ वी. के. छंदाला घेऊन येतो. भिरभिरत्या नजरेने छंदा सर्व घर पाहून घेतीय. ऊर्मिला उठून उभी राहते. वी. के. तिला पाहून क्षणभर गांगरतो... ]

**वी. के.** : ऊर्मे...तू इकडे ?

**ऊर्मिला** : ( खिन्नपणे ) तुला एकटं एकटं वाटू नये म्हणून सोबत करायला...

**वी. के.** : ( हसून ) पाहिलंस राजा, माझीच सावली मला पकडून ठेवायचा प्रयत्न करतीय...ठीक...छंदाची ओळख करून देतो. छंदा, ही माझी बायको ऊर्मिला—

**छंदा** : सलाम मेमसाब.

**वी. के.** : ही सांगेल तसं वागायचं—जास्त कोणाशी बोलायचं नाही...घराबाहेर पडायचं नाही....

[ छंदा ऐकून, न ऐकल्यासारखे करत...दाणकन् कोचावर बसते. ]

**छंदा** : काय मऊ मऊ कोचयत ?—किती रुपयाला घेतले ?—
सेठ, तुझं घर एकदम झकासय—बोलशीऊ तर जलमभर राहीन...
[ आणि बोलता बोलता सँडल काढून डोक्यावरून मागे फेकते. ]

**ऊर्मिला** : ए...अग...असे, हे बघ छंदा, घरात येतानाच सँडल दरवाजाशीच काढून ठेवायचे.

**छंदा** : तू बोलशील तसं मेमसाब.

**बी. के.** : राजा, हिची काय पाहिजे ती माहिती घे...पासपोर्ट तयार करून घे—

**छंदा** : पासपोर्ट म्हणजे काय सेठ ?

**बी. के.** : मेमसाहेबांबरोबर तुला स्वित्झर्लंडला जायचंय, नंतर—

**छंदा** : फॉरिनला जायचं ? कशाला ?

**राजा** : डिलिव्हरी—बाळंतपणासाठी...

**छंदा** : तू बोलतोस तर जाईन मी सेठ. पण इमानाचं तिकीट तू काढायचं... माझ्या पैशानं नाय...

**बी. के.** : काढीन—माझ्या पैशानं काढीन.

**छंदा** : आन् मेमसाब, पयलंच बोलून ठेवते. माझं काम फकस्त पोराला जलम द्यायचा...अन् त्याला दूध पाजायचा—पोराचं हगनं मुतनं म्यां नाय काढणार—घाण वाटते.

**बी. के.** : ( वैतागून ) त्यासाठी मी आया ठेवीन...

**छंदा** : आया ठेव, नायतर बाया ठेव...पण ते पैसे तुझं...माझ्या पैशानं नाय—

**बी. के.** : थर्डक्लास...लंपन, पैशाशिवाय दुसरा विचार नाही का तुझ्या डोक्यात ?

**छंदा** : ( थंडपणे ) तुझ्या डोक्यात हाय का पोराशिवाय दुसरा कसला इचार ? असंच राहातं...ज्येच्याकडे जे नाय—ते त्याला हवंयसं वाटतं...तुझ्याकडं पोर नाय...माझ्याकडं पैसा नाय...[ सिगारेट पेटवून काडी खाली टाकते. ]

**ऊर्मिला** : हे काय ? समोर ॲश ट्रे आहे ना—काडी राख याच्यात टाकावी.

**छंदा** : का ? घरात झाडू मारायला गडी माणसं नाहीत ?

**ऊर्मिला** : आहेत ना...पण म्हणून काय आपण मुद्दाम कचरा करायचा ?

**छंदा** : मेमसाब...भलतंच बैजवार काम दिसतंय तुझं.

**ऊर्मिला** : अन् हे बघ—असं मेमसाब, मेमसाब म्हणू नकोस सारखं. मला ताई अन् साहेबांना बी. के...

**बी. के.** : ( तत्क्षणी, निक्षून ) नाही—मला सेठ आणि बाईसाहेबांना मेमसाब

म्हणायचस तू...

**ऊर्मिला :** बी. के....अरे तिला जरा चांगलं...

**बी. के. :** काही वळण लावायची, संस्कार करायची गरज नाहीय तुला.

**ऊर्मिला :** अरे पण आपली गडीमाणसंही चांगल्या रीतीभातीने वागतात...

**बी. के. :** ती गडीमाणसं–माणसं आहेत...ही काय माणूसय?...एक विकाऊ मादी...

**छंदा :** ( थंडपणे ) सेठ, तू मला माणूस म्हण नायतर जनावर. काय घाला-यच्या त्या शिव्या घाल...दोन लाख रुपये तेवढं मोजून दे—

**बी. के. :** हो...रोख...नगद देईन...भयाण–प्रकारय सगळा...

**छंदा :** ( आणखी थंडपणे ) सेठ, चाय भेटल का कपभर?

**ऊर्मिला :** हा काय आलाच.

[ बहादूर चहाचा ट्रे घेऊन येतो. ठेवतो. छंदा त्याच्यावर ओरडते ]

**छंदा :** ए कामचोर, शक्कर पत्ती काय आणतो? चाय आण.

**ऊर्मिला :** ( थोड्या दमात ) छंदा, आवाज हळू–( चहा बनवता बनवता ) हे बघ, आम्ही असाच चहा पितो...म्हणजे काय होतं बघ, ज्याला जेवढी पाहिजे तेवढीच साखर...तेवढंच दूध घेता येतं.

[ छंदा नुसती पाहत राहते. ]

तुला किती चमचे साखर घालू?—पहातीयस काय अशी?

**छंदा :** ( भानावर येत ) मेमसाब, मी पाहात होते तुझ्या माझ्यात काय फरकय?

**ऊर्मिला :** ( हसून ) काय फरकय?

**छंदा :** ( गहिवरून ) लई फरकय मेमसाब...लय फरकय.

**ऊर्मिला :** काय?

**छंदा :** मेमसाब, तू मोठ्या माणसाची मोठी बायकूयस...तू चहादेखील पिशील—तुला आवडंल तसाच करून पिशील...आणि आयुक्ष बी जगशील—तुला पायजे तसं घडवून जगशील—अन् म्या—( कप तोंडाला लावते. )

**ऊर्मिला :** तुझं काय?

**छंदा :** ( भरल्या डोळ्यांनी कप खाली ठेवत ) आन् म्या मेमसाब...म्यां अशी 'मुरळी मल्हारी रायाची'...समोर जसा चायचा कप येतो ना, तसा तोंडाला लावते...वाट्याला जसं आयुक्ष येतं तसं भोगते..."मी मुरळी मल्हारीरायाची!"

अंधार

प्रवेश पहिला समाप्त

# प्रवेश दुसरा

[ ऊर्मिला एकटीच स्वेटर विणत बसली आहे. ...सारे लक्ष मात्र बाहेर. गाडीचा हॉर्न वाजतो, ऊर्मिला पटकन् उठून पाहते. खिन्न होत खाली बसते. पुन्हा गाडी आल्याचा आवाज. ऊर्मिला धावत दरवाज्याशी जाते. गाडी पुढे निघून जाते...ऊर्मिला पुन्हा नर्व्हस होऊन कोचावर येऊन बसते. स्वेटर विणू लागते. वरून छंदा येते. ]

**छंदा :** मेमसाब...

**ऊर्मिला :** ( विणता—विणता ) उं ?

**छंदा :** आज सेठ येणार ना ?

**ऊर्मिला :** ( थबकून ) तुला काय माहीत ?

**छंदा :** पडलं माहीत—सकाळधरून फोन नाही आला सेठचा. फोन : आला, म्हणजे आज सेठ येणार. खरं ना ?

**ऊर्मिला :** ( खाली मान घालत ) हूं !

**छंदा :** मेमसाब, आज तू गजरा नाही माळला ?

**ऊर्मिला :** कशाला ?

**छंदा :** सेठला आवडतो ना !

**ऊर्मिला :** ( चमकून ) तुला कोणी सांगितलं ?

**छंदा :** सांगाया कशाला पाहिजे ? तुझ्या साऱ्या फोटूत तू गजरा माळल सेठला आवडतो म्हणून ना—मी सांगितलंय माळीगबायला.

**ऊर्मिला :** काय ?—

**छंदा :** मेमसाबसाठी गजरा माळून ठेव.

**ऊर्मिला :** थँक्स !

[ बराच वेळ शांतता. ]

**छंदा :** मेमसाब...

**ऊर्मिला :** काय ?

**छंदा :** काय विणतेस तू ?

**ऊर्मिला :** स्वेटर.

**छंदा :** सेठसाठी ?

**ऊर्मिला :** नाही—बाळासाठी.

**छंदा :** ( सहज ) कुणाच्या ?

**ऊर्मिला :** ?...?...?...

**छंदा :** ( हसून ) मेमसाब, तू इतकी पैशेवाली...सवताच्या बाळासाठी बाजारातून विलायती फॅशनचं कापड आणायचं...सवता कशाला इणत बसलीस ?
**ऊर्मिला :** ( वैतागून ) तुला नाही समजायचं.
**छंदा :** न समजाया काय झालं ? मला बी कळतं...तू का इणत बसलीयस.
**ऊर्मिला :** का विणत बसलीय ?
**छंदा :** टाईमपाससाठी !

[ ऊर्मिला नुसती मान झटकत हसते. ]

...मेमसाब, (आपली वाट आपण चालायची असली, की टाईम संपतो पन वाट नाही संपत...तेच दुसऱ्या कोनाची वाट पायची झाली की,...वाट पाहून संपते पन टाईम नाय संपत. खरं ना ?).

**ऊर्मिला :** ( उगीच ) खरंय्...
**छंदा :** ( अंतर्मुख होत स्वतःशी ) मेमसाब...गिऱ्हाइकाची वाट पहानं अन् आपल्या माणसाची वाट पहानं...लई फरक असतो नाय ?

[ ऊर्मिला संशयाने पाहू लागते. ]

...मेमसाब, रोज खिडकीला नमस्कार करून धा गिऱ्हाइकांची वाट पाहात बसायची...ठणका लागायचा, अंग मोडून जायचं...आज सकाळधरून सेठची वाट पाहात गच्चीत उभी व्हते...जराबी पाय नाय दुखले...अंग मोहरून आलं...

**ऊर्मिला :** तू, बी. के. ची वाट पाहत होतीस ?
**छंदा :** व्हय...जरा हॉर्न वाजला...मोटारगाडीचा आवाज आला...खुळ्यागत धावत होते.. मुंबईकडून इकडं यायला सांज व्हते माहीत असूनबी !
**ऊर्मिला :** ( चिडून ) तुला कोणी सांगितलं होतं बी. के. ची वाट पाहायला ?
**छंदा :** ( भानावर येत ) कातावू नको मेमसाब. जन्मानं वाईट असले तरी, चालीनं वाईट बाय नाय मी...तू जरा बी भय नको धरू.
**ऊर्मिला :** मला...मला कसलं आलंय भय ?
**छंदा :** मेमसाब, मोठ्याची बायकू असलीस, तरी बाईच्याच जातीची तू... बाईच्या जातीला भय कुठलं सुटायला ? तुला वाटत असेल...मी तुझ्यापेक्षा जवानय...सुंदरय...सेठला जाळ्यात पकडेन.
**ऊर्मिला :** ( तुच्छतेने ) तू बी. के. ला जाळ्यात पकडणार ?
**छंदा :** काय अवगड नाय मेमसाब...मेमसाब, माझ्या परीस जादा पावसाळे तू पाहिले असशील...पुरुष नाय पायलेस !...आधी वाटलं व्हतं मला बी, ...सेठ पैकेवालाय. पकडावा जाळ्यात...मग...
**ऊर्मिला :** मग का नाही पकडलास ?

**छंदा** : नाय पकडला...

[याच वेळी नुसता गाडीचा आवाज. छंदा, ऊर्मिला लक्ष देऊन न दिल्यासारखे करतात.]

मेमसाब, कुणाच्या प्रेमात मोडता घातला...तर देवाचं बी तळपट होतं...

**ऊर्मिला** : देव नाही कधी कोणाच्या प्रेमात विघ्न घालत.

**छंदा** : माझ्या घातला ना—

**ऊर्मिला** : तुझ्या ?

**छंदा** : हां मेमसाब...आमच्या गावाला...नदीच्या पात्रामध्ये महादेवाचं मोठं देऊळ होतं...गुरवाचा पोरगा शंकर...चांगला शाहीर होता. माझ्यावर कवनं करायचा.

**ऊर्मिला** : तुझ्यावर कविता करायचा ?

**छंदा** : हां मेमसाब,...माझ्यावर लई जीव जडला व्हता त्याचा...लई गोड गोड कवनं करायचा...

[मंद निळा प्रकाश. पार्श्वभूमीवर छोटेसे ड्युएट—]

**शंकर** : **भोकरासारखे डोळे तुझे, गुंजेसारखे दात**
**नि कांती तुझी वाटे जशी, केवड्याची पात**

**छंदा** : **केवड्याच्या वनात, का सापडतो साप**
**रुपाला या माझ्या कारे जातीचा हा शाप ?**
**भोकरासारखे डोळे तुझे—**

[गाणे संपते. पूर्ववत् प्रकाश. ऊर्मिला, बी. के. मन लावून ऐकतायत.]

**छंदा** : मेमसाब, तरी मी त्याला सांगितलं—'शंकऱ्या, नंदी देवळात हाय तोवर लोक त्याच्या शेपटाला हात लावून पूजा करतात. त्यो देवळातनं खाली उतरला की तेच शेपूट पिरगळून बैल म्हणून नांगराला जुपतात. म्या अशी खालच्या जातीची...तू गुरवाचा पोरगा...' पर...

**ऊर्मिला** : पण काय ?

**छंदा** : शंकऱ्यानं ऐकलं नाय माझं, मला हात धरून देवळात ओढत नेलं... म्हणाला, तुज्याशी लगीन करणारय् मी—

**ऊर्मिला** : मग ?

**छंदा** : सारा गाव जमला देवळात—आम्हा दोघांला बी लई झोडलं गावानं ...लई मारलं...

**ऊर्मिला** : का ?

**छंदा** : म्हणं, म्या अशी मांगाची पोरगी, त्यात मुरळी...माझ्या संगट गुरवाच्या पोराचं लगीन देवाला मान्य नाय...मेमसाब, शंकऱ्या यडा

झाला...नदीच्या डोहात उडी टाकून जीव दिला त्यानं...चार दिवस मी नुसती रडत व्हते मेमसाब. रडत व्हते. (संतापून) आन् मग गेले म्हादेवापुढं—म्हणाली त्येला...

**ऊर्मिला :** काय ?

**छंदा :** मुडद्या...माझ्या पिरतीचा तू इस्कोट केलास...माझ्या शंकऱ्याला डोहात बुडवून मारलंस...तुझं बी असंच तळपट व्हईल...तू बी तुझ्या नंदीसकट पाण्यात बुडून मरशील... अन् तसंच झालं मेमसाब.

**ऊर्मिला :** महादेव पाण्यात बुडाला ?

**छंदा :** हां मेमसाब, सरकारनं नदीवर धरण बांधलं...आन आखं महादेवाचं देऊळ नंदीसकट पाण्यात बुडालं ! (ऊर्मिला छंदाला थोपटते) मेमसाब, प्रेमात मोडता घातला तर माझा मुरळीचा बी देवाला शाप लागला... तुमच्यासारख्या देवमाणसांचं शाप मी कशाला घेऊ ?...मेमसाब, तुला मी कदी दगा नाय देणार !

**ऊर्मिला :** माहितीय ग मला.

**छंदा :** मेमसाब तू मोठी बाईयस्...पण श्यानी बाय नाईस...

**ऊर्मिला :** का ग ?

**छंदा :** मेमसाब, तुझ्या जागी मी राहते ना—इतका चांगला नवरा, पोरासाठी म्हून दुसऱ्या बाईच्या तावडीत नसता दिला...

**ऊर्मिला :** खरंय ग...कारण तुला नवरा नाही. मला मुलगा नाही.

**छंदा :** मेमसाब, सेठचा किती जीवय तुझ्यावर ? कारखान्यात संप चाललाय, बँकवाले बी तरास देतायत...सेठच्या डोक्याला किती कहार...तरी बी तुजा इच्चार त्याच्या डोक्यातनं कदी नाय जात ?

**ऊर्मिला :** तुला कोणी सांगितलं हे सारं ?

**छंदा :** सांगाया कशा पायजे ? मेमसाब, नाखुशीनं का व्हईना...पर एकदा आपली छाती दुसऱ्याच्या छातीला भिडली की, दुसऱ्याच्या काळजातले ठोके बी आपल्याला कळू लागतात.

**ऊर्मिला :** आणखीन काय कळलंय तुला ?

**छंदा :** सेठला माझा कमरा म्हणजे, जेल वाटतो...जेल ! माझ्यासंगं रात्र घालवायची त्याला सजा वाटते.

**ऊर्मिला :** नाही ग...तसं काही नाही.

**छंदा :** तसंचंय् मेमसाब...मेमसाब, मला नागव्यानं पायलं की, म्हातारी गिऱ्हाइकं बी खुळी व्हायची. पर सेठ, जरा बी त्याचा श्वास वाडत नाय का, डोळं चमकत न्हाईत...मला कारखान्यातलं मशीन म्हंता म्हंता तो

सवताच एक यंत्र होऊन बसलाय...

**ऊर्मिला :** छंदा...

**छंदा :** मेमसाब, आयुक्षात पुरुष लई पायले...माणूस पयल्यांदा पायला...सेठ पयल्यांदा भेटला...( उठते, नि डोळे पुसत पायऱ्या चढता चढता ) मेमसाब, आता सेठ येईल तवा सांग त्याला...

**ऊर्मिला :** काय सांगू ?

**छंदा :** म्हणावं...पुना पुना यायची गरज नाय, आता तुझी सजा संपलीय !

**ऊर्मिला :** ( आनंदून ) काय म्हणालीस ?

**छंदा :** सेठची सजा संपलीय...त्याला म्हनावं, आता येशील तो बाळाला पायलाच ये...मंदे मंदे सारखा सारखा येऊ नको.—छंदापासून काळजानं जसा दूरयस, तसा चेहऱ्यानं बी दूरच राहा...शंकऱ्याला इसरली...तशी छंदा तुला बी इसरायचा प्रयत्न करील.

[ आवेगाने एकदम निघून जाते. नि खोट्या उत्साहाने बी. के. एकदम प्रवेश करतो. ]

**बी. के. :** ऊर्मे !

**ऊर्मिला :** केव्हा आलास ?

**बी. के. :** हा काय आत्ताच...सकाळपासनं फोन डेड होता का ?

**ऊर्मिला :** नाही तर...का ?

**बी. के. :** अग...सकाळपासनं दहा वेळा ट्रंक लावला...

**ऊर्मिला :** आधी बस तर खरा...सामान कुठाय ?

**बी. के. :** सामानबिमान काही बरोबर आणलं नाही...

**ऊर्मिला :** का ?...चार दिवसांसाठी येणार होतास ना तू ?

**बी. के. :** अगं तेच तर सांगतोय, उद्या सकाळच्या फ्लाईटनं मला गल्फला जायचंय...

**ऊर्मिला :** कशासाठी ?

**बी. के. :** मोठी एक्सपोर्ट ऑर्डर मिळालीय.

**ऊर्मिला :** म्हंजे, आज फक्त आनंदाच्याच बातम्या आहेत सगळ्या.

**बी. के. :** ( खोट्या आश्चर्याने ) आणखीन काय आनंदाची बातमी ?

**ऊर्मिला :** आणखीन नाही, सगळ्यात आनंदाची बातमी...तुझी शिक्षा संपली. छंदाला दिवस...

**बी. के. :** थँक गॉड...मोरगं शुभशकुनाचं...त्या छंदाला...सोन्याची चेन नाहीतर, मोत्याची माळ दे बक्षीस—इतक्या लवकर माझी सुटका केल्याबद्दल—बरं निघू मी ?

**ऊर्मिला** : अरे निदान चहा तरी...

**बी. के.** : एक मिनिट वेळ नाही. पहाटेपर्यंत एअरपोर्टवर पोचलं तर पाहिजे... बाय...

[ घाईघाईने निघून जातो ऊर्मिला खिडकीपाशी जाऊन—" बी. के. बी. के. " म्हणून हाक मारू लागते तोच दरवाज्याशी बहाद्दूर येतो. त्याच्या हातात सामान. ]

**बहाद्दूर** : मेमसाब...

**ऊर्मिला** : काय रे बहादूर ?

**बहाद्दूर** : लगेज कुठं ठेवू ?

**ऊर्मिला** : कोणाचं लगेज ?

**बहाद्दूर** : साहेबांचं !

**ऊर्मिला** : बी. के. चं सामान ?

**बहाद्दूर** : हां. साहेब केव्हापासून दरवाज्यापाशीच उभे होते, म्हणून सामान आत नाही आणलं.

[ नुसत्या बहाद्दूरवर स्पॉट. हळूहळू अंधार. गाडी निघून चालल्याचा आवाज. ]

प्रवेश दुसरा समाप्त

## प्रवेश तिसरा

[ सकाळची वेळ. फोन वाजतोय. छंदा फोनकडे टक लावून बसलीय. बहाद्दूर ट्रे घेऊन वर जाता जाता म्हणतो ]

**बहाद्दूर** : ए छंदा...फोन नाय का घ्यायचा ?

**छंदा** : घेऊन काय उपयोग ?

**बहाद्दूर** : म्हंजे ?

**छंदा** : आमच्या गावाला...सकाळच्या परीस कावळा कावकावला की म्हणत्यात पावना घरी येणार...आन इथं...?

**बहाद्दूर** : इथं काय ?

**छंदा** : इथं फोन खनखनला की म्हणत्यात—सेठ येणार नाय.

[ उठते—फोन उचलते. फोनवर राजा बोलतोय. बहादूर ट्रे घेऊन वर जातो. ]

**छंदा :** हलोऽऽ

**राजा :** कोण छंदा का ?

**छंदा :** हो...

**राजा :** मी राजा बोलतोय...

**छंदा :** बोला मालक...

**राजा :** उमा उठलीय का ? नसली तर उठव.

**छंदा :** उठवते...मालक, सेठ आलं का परत ?

**राजा :** अजून नाही.

**छंदा :** ( चाचरत ) मालक, एक सांगायचं होतं.

**राजा :** काय ?

**छंदा :** सेठला, एक काळा चष्मा नि हॅट पाठवून द्या.

**राजा :** कशाला ग ?

**छंदा :** नाय, म्यां ऐकलंय तिकडं वाळवंटय, उनाचा लई कडाका असतो.

**राजा :** ( हसत ) बरं...बरं...पाठवतो आजच...तू उमाला बोलव आधी...

[ छंदा फोन खाली ठेवते. नि 'मेमसाब' म्हणून हाका मारत वर जाते. थोड्या वेळाने उमा खाली येते. फोन उचलते. ]

**ऊर्मिला :** काय रे राजा ?

**राजा :** पासपोर्ट मिळाला...फक्त व्हिसा मिळायचाय.

**ऊर्मिला :** ( चिडून ) हत्ती गेला...शेपूट जायचंय...

**राजा :** ( समजावणीने ) हे बघ उमा, या देशात कायदेशीर काम करण्यासाठी लोक पैसा नि वेळ दोन्ही खातात...आपल्याला तर बेकायदेशीर—

**ऊर्मिला :** ( उसळून ) काय बेकायदेशीर...

**राजा :** संपूर्ण बेकायदेशीर...तुझा पासपोर्ट छंदाच्या नावे...छंदाचा पासपोर्ट तुझ्या नावे...

**ऊर्मिला :** आता मिळालाय ना—

**राजा :** अगं पण व्हिसा...पिवळ्या तापाची साथ...मेडिकल चेकिंगशिवाय व्हिसा देत नाहीत. आणि मेडिकल रिपोर्टमध्ये तू प्रेग्नंट असली पाहिजेस... वेळ लागेल.

**ऊर्मिला :** तुझी नेहमीचीच रड. आज बी. के. असता तर...

**राजा :** तुला आज आठवण येतेय...मला रोज एकेक प्रॉब्लेम फेस करताना बी. के. ची आठवण येते. कशाला फुकट गल्फला गेलाय...

**ऊर्मिला :** फुकट नाही...पळून गेलाय तो !

**राजा :** म्हणजे...

**ऊर्मिला** : फोनवर नाही सांगता येणार...भेटशील तेव्हा सांगेन...

**राजा** : मी येतोय रविवारी.

**ऊर्मिला** : ये...पण राजा काहीही करून व्हिसाही मिळव...माझा जीव इथं टांगणीला लागलाय...

**राजा** : कशानं ?

**ऊर्मिला** : ( इकडे तिकडे बघत ) अरे बाबा, शिंक आणि उलटी दाबून नाही धरता येत...इथं त्या म्हातारीला...बहादूरला कळलं म्हणजे...

**राजा** ठीक... रविवारी व्हिसा घेऊनच येतोय मी...

[ धडधडत छंदा खाली येते. येताना थोडासा तिचा पाय घसरतो. ऊर्मिला दचकते. फोन ठेवते. छंदा स्वतःला सावरते. नि सिटिंगरूममध्ये येते. अंगावर टाईट मॅक्सी—थोडे पोट दिसू लागलेले ]

**ऊर्मिला** : छंदा, अग अशी काय नाकात वारं शिरल्यासारखी धावतेस पळतेस... त्या हाय हील्स काढ बरं आधी पायातून...काढ म्हणते ना ?

[ छंदा निमूटपणे पायातून हाय हील्स काढते. ]

**ऊर्मिला** : आता कुठं पाय घसरून पडली असतीस तर ?

**छंदा** : मेमसाब, आमच्या कोठ्याला चार दादरे...दोनाला कठडेच न्हाईती ...पायऱ्या बी मोडक्या...पण मी अशीच धावत चढायची. उतरायची ...सवय झालीया...

**ऊर्मिला** : अग, सवय तुलाय,...बाळाला आहे का ?

[ छंदा क्षणभर पाहते, हसते. ]

हसायला काय झालं ?

**छंदा** : नाय मेमसाब...पहिलं मला वाटलं तू माझी काळजी करतीय्. पण नाय...तुला तुझ्या बाळाची काळजी...

[बोलता बोलता तिला एकदम मळमळून येते...चक्कर आल्यासारखे होते...उर्मिला तिला सावरून कोचावर बसवते. ]

**ऊर्मिला** : छंदा...चक्कर आली ? मळमळतंय ? तोंडात धरायला आलं देऊ

**छंदा** : काय नको—मला हे असं नेहमीच व्हतं...

**ऊर्मिला** : ( आश्चर्याने, संशयाने ) नेहमी असं होतं ?

**छंदा** : हां...रातीला ज्यादा पियाली ना...की सकाळच्या पारीस असाच तरास व्हतो...ह्येला हैंगओवर म्हंतात...हेंगओवर...

**ऊर्मिला** : ( हसून ) हँगओव्हर मुळे नाही छंदा—गरोदरपणानं...

**छंदा** : ( पेपर चाळत ) मेमसाब...आज टी. व्ही. ला कोणता सिनेमाय ?

**ऊर्मिला** : 'माझं बाळ' !

**छंदा :** टी. व्ही. वर ती बाळाचीच फिटफिट का ? मला वाटलं कुटलं प्यार मोहोब्बतचा सिनेमा असंल...

**ऊर्मिला :** प्यार मोहोब्बत खोटी असते ना ? मग कशाला तसले सिनेमे पाहातेस ?

**छंदा :** पायाला चांगले वाटतात...वाटतं खरंच अशी प्यार मुहोब्बत माणसानं केली असती...ह्यो 'माझा बाळ' सिनिमा पायला का मेमसाब ?

**ऊर्मिला :** नाही, कसाय् ?

**छंदा :** बेस...दूधवाली व्हाते एक...जुन्या काळची गोष्ट दावलीय...गडाचे दरवाजे बंद होतात...सांज होते...बाळ खाली झोपड्यात दुधासाठी रडत असतं...मग ती आय...न्हावत न्हाय तिला, पोराला पाजायला गडावरनं उडी टाकते खाली—शिवाजी राजा तिला सोन्याचं कडं देतो. ( डोळे भरून येतात. ) मी खूप रडले मेमसाब...खूप रडले सिनेमा पाहून.

**ऊर्मिला :** का ?

**छंदा :** म्हनलं,...मला बी अशीच आय असती...कशाला म्यां मुरळी झाली असती ?...मेमसाब तुझ्यासारखा पैसेवाला नवरा नसता भेटला...पण कुंकू तर लागलं असतं का नाय कपाळाला ? जाव् दे...आपली जिंदगी तर खराब झाली. आता फिटफिट करून काय उपेग ?

[ बराच वेळ शांतता. ऊर्मिला विणकाम करू लागते. तिला आपली सहानुभूती व्यक्त करता येत नाही. ]

**ऊर्मिला :** छंदा...

[ छंदा पेपर चाळतीय. ]

या दिवसांत मुलीसाठी आई जे जे करते ना...ते ते सारं मी तुझ्यासाठी करीन...फक्त तुला काय पाहिजे ते मला सांग...

[ छंदा पेपर वाचण्यात दंग. ]

तुझं डोहाळेजेवण करू ?

**छंदा :** ( लक्ष पेपरात ) काय म्हणालीस मेमसाब ?

**ऊर्मिला :** मी म्हटलं, तुझं डोहाळेजेवण करूया का ?

**छंदा :** ( पेपर आपटत ) नगं...ते बेस्तरवारचं—चायनीज जेवण कर.

**ऊर्मिला :** चायनीज डिशेस आवडतात तुला ?

**छंदा :** हां—तू म्हनाली ना, आज चिनी जेवण केलंय...( हसत ) म्या म्हनलं...काय झुरळं, पाली खायला घालते की काय मेमसाब...पण छान लागलं हां खायला...छान लागलं...

**ऊर्मिला :** ठीकय्...बहाद्दूरला सांगते आज करायला...

( छंदा पुन्हा पेपरात डोके घालते ) छंदा...तुला आणखी काही हवं-हवंस वाटतं ?

**छंदा** : काय ?

**ऊर्मिला** : म्हणजे—काही आंबट तुरट खावं...चिंचा आवळे...

**छंदा** : चिंचा आवळं खायला मी काय लहान लेकरुंय ?

**ऊर्मिला** : मग काय खावंसं वाटतं ?

**छंदा** : ( पेपर ठेवत ) राहून—राहून वाटतं...सारखी खावी वाटते.

**ऊर्मिला** : काय ?

**छंदा** : तंबाखू.

**ऊर्मिला** : ( वरमून ) ठीकय...सांगते मी आणायला...

**छंदा** : नगं...हे तुझं घरंय ना मेमसाब...इथं तुझ्या वळणानं रायलं पायजे...
म्या तंबाखू खाणार, इकडं तिकडं पचापचा थुंकनार...नगंच...

[ तोच म्हातारी माळीण येते. परडीतून फुले काढून खाली बसून ओवायला लागते. कोचावर बसून ऊर्मिला स्वेटर विणतीय...नि एकदम छंदाला पुन्हा मळमळून येते, उलटी झाल्यासारखे वाटते. ती तोंड दाबते... ऊर्मिला चमकून एकदा छंदाकडे, एकदा माळणीकडे पाहते...तिच्या छातीत धडधडते—पण माळीण शांतपणे गजरा ओवत असते. पुन्हा काही काळ शांतता पसरते. वाचता वाचता पुन्हा छंदाला मळमळून येते —ऊर्मिला गोरीमोरी होते. ]

**माळीण** : उमाताई, ग्लासभर पाणी आणि मिठाचा खडा हवा होता.

**ऊर्मिला** : बहादूर, पाणी आणि मीठ आण.

[ छंदाला पुन्हा उलटी झाल्यासारखे वाटते. ऊर्मिला कावरीबावरी होते. पण माळीण शांतपणे गजरा ओवत असते. छंदा वाचनातच दंग. बहाद्दूर पाणी मीठ ठेवून जातो. ]

**ऊर्मिला** : हं...घ्या.

**माळीण** : बहाद्दूर गेला का ?

**ऊर्मिला** : हो. मीठ पाणी समोर ठेवलंय.

**माळीण** : मला नको होतं ग मीठ पाणी...

**ऊर्मिला** : मग ?

**माळीण** : छंदाला दे...बाळाच्या ओकाऱ्या थांबतील.

[ छंदा चमकते. ऊर्मिला ताडकन् जागच्या जागी उभी राहते...नि जमिनीलाच खिळते. ]

**माळीण** : छंदा पोरी, पाणी पिऊन मिठाचा खडा नुसता तोंडात ठेव, म्हणजे

मग, काही मळमळणार नाही !

[ छंदा चूपचापपणे पाणी पिते. खडा तोंडात ठेवते. ऊर्मिला सुन्न. ]

**माळीण** : छंदा पोरी...वाचता येतं वाटतं तुला ?

**छंदा** : हो...चार बुक शिकलीय मी...

**माळीण** : मग दुपारची येत जा माझ्याकडे. कथा, पुराणं वाचून दाखवत जा —चांगलं असतं ते—या दिवसांत देवा-धर्माचं वाचलं, म्हणजे मन कसं शुद्ध राहातं—निर्मळ राहातं...

**छंदा** : ( नाखुषीने ) येत जाईन—

[ पेपर टाकून वर निघून जाते. म्हातारी उठते. एकदा गजऱ्याचा वास घेते. ऊर्मिलाच्या हातात देते. ऊर्मिला यंत्रवत् हातात घेते. ]

**माळीण** : असाच सुवास तुझ्या घरात दरवळू दे ग !...उमाताई...

**ऊर्मिला** : ऊँ ?

**माळीण** : अगं मला कळलं असलं ना—तरी दुसऱ्या कोणाला समजणार नाही...काळजी नको करू...

**ऊर्मिला** : तुम्हाला...तुम्हाला कसं कळलं ?

**माळीण** : खेड्यातली म्हातारी ग मी. कूस एकदाच उजवली...पण नाळा खूप मुलांच्या कापल्यात...

**ऊर्मिला** : माळीण आजी—( बोलता बोलता चूप होते. )

**माळीण** : बोल ना मुली—[ ऊर्मिला गप्पच. ]

अगं, चोरासारखी गप्प उभी का ? हे बघ, काही वाईट नाही केलंत. अगं माझा म्हातारीचा जीवदेखील अजून नातवात गुंतून पडलाय – लेकरांची आसच असते अशी मोठी...ती कोणाला सुटत नाही ग...कोणाला सुटत नाही...तुला माहितीय ना...निपुत्रिक होता म्हणून राजा दशरथाने ' पुत्र-कामेष्टी ' यज्ञ केला होता...म्हणून ना राम लक्ष्मण जन्माला आले...तुम्ही देखील असाच एक यज्ञ करताय ग...आणि यज्ञातून फक्त देव जन्माला येतात...तुझ्या घरात देव खेळेल हो...देव खेळेल ( म्हातारीला भडभडून येते नि पदर डोळ्यांना लावते. ) पण एका गोष्टीचं वाईट वाटतं ग पोरी...

**ऊर्मिला** : कसलं वाईट वाटतं ?

**माळीण** : अगं यज्ञ करायचा झाला म्हणजे, हवन करायला लागतं...बळी द्यावा लागतो...तुम्ही तिघंही गुणी लेकरं ग...तुमच्यापैकी कोणाचा बळी जाणार ? काळजी वाटते...भीती वाटते मनाला...

[ म्हातारी माळीण हळूहळू निघून जाते. ऊर्मिला सुन्न होऊन कोचावर बसते. सॅड टय़ून. हळूहळू अंधार—गाडी पोर्चमध्ये येऊन

थांबल्याचा आवाज जिन्यावर पावलांचा आवाज. दूर कुठेतरी कोंबडा आरवतोय. . .पुन्हा प्रकाश. पहाट झालेली आहे. ऊर्मिला तशीच जागी बसूनय. बी. के. गल्फहून परत आलाय. सोबत सामानाने भरलेल्या सूटकेसेस्. . . ]

[ बी. के. बॅगेतून मॅटर्निटी गाऊन काढतो. ]

**बी. के.** : हे मॅटर्निटी गाऊन—कोणालासुद्धा पटकन् पोट दिसायचं नाही. . . हे चढवायचं त्या बयेच्या अंगावर नि थेट सांताक्रूझ एअरपोर्ट. . .

[ ऊर्मिला गाऊन हळुवारपणे हाताळत विचारते ]

**ऊर्मिला** : या गाऊनमध्ये कशी दिसते रे स्त्री ?

**बी. के.** : खरं सांगू. . .पोट वाढलेली स्त्री तशी बेढब दिसते. पण ती आई होणारय हे लक्षात घेतलं ना. . .की त्या बेढबेतच मातृत्वाची आदब दिसायला लागते. . .खैर. . .काय विचार करून उपयोग ?

**ऊर्मिला** : का ?

**बी. के.** : हे गाऊन चढवणारे एक ह्युमन इनक्यूबेटर, बाजारबसवी – कोणी आई नाही—स्त्री नाही. . .

**ऊर्मिला** : इतकी घाणेरडी, बाजारबसवी छंदा, तर पळून कशाला गेला होतास तिच्यापासून दूर ?

**बी. के.** : ( क्षणभर चमकतो. ) पळून ?. . .नाही ऊर्मे, पळून नाही. निसटून गेलो होतो.

**ऊर्मिला** : निसटून ?

**बी. के.** : हो– ऊर्मे, प्रत्येकाची शिकारीची पद्धत वेगळी असते. कोणी सापळा लावून पकडतो. . .कोणी जाळं पसरून. . .ही छंदा जाळं पसरायचा प्रयत्न करत होती.

**ऊर्मिला** : उगाच काहीतरी, या भोळीभाबडीवर आरोप. . .

**बी. के.** : ऊर्मे, तुझ्यापेक्षा जग जास्त जाणतो मी. आणि तुझ्यासारखा मी इमोशनल फूल नाहीए. तिचा डाव तुझ्या नाही तरी माझ्या लक्षात आला

**ऊर्मिला** : कसला डाव ?

**बी. के.** : तुझा इथं जागता पहाराय ना. . .मग प्रथम तुझा पत्ता काढायचा तुझी सहानुभूती, विश्वास जिंकून तुला न्युट्रलाईज करायचं. .

**ऊर्मिला** : मग ?

**बी. के.** : मग मी जातो कुठे ?. . .वासनेनं नाही पेटलो तरी वात्सल्याने हरवून जाईनच की नाही ? आपल्या पोराची आई म्हणून का होईना. . .या बाजार बसवीविषयी ओढ, ममत्व वाटेलच की नाही. . .सुन्दर सुन्दर प्लॅन होता

तिचा...दुर्दैवाने तिची गाठ बी. के. शी पडली...

**ऊर्मिला :** बी. के....हे काही तरी उगीच तुझ्याच कल्पनांचे खेळ..

**बी. के. :** कल्पना कसल्या? अग साधा लॉजिकली विचार कर...जी बाई दोन लाख रुपयांसाठी पोटच्या पोराचा दुसऱ्याला ताबा द्यायला तयार आहे... ती एवढ्या ऐश्वर्यासाठी दुसऱ्या पुरुषाचा ताबा नाही घेऊ शकायची?

**ऊर्मिला :** बी. के. जाऊ दे हा विषय...तू आता पूर्णपणे तिच्याविषयी प्रेज्युडाइस झालायस...मी तिला जवळून ओळखते...गेले सात महिने...

**बी. के. :** सात महिने? आता कितवा चालूय तिला?

**ऊर्मिला :** सहावा—

**बी. के. :** म्हणजे, पोराची हालचाल सुरू झाली असेल नाही?

**ऊर्मिला :** (हसून) हो...का रे?

**बी. के. :** ऊर्मे, एक इच्छा होती...अपुरीच राहिली...

**ऊर्मिला :** काय?

[बी. के. हळूच ऊर्मिलाच्या ओटीपोटाला कान लावतो. नि पुटपुटतो...]

**बी. के. :** आपलं पोर असं गडबडायला लागलं...की त्याचा धांगडधिंगा कानानं टिपायचा...

[तोच छंदाचा आरडा ओरडा ऐकू येतो. 'अबे मारता है' नि बी. के. व ऊर्मिला ताडकन उठतात. छंदाच्या बेडरूमकडे धावतात.]

अंधार...रिव्हॉल्व्हिंग फिरू लागते.

प्रवेश तिसरा समाप्त

## प्रवेश चवथा

छंदिताचा आरडाओरडा ऐकून ऊर्मिला आणि बी. के. धावत येतात. पाठोपाठ बहादूरही. छंदिता वेड्यासारखी बेडवर बसलेली, अस्ताव्यस्त पसरलेले केस. कपड्यांचे भान नाही. दोन्ही हाताने पोट चाचपत—कुठे तरी दूर पाहत...स्वतःशीच ती हसत असते. मध्येच ओरडत असते.]

**छंदा :** अबे...अबे...मारता है? लाथ मारता है?

**ऊर्मिला :** (तिला हलवत) छंदा...कोण मारतंय तुला? शुद्धीवर आहेस ना?

छंदा : ( तिला झटकत ) ये ही शैतान...नाव कुठं ठेवलंय त्याचं ?

[ ऊर्मिला छंदाच्या पोटावरून फिरणारा हात पाहते...हसते नि मागे सरते. छंदा बडबडतच असते. तिच्या पोटात मुलाची हालचाल सुरू झालेली आहे. ऊर्मिलाच्या चेहऱ्यावर थोडी उत्सुकता—थोडी उदासीनता...]

छंदा : ( चुचकारत ) चलो...चलो...सो जा बेटा...ऐसा नही करना... अपनी मांको लाथ मारता है...आं–आं–आता कसा सैतान शांत झाला... तुझं डोकं कुठाय ?...कुठाय ?

बी. के. : ए छंदा—केवढी बोंबाबोंब करतीयस ? जगात काय तुलाच प्रथम पोर होतंय काय ?

छंदा : सेठ, जगात किती पैसा पडलाय ? खूप...भरपूर...तरी तुला तुझ्या पैशाचा किती रुबावय ? का ?...तो तुझाचय बोलून चालून म्हणून ना ? तसंचय...जगात हजार बायांना हजार पोरं होत असतील...ये तो मेरा अपना बच्चाय !

[ तिच्या 'मेरा बच्चा' या शब्दांनी तिघेही चमकतात. ]

सेठ, यार याचं नाव तरी काय ठेवू ? ज्याला नाव नाही त्याला कसली ओळख नाही...आणि ज्याला ओळख नाही, त्याला कसली इज्जत नाही, रस्त्यावरला कोणीही हाक घालतो...ए चायवाला ऽऽ ए टॅक्सीवाला ऽऽ ए–ए रंडी–ए लौंडी...

बी. के. : ( विषय बदलण्याच्या हेतूने ) ते जाऊ दे...छंदा, तुला घर पाहिजे होतं ना...मी चौकशी केली...साधारण साठ-सत्तर हजार रुपयांत.

छंदा : ( मध्येच तोडत ) कैसा आदमीय यार तू सेठ ? मी माझ्या बच्च्याचा विचार करते...अन् तू पैशाचा ?...बोल याचं नाव काय ठेवू ?

बी. के. : ( तिरसटून ) ठेव कुठल्या तरी फिल्लम स्टारचं...

छंदा : ( क्षणिक उत्साहाने )...क्या बात है ?...काय ठेवायचं... नको... अशी पोरं फार आवारा गर्दी करतात. सेठ, आमच्यासारख्या बायांनी आधी कधी आय होऊच नये...आमची पोरं आऊट लाईनला जातात. कोणाचा दुवा नसतो ना त्यांना...( पाणावल्या डोळ्यांनी ) बहादूर...एक काम करना अपना...मंदिरात जाऊन भगवानला एक हार चढव. त्याला बोल, बदनशीब छंदाला बददुवा दिलास...तिच्या पोराला तरी दुवा दे... येताना मलंगबाबाला देखील चादर चढव...

बी. के. : ( खिशातून पैसे काढत ) बहादूर किती पैसे लागतील ?

छंदा : ( झिडकारत ) अरे सेठ, तुझा पैसा राहूदे तुझ्याकडे...माझ्या मुलाला

तुझ्या पैशाचा दुवा नको.

[ पोलक्यातून एक मळकी नोट काढून बहाद्दूरच्या हातात ठेवते... बहाद्दूर जातो. बोलता बोलता छंदाला वास्तवाची जाण होते. ]

सेठ, शिवी दिल्यासारखी काय तरी बोलून गेले. माफ करून टाक... ...आपला सौदा दोन लाखाला पटलाय ना? तुझा बच्चा तुला देऊन जाईन...( डोळ्यांतील पाणी लपवत एकदम पाठमोरी वळते. ती बहाद्दूरला ओरडून सांगते. ) बहाद्दूर—नारळ बघून घे...पाणीवाला. नासका नको. आणि फुलं, हार देखील ताजा पाहिजे. पाणी मारलेला नको. फुलं वासाची घे हं...फुलवाले हारवाले फसवतात. ( छंदा वळते...तिला गहिवरून आलंय. बोलवत नाहीय...) सेठ, बरोबर बोलली ना?...वयानं छोटी असली ना...तरी दुनिया खूप मोठी बघितलीय मी. (देवाच्या दारात जेवढी माणसाची फसवणूक होते ना, तेवढी दुसरीकडे कोठे होत नाही)

[ गर्रकन् वळून निघून जाते. दोघे सुन्न होऊन उभे आहेत. ]

**बी. के.** : ऊर्मी, कुठे गेली ही?

**ऊर्मिला** : पाठीमागे सर्व्हन्टस् क्वॉर्टर्स्‌मध्ये...माळणीच्या घरी.

**बी. के.** : ती कर्मठ माळीण घरात घेते हिला?

**ऊर्मिला** : उपदेश देखील करते!

**बी. के.** : कसला उपदेश?

**ऊर्मिला** : पोटुशी आहेस. रोज जात्यावर बसून दळण दळत जा...कमरेचा व्यायाम या दिवसांत चांगला असतो.

**बी. के.** : ( उपहासाने ) होऽऽऽ जात्यावर बसून ही छचोर छंदा काय म्हणणार? फिल्मची गाणी?

[ आणि खालून जात्याच्या घरघरीवर ओवी ऐकू येऊ लागते. ]

**“ आसू आवस पुनीव**
**आसू दिवाळी पाडवा**
**माझ्या राजाच्या रूपात**
**चंद्र घेतो ग इसावा ”**

[ छंदाच्या या आवाजाने बी. के. क्षणभर चपापतो. ]

**बी. के.** : ऊर्मी,...ही छंदा गातीय?

**ऊर्मिला** : का?...तुला आश्चर्य वाटलं? बी. के. तुला तिची इतकी किळस, घृणा का?...कशासाठी?

[ पुन्हा आवाज वाढू लागतो. दोघे सुन्न होऊन ऐकतात. ]

" छोटं अंगडं टोपडं
काय वाळं बिंदल्या ह्या
आल्या डोळ्यातनं तान्ह्या
आल्या मोतीयाच्या धारा "

**ऊर्मिला** : बी. के., छंदा देवाला वाहिली गेलेली मुरळी असली, नि दुर्दैवाने आंटीच्या कुंटणखान्यातली रांड बनली असली...तरी—बी. के...तिनं-देखील झोळण्यात पडल्या पडल्या...झोके घेता घेता...आईच्या मुखानं अंगाई कधीतरी ऐकलीय...

[ पुन्हा जात्याच्या घरघरीवर अंगाई वाढत जाते. ]

" केला हातांचा पाळणा
केली डोळ्यांची रे जोत
तुझ्या माझ्या नशिबात
ताटातुटीचं रे सुख "

[ ऊर्मिला एकदम तडफडत उठते– ]

**ऊर्मिला** : बी. के. मला भीती वाटते रे...भीती वाटते...

**बी. के.** : कसली भीती वाटते ?

**ऊर्मिला** : मघाशी, ही छंदा काय बोलली...ऐकलंस ?

**बी. के.** : काय बोलली ?

**ऊर्मिला** : देवाच्या दारात जेवढी माणसाची फसवणूक होते...तेवढी इतर कोठे होत नाही.

**बी. के.** : काय ?...काय म्हणायचंय काय तुला

**ऊर्मिला** : या साऱ्या प्रकरणात...आपण तिघे फसत तर नाही ना चाललो ?

[ दोघं निःस्तब्ध. निःशब्द. जात्याच्या घरघरीवर वाढती ओवी— ]

" उद्या काय गाऊ गळा
सूर सुकंल सुकला
तुझ्या आठवणीनं बाळा
ऊर दाटंल दाटला..."

[ हळू हळू अंधार. पडदा सरकू लागतो. ]

अंक दुसरा........प्रवेश चौथा समाप्त

**अंक समाप्त**

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ पडदा उघडतो.
जाझ म्युझिक वाजत आहे.
बाहेर फटाक्यांची आतषबाजी चालली आहे...
बंगल्याला विजेच्या माळांची रोषणाई केलेली दिसत आहे.
सिटिंगरूममध्ये फुलांचे बुके—साईडबोर्डावर मिठाईचे पुडे नि खेळण्यांचे, बाहुल्यांचे ढीग ठेवलेले आहेत.
राजा आणि बी. के. दोघे साग्रसंगीत जाम्यानिम्यासह पीत बसले आहेत बी. के. चा चेहरा आनंदाने फुलून गेलाय... ]

**राजा :** काय बी. के....कसं काय वाटतं ?

**बी. के. :** ( हातातल्या कार्डाशी खेळत ) हं...हं...हं...खूप प्रसन्न...तसंच एकदम प्रौढ...जबाबदार झाल्यासारखं वाटतं...च्यायला, राजा...एका पोराची जबाबदारी एका कारखान्याएवढीच असते नाही ?

**राजा :** ( खो खो हसत ) मग ?...माझ्याकडे देखील एक कारखाना आणि दोन छोट्या फॅक्टऱ्या आहेत. काय...कार्डाशी काय खेळतोयस ?

**बी. के. :** राजा, हे साधंसुधं कार्ड नाही...टॉमटोचं बर्थ कार्डय...
( वाचू लागतो ) वजन : साडेआठ पौंड, उंची : चाळीस सेंटीमीटर, रंग : गुलाबी गोरा, डोळे : निळसर, जावळ : भरपूर, केस : कुरळे, हेल्थ : फर्स्टक्लास. राजा..

**राजा :** काय ?

**बी. के. :** मला पहिल्यांदा एक्सपोर्ट ऑर्डर मिळाली होती, किरकोळ चार लाखाची...तेव्हाही सारी संध्याकाळ असाच बसलोतो...स्वतःशी फुलत. फक्त व्हिस्की इंडियन होती...मला कळत होतं...दिसत होतं...ही चार लाखाची ऑर्डर हळूहळू चाळीस कोटीवर जाणार आहे. आपली आठ लाखाची स्मॉलस्केल इंडस्ट्री बघता बघता हेवी इंडस्ट्रीकडे झेपावणारय... मजा आला...फार छान वाटतं. राजा,...गेल्या वेळी तुझ्याशी केला त्याच्यापेक्षा जास्त प्रभावी युक्तिवाद आता मी कोणाशीही करीन...फक्त

विषय बदलायचा...

**राजा :** काय ठेवायचा ?

**बी. के. :** प्रत्येकाला मूल असलंच का पाहिजे !

[ दोघेही मनमुराद हसत असतात. तोच बेल वाजते. बहाद्दूर दरवाजा उघडतो. अप्टुडेट सुटातील एक तरुण, हातात बुके नि मोठी बाहुली घेऊन येतो. ]

**तरुण :** गुड ईव्हिनिंग सर...

**बी. के. :** गुड ईव्हिनिंग...

**तरुण :** सर मी फिरोदिया सेठजींकडून आलोय. सेठजींचा निरोप होता...

**बी. के. :** काय ?

**तरुण :** सॉरी...उद्याच्या पार्टीला मी येऊ शकत नाही, कलकत्त्याला जायचं आहे. पुढल्या आठवड्यात बाळाला पाहायला येईन.

**बी. के. :** हरकत नाही.

**तरुण :** सेठजींनी आपल्यासाठी शुभेच्छा ( बुके देतो ) नि बाळासाठी शुभाशीर्वाद पाठवलेत. ( खेळणे देतो. )

**बी. के. :** थँक्यू...कमॉन, जॉईन अस्...

**तरुण :** नो थँक्यू सर...सेठजींबरोबर येईन...पण तेव्हा एवढीशी पुरायची नाही.

**बी. के. :** ( पाठीवर थाप मारत ) काळजी नको मित्रा...आपण पिप आणून ठेवू...

[ हसत तरुणाला दरवाज्यापर्यंत सोडायला जातो. तोच फोन खणखणतो. राजा उचलतो. ]

**राजा :** एस...बी. के. व्हिला...जस्ट होल्ड ऑन्...बी. के. फोन उद्योगमंत्र्याचाय...

**बी. के. :** ( फोन घेत ) बी. के. हिअर, भाऊसाहेब...

[ फोनवर आवाज येऊ लागतो. ]

**भाऊसाहेब :** कॅांग्रेच्युलेशन...कॅांग्रेच्युलेशन बी के. पहिला बेटा...सोन्याचा गोटा...हा...हा...हा...

**बी. के. :** थँक यू थँक यू,...भाऊसाहेब...काय सध्या काय चाललंय ?

**भाऊसाहेब :** डोक्याला हात लावून बसलोय.

**बी. के. :** का हो ?

**भाऊसाहेब :** आम्ही रोज ओरडतोय...राष्ट्र स्वावलंबी बनवा...आणि आमचे तुमच्यासारखे उद्योगपती...पोरं देखील कोलॅबरेशनमध्ये काढायला लागले...

[ बी. के. एकदम गोरामोरा होतो. नि चाचरतच विचारतो ]

**बी. के.** : कोलॅबरेशन ?...का...काय झालं भाऊसाहेब ?

**भाऊसाहेब** : अरे बी. के...बाळंतपणासाठीदेखील स्वित्झर्लंडच्या मॅटर्निटीची मदत ? हिंदुस्थानात काय बाळंतपणं होत नाहीत ?

**बी. के.** : ( लक्षात येऊन सावरत ) नाही, तसं नाही भाऊसाहेब. तुम्हाला माहितीय...ऊर्मीचा थोडा प्रॉब्लेम होता...गेल्या वर्षी ट्रीटमेंटला पाठवली. तेव्हाच त्यांनी सांगितलं होतं...डिलिव्हरीलासुद्धा इकडंच यावं लागेल.

**भाऊसाहेब** : अच्छा, मग काय हरकत नाही. काय, पार्टी केव्हा देतोयस ?

**बी. के.** : उद्या संध्याकाळी.

**भाऊसाहेब** : तुझ्या टेरेसवर का ?

**बी. के.** : भाऊसाहेब, गरीब लहान माणूस असलो तरी, तुमच्यासारखे खूप आश्रयदाते हितचिंतक आहेत...सगळे कसे टेरेसवर मावणार ? गार्डन पार्टी देतोय.

**भाऊसाहेब** : उद्या येतोय मी.

**बी. के.** : जरूर. वाट पहातोय...[ फोन ठेवतो. ]
राजा, क्षणभर थरकाप उडाला रे...

**राजा** : का ?

**बी. के.** : नाही. हा भाऊसाहेब म्हणाला ' पोरंही कोलॅबरेशन '...वाटलं छंदा प्रकरण कळलं की काय याला ?

**राजा** : सोड रे...कोणाला कळणारंय ?...हा बहाद्दूर तोंड असून मुका. माळणीला बंगल्याबाहेरील कोणी ओळखत नाही...राहिलो आपण चौघं. तिकडे स्वित्झर्लंडला मॅटर्निटी होम...

**बी. के.** : छंदाचं नाव ऊर्मिला म्हणून लावलंय.

**राजा** : संपलं.

[ पेग भरू लागतो. ल वाजते. तारवाला येतो. बी. के. तारांचा ढीग हातात घेतो. चाळतो.]

**राजा** : कसल्या तारा ?

**बी. के.** : अभिनंदनाच्या...( सह्या करता करता ) राजा सरकारी जाहिरातीने प्रचाराचा फारसा काही उपयोग होत नाही असं दिसतंय...

**राजा** : का ?

**बी. के.** : सगळ्या एकजात एकच तारा.

**राजा** : काय ?

**बी. के.** : हाच सुदिन पुन्हा पुन्हा येवो..

(मेनी हॅपी रिटर्नस् ऑफ द डे)

[दोघेही हसतात. बी. के. तारवाल्याला कागद देतो. तारवाला सलाम करतो. बी. के. खिशातून शंभराची नोट काढतो.]

**तारवाला :** साहेब, बक्षिसी नेहमी घेतो...आज तोंड गोड केलं पाहिजे.

**बी. के. :** अरे हो...सॉरी.

[उठून ताटातले दोन पेढे नि मिठाईचा मोठा पुडा हातात ठेवतो.]

हां...घरी, चिल्ल्यापिल्ल्यांसाठी खाऊ.

**तारवाला :** (मिठाई घेत) साहेब, बाळाला पाहायला मिळेल का?

**बी. के. :** व्हाय नॉट? (वर पाहत)

छंदा, टोमॅटोला खाली आण.

[बी. के. पुन्हा ग्लास भरतो. छंदा मुलाला घेऊन येते. संपूर्ण बदललेली खराब साडी, छातीभोवती टॉवेल, चेहऱ्यावर कारुण्य. तारवाला त्याच्याशी बोबडं बोबडं काहीतरी बोलतो.]

**तारवाला :** साहेब छोकरा अगदी आईसाहेबांसारखा दिसतो.

[बी. के. व राजा एकदम एकमेकांकडे पाहतात. तारवाला मुलाच्या हातात पाच रुपये ठेवतो नि जातो. छंदा मुलाला घेऊन वर जाते.]

**बी. के. :** हे काय? तारवाल्याने काय...

**राजा :** पाच रुपये घातले रे बाळाच्या हातात.

**बी. के. :** पाच रुपये?

**राजा :** पद्धत रे...

[तोच छंदा येते. बी. के. ची मान खाली जाते. तिची नजर चुकवायचा त्याचा प्रयत्न असतो. ती मात्र रोखून पाहत असते.]

**छंदा :** सेठ, हे पैसे—सतरा रुपये. बाळाला आले. (पैसे ठेवते)

**बी. के. :** सतरा रुपये कसे?

**छंदा :** बहादूर, ड्रायव्हरनी पाच पाच रुपये घातले. माळीणआजीने दोन रुपये. हे आत्ताचे पाच.

**बी. के. :** ठेव...ठेव...तुझ्याकडेच.

**छंदा :** नको सेठ, बाळाचे पैसेत...बाळाचेच राहू द्या.

(जायला लागते)

**बी. के. :** छंदा...सकाळपासनं हे पोतेरं नेसून काय बसलीयस?

**छंदा :** एवढी, ही एकच साडीय माझ्याकडं...

**बी. के. :** बाकीचे कपडे कुठे गेले तुझे?

**छंदा :** ते कपडे लेकुरवाळ्या बाईला शोभत नाहीत.

**बी. के.** : ठीकय्...ठीकय्, हा असा टॉवेल नको अंगावर घेऊन हिंडू...घाण दिसतो...

[ छंदा खालच्या मानेने जाते. ]

**बहाद्दूर** : जी साब ?

**बी. के.** : हे बघ...आठच वाजतायत...वर जाऊन बाईसाहेबांकडून पैसे घे. आणि बाजारात जाऊन छंदासाठी डझनभर साड्या...नि काय परकर पोलकी लागतील ती घेऊन ये.

**बहादूर** : जी साब...( बहाद्दूर जातो. )

**राजा** : बी. के. तुला एक विचारू ?

**बी. के.** : काय ?

**राजा** : छंदासमोर...आज तुझी नजर अशी खाली का ?

**बी. के.** : ( क्षणभर चमकून पाहत राहातो )...राजा, जी नजर मुजोर उर्मट असते ना...तिच्याकडे मी ताठ मानेनं, लाल डोळ्यांनी पाहातो... पण...

**राजा** : पण काय ?

[ बी. के. अस्वस्थ, कावराबावरा होत उठतो. ]

**बी. के.** : राजा,...तुला माहितीय मी रायफल क्लबचा लाईफ मेंबर होतो... अट्टल शिकारी होतो.

**राजा** : माहितीय.

**बी. के.** : पण मी शिकार सोडली

**राजा** : का ?

**बी. के.** : एकदा आम्ही सगळे मित्र रे......वनीएरीयात गेलो होतो शिकारीला. मी जीपमध्ये रायफल घेऊन उभा होतो.—दूर हरणांचा कळप दिसला... आमचा वास लागला नि सुसाट धावत सुटला...पाठलागावर आम्ही. —चांगला पंधरा वीस मैल पाठलाग केला. जसा जसा पाठलाग वाढू लागला...तसं, तसं एक हरीण कळपातनं मागं मागं पडू लागलं...ते हरीण नेमकं टप्प्यात आलं...आणि मी बार टाकला...हरीण जागच्या जागी कोसळलं...मी जवळ गेलो नि माझ्या लक्षात आलं...ते हरीण मागे का पडत होतं...

**राजा** : का पडत होतं ?

**बी. के.** : राजा...ते हरीण नव्हतं रे...हरिणी होती...गाभण होती. हातपाय झाडत शेवटचे आचके देताना...तिनं माझ्याकडे इतक्या करुणेनं... वेदनांनी पाहिलं रे...( कासावीस होतो. ) माझ्या हातातली रायफल खाली पडली. ( ग्लास खाली पडून फुटतो. ) मला बरेच दिवस खुळ्यासारखं

वाटायचं...आपण गाभण हरिणी मारली म्हणून आपल्याला मूल होत नाहीय—सारखे तिचे कारुण्याने भरलेले टप्पोरे डोळे समोर दिसायचे रे.

**राजा :** मग ?

**बी. के. :** मोठ्या मुष्किलीने ती आठवण मी बुजवून टाकली. रायफल क्लबचा राजीनामा दिला....होत्या-नव्हत्या बंदुका विकून टाकल्या. घरातली हरणा-—वाघांची कातडीही काढून टाकली...शिकारींचे आल्बम जाळून टाकले... पण—पण—

**राजा :** पण काय ?

**बी. के. :** टचकन खपली उडाली रे...आठवण भळभळू लागली...

**राजा :** का ? काय झालं ?

**बी. के. :** आज टोमॅटो तीन महिन्यांचा झाला रे. पुढल्या महिन्यात छंदा जाणार. म्हटलं आजपासनंच त्याला वरच्या दुधाची—बाटलीने दूध पाजायची सवय केलेली चांगली...म्हणून सकाळी मी वर गेलो...छंदा टोमॅटोला पाजत होती...मी तिला म्हटलं—' छंदा, हे शेवटचं...पुन्हा अंगावर पाजायचं नाही ! ' आणि एकदम छंदानं वर माझ्याकडं पाहिलं.——ती काही बोलली नाही रे,—पण राजा, ती त्या गाभण हरिणीच्या डोळ्यानं पाहात होती. – तीच ती गाभण हरिणी...मी शिकारी...खून केला रे तिचा... खून केला...पाप केलं.

**राजा :** ( बी. के. ला बसवत ) बी इझी बी. के.—बी इझी—चल एक पेग घे. —

**बी. के. :** ( पेग घेत ) राजा—(दारू हा कोणत्या आठवणीवर, दुःखावर उपाय नाही रे—काळ—खूप काळ—खूप काळ—गेला ना, की माणसं दुःखं आठवणी विसरतात—) ओनली टाईम इज रेमडी—ओनली टाईम इज रेमडी—

[ खूप वेळ शांतता. बहादूर येऊन फुटलेल्या काचा घेऊन जातो. ]

**राजा :** बी. के. मला कधी कधी आश्चर्य वाटते...

**बी. के. :** कसलं ?

**राजा :** तू अगदी आम्हा सामान्य माणसांसारखाच...भावुक, रागीट, हेकट, मत्सरी...तूही आमच्यासारखाच षड्रिपूंच्या धाग्यांनी बांधला गेलेला आहेस...मग तू इतका यशस्वी कसा झालास ?

**बी. के. :** कसा झालो ?...राजा तुमच्या माझ्यात एक फरकय्...

**राजा :** काय ?

**बी. के. :** मला माझ्यातले दोष, उणिवा यांची प्रकर्षाने आहे. जाणीव

स्वतःशी मी कधी खोटं बोलत नाही...त्यामुळे जशी गरज पडेल...तसा मेंटल सेटअप मी बदलतो. कठीण असतं...त्रास होतो फार...पण मी स्वतःचा मेंटल सेटअप बदलतो.

**राजा :** कसा ?

**बी. के. :** आजचंच उदाहरण घे ना...ऊर्मी दुपारी जेवताना मला म्हणाली, छंदानं आपल्या घराचं गोकुळ केलं...आपल्याला वारस दिला.

**राजा :** मग ?

**बी. के. :** नुसत्या पैशानं काय होणार ?...तिला कुठं तरी सन्मानाचं जीवन जगू दे—पुन्हा कोठीची पायरी चढायला नको लागू दे—तू—तू तिला कुठं फॅक्टरीत अगदी कुठं—पॅकेजिंग डिपार्टमेंटला तरी हेल्पर म्हणून—

**राजा :** बरोबर म्हणाली ती.

**बी. के. :** पण मी नाही म्हणालो—अवघड काही नाही रे...नुसत्या कागदाच्या चिठोऱ्यावर सही खरडायची—पण मी नाही म्हणालो.

**राजा :** का ?

**बी. के. :** कारण ते गाभण हरिणीचे डोळे...कुठे जवळपास जरी भिरभिरत राहिले ना—मी अस्वस्थ होईन. संपेन...लाख, दोन लाख तिला जास्त घेऊ देत...पण अपॉईंटमेंट लेटर नको !

[ क्षणभर शांतता...वरून दडदडत ऊर्मिला येते. सुखावलेली, सुस्तावलेली—सतेज आणि प्रसन्न ]

**ऊर्मिला :** बी. के. ( राजा हसू लागतो. ) हसायला काय झालं रे राजा ?

[ राजा तिला जवळ ओढून खांद्यावर हात टाकतो. ]

**राजा :** च्यायला,...बाळंत झाली छंदा—पण सुखावली नि सुस्तावली मात्र आमची उमाताई हं—

**ऊर्मिला :** ( खोचून ) राजा, उमाताई म्हणजे मानलेली 'उमाताई' ना !

**राजा :** ( तिला ढकलत ) हाततिच्यायला...बाईची जात डूख सोडणार नाही.

**ऊर्मिला :** बरं ते राहू दे राजा—उद्या पार्टीला यायचं...बायकोसह...

**राजा :** यस् मॅडम...

**ऊर्मिला :** बायकोला सांग अंगावर फुटका मणी नसला तरी चालेल...पार्टीला यायचं...

**राजा :** ए कोणाशी बोलतीयस तू ? माझी बायको सोन्यानं मढलीय.

**ऊर्मिला :** कशी रे ?

**राजा :** तुला कळायला पाहिजे—मी बी. के. इंडस्ट्रीजच्या लीगल डिपार्टमेंटला काम करतो—नि या वर्षी आम्हाला साडे बावीस टक्के बोनस मिळाला

**ऊर्मिला :** बी. के.... हे काय ऐकतेय मी ?... दरवर्षी साडेआठ टक्क्यांसाठी संप मोर्चे—

**बी. के. :** हे बघ, मी माझा मालकय... काय वाटेल ते करीन.

**ऊर्मिला :** झालं... एवढ्यात माझा अर्धा वाटा संपला ?... बोनसमध्ये गेला ?

**बी. के :** उमे,... टोमॅटोचा संपूर्ण वाटा तुला दिलाय ना ?... सारे श्रम, कष्ट माझे... तुझं काही नाही... तरीसुद्धा—

**ऊर्मिला :** ( बी. के. चे तोंड दाबत ) चूप—काहीतरी फाजीलपणा नको... बरं मी असं म्हणत होते'बी. के....

**बी के. :** काय ?

**ऊर्मिला :** शेअर बाजारातील ब्रँच किती वाजेपर्यंत उघडी असते ?

**बी. के. :** रात्री साडेनऊ पर्यंत.

**ऊर्मिला :** ठीक. मग मी जाते नि लॉकरमधले दागिने घेऊन येते. येताना छंदाच्या साड्याही मीच आणते...

**बी. के. :** अगं—पण आज सकाळीच तू लॉकरमधनं दागिने काढलेस ना ?

**ऊर्मिला :** मला पाहिजे ते दागिने मी घेऊन आले रे—तेव्हा माझ्या लक्षातच नाही आलं...

**बी. के. :** काय ?

**ऊर्मिला :** हे बघ. उद्या पार्टीमध्ये छंदाही असणार... तिनं मोकळ्या हातानं ... गळ्यानं वावरणं किती वाईट दिसेल ?

**बी. के :** ( निक्षून ) ती उद्या पार्टीत वावरणार नाही.

**ऊर्मिला :** अरे पण..

**बी. के. :** ऊर्मे, चर्चा नको... वाद घालायचा नाही मला.

**ऊर्मिला :** नाही घालत वाद. पण तूच म्हणाला होतास की, तिला बांगड्या, चेन करून दे सोन्याची.

**बी. के. :** म्हणालो होतो.

**ऊर्मिला :** तेव्हा मीच विचार केला, लग्नातले माझे दागिने, ओल्ड फॅशनचे... मी काही ते वापरत नाही – तेच तिला—

**बी. के. :** नाही ऊर्मी... माझ्या आईने तुझ्यासाठी ठेवलेले सौभाग्यालंकार आहेत ते—एका मुरळीच्या अंगावर चढायला नकोत .

**ऊर्मिला :** अरे पण—तिच्या अंगावर काही नाही... आहेत ते पितळ्या निकलाचे... नाहीतर कचकड्या प्लास्टिकचे...

**बी. के. :** हे बघ, जरुरीपुरते तिच्यासाठी नवे घे—

**ऊर्मिला :** अरे पण... विनाकारण नव्याने खर्च...

**वी. के.** : पाच पंचवीस हजार इकडे तिकडे—

**ऊर्मिला** : ठीकय. तुझी मर्जी—बोलावून माप घेते—छंदा...ए छंदा...

[ छंदा येते. छातीभोवती घट्ट टॉवेल गुंडाळलेला, मान खाली ]

छंदा तुझ्यासाठी काही थोडसं आणायचं होतं—बांगडी दे...

[ छंदा खालच्या मानेने बांगडी काढून देते. ]

गळ्याचं माप दे !

**छंदा** : ( चाचरत ) वरनं पाठवून देते.

**ऊर्मिला** : अगं प्लास्टिकच्या मण्यांची माळ आहे ना ? तीच दे...अन् हा टॉवेल काय गुंडाळलायस घाणेरडा—

[ सहज ऊर्मिला टॉवेल खेचते. छंदा एकदम स्फुंदत हाताच्या तळव्यांत तोंड लपवते. वी. के. राजा चमकतात. छंदाची छाती संपूर्ण ओली झालेली असते. ]

**ऊर्मिला** : छंदा ! छंदा ! हे काय ग !

**छंदा** : ( एकदम कोचावर पडून मान टाकत ) मेमसाब—बाळाला दुधावरनं तोडलं...तरी पान्हा नाही आटत हो...पान्हा नाही आटत—

[ छंदा हंबरडा फोडते. नि अंधार—]

अंक तिसरा

प्रवेश पहिला समाप्त

## प्रवेश दुसरा

[ सकाळची वेळ. राजा येतो. वी. के. त्याची वाटच पाहत बसलेला आहे. राजाच्या हातात खेळण्यांचा बॉक्स... ]

**वी. के.** : ये रे—राजा ये रे—बहादूर चहा आण.

**राजा** : ( बसत ) सकाळीच फोन करून बोलावून घेतलंस...इतकं काय तातडीचं काम निघालं ?

**वी. के.** : काम काही नाही रे जस्ट चिटचॅटिंगसाठी.

**राजा** : ( चाट ) गप्पा मारायला बोलावलंस, सकाळचं ?

**वी. के.** : हो. तो कोण उर्दूशायर म्हणाला ना—वेस शाम वगैरे तशी अलीकडे प्रत्येक पहाट म्हणजे—माझी वेस मोर असते. साली, पहाटे पाचलाच

जाग येते. मग वेळ जाता जात नाही.

**राजा :** पाच वाजता उठतोस ?...सुधारणाय तुझ्यात. उमा, सूर्यवंशी म्हणून तुझ्या नावाने ठणठणायची.

**बी. के. :** आता आलार्म ठणठणतो.

**राजा :** थप्पड मारून बंद करायचा.

**बी. के. :** घड्याळ्याचा अलार्म नाहीरे...टोमॅटोचा अलार्म...साल्याला बरोबर पहाटे पाच वाजता भूक लागते. उठतो ठणठणत. दूध कोमट करून बाटली भरून बाटली त्याच्या तोंडाला लावेपर्यंत—फॅक्टरीच्या भोंग्यासारखा कोकलत राहातो.

**राजा :** काही नाही, त्याचा आवाज बंद झाला की, पुन्हा डोक्यावर पांघरूण घ्यायचं.

**बी. के. :** नाही रे—मग त्याला थोपटत ही तीन टिकल्यांची रांड—छंदा—अंगाई म्हणायला लागते...ती ऐकली की झोप एकदम पुरी उडते.

**राजा :** बी. के. सभ्य, सुसंस्कृत गृहस्थ आहे तू. सारखा त्या छंदाला घाणेरडे शब्द का वापरतोस ? कशासाठी ?

**बी. के. :** ( उदासपणे ) का ? राजा तुला नाही कळायचं. अरे तिला ह्यूमन इनक्यूबेटर मगजून आपण सौदा केला एक मादी म्हणून—तिच्यात कोणताही बदल होता कामा नये. तो झाला तर—कराराच्या अटी मोडतात...ती स्त्री, आई, गृहीत धरली तर तिचाही मुलावर हक्क प्रस्थापित होतो. तो नकोय. ती टेस्टट्यूबप्रमाणे निर्विकार राहिली पाहिजे...हे मूल माझं आणि ऊर्मीचं आहे . ती एक निर्जीव टेस्टट्यूब आहे.

[ छंदा येते. चहाचा ट्रे समोर ठेवते. बी. के. एकदम गप्प होतो. ]

**बी. के. :** छंदा, तू चहा आणलास ?

**छंदा :** बहाद्दूर अजून आला नाय कामावर...

[ बी. के. चहा बनवू लागतो. ]

सेठ, एक सांगायचं होतं.....

**बी. के. :** काय ?

**छंदा :** बाळ आता पालथा पडू लागलाय.

**बी. के. :** हो पाहिलं मी.

**छंदा :** पण आजवर त्याचा एक बी फोटो नाही काढला...

**बी. के. :** छंदा, आमच्या जातीत मुलगा पाच वर्षांचा होईपर्यंत फोटो नाही काढत.

**छंदा** : ( निराश होत ) फोटो नाही काढत?...त्याला कोणी बी, काय बी नावानं हाक मारतो—खरं तर बाराव्या दिवशीच करतात, पण अजून त्याचं बारसं बी केलेलं नाही. नाव भी ठेवलं नाही.

**बी. के.** : छंदा...आमच्या जातीत मुलगा एक वर्षाचा होईपर्यंत बारसं नाही करत.

**छंदा** : वर्षाचा होईपर्यंत ?

**बी. के.** : जा. तू वर जाऊन मला आंघोळीला पाणी काढ.

[ छंदा जड पावलांनी जाते.]

**राजा** : बी. के. तुझ्या जातीत—तुझ्या जातीत.

**बी. के.** : राजा, तिला निरुत्तर करता येईल, असं हे एवढंच उत्तरंय.

**राजा** : अरे, माझं बारसं करा असं ती म्हणत होती का, माझे फोटो काढा म्हणत होती?...ती तुझ्याच मुला...

**बी. के.** : राजा, अरे तिनं स्वतःसाठी काही मागितलं तर देऊन टाकता येईल पण फोटो नाही...बारसं नाही !

**राजा** : का ?

**बी. के.** : राजा, फोटो काढले की दोन कॉपीज तीदेखील मागेल...मग नाही म्हणता येणार नाही. बारशाचे पेढेदेखील ती खाईल आणि मग...

**राजा** : मग काय ?

**बी. के.** : मग जन्मभर ती फोटो स्वतःच्या छातीशी जपून ठेवेल. आणि बाळाचं नाव डोक्यात—

**राजा** : त्याच्याशी तुझं काय देणं घेणं ?

**बी. के.** : आहे रे—आहे—तिच्याशी मी सौदा केलाय दोन लाख रुपये द्यायचा. दुःख द्यायचा नाही—आतापर्यंत ती फक्त दगडाच्या देवाला दोष द्यायची...आता ती स्वतःला दोष देऊ लागेल...दुःखी कष्टी होईल.. खरं बोलली रे ती. देवाच्या दारातच माणसाची घोर फसवणूक होते. त्याने आपलं वर बसल्या बसल्या खाली हिला फसवलं...एकदा मुरळी बनवून, आणि आता आई बनवून.

**राजा** : कशी काय ?

**बी. के.** : राजा आठवतंय तुला ? दीड–दोन वर्षांपूर्वी तिला घरात आणलं तेव्हा कशी होती—एक वेश्या होती—चेहऱ्यावर बाजारबसवेपणा उठून दिसत होता..पैशाशिवाय दुसरा कुठला विचार सुचत नव्हता. अरे पण जसं जसं मूल पोटात वाढू लागलं ना...तसतसा तिच्या चेहऱ्यावरला बाजारबसवेपणा धुऊन जायला लागला...जसजसं मूल वाढू लागलं तसतसं

तोंडातलं फिल्लमचं गाणं जाऊन गळ्यात अंगाई यायला लागली. आणि ती बाळंत झाली तेव्हा तिच्या छातीत दुधाचा झरा फुटला...तसं हृदयात मातृत्व उमललं...आता बघ तिच्या चेहऱ्यावर फक्त वात्सल्य आणि कारुण्य दिसतं...

**राजा :** बी इझी बी. के...बी इझी.

**बी. के. :** इझी प्रॉब्लेम सुटेल असं वाटलं पण केवढ्या कॉम्प्लिकेशन्स ? चक्क ती आई झाली. स्त्री झाली...कशी रे ? तिची चूकय् ती—आपण तिला फक्त तिचं गर्भाशय भाड्यानं मागितलं होतं. टेस्ट टयूब व्हायला सांगितलं होतं. बदमाष आई झाली. ठीकय्—मग तू भोग तुझं दुःख...

[ अस्वस्थपणे तोंड चोळतो. ]

राजा कितीही कठोर झालो तरी मी शेवटी माणूसचंय रे. माणूस म्हणून दुसऱ्या माणसांचा विचार येतोच डोक्यात. मग मला स्वतःच्याच डोक्याशी ओरडत राहायला लागतं.

**राजा :** काय ओरडत राहावं लागतं ?

**बी. के. :** आय हॅव टु कन्व्हिन्स मायसेल्फ—बी. के....ती एक रांड आहे. छंदा वेश्या आहे...ती वासना शमवायला शरीर भाड्याने देते. तू वात्सल्याची भूक शमवायला तिचं गर्भाशय भाड्याने घेतलं आहेस...ती एक घाणेरडी बाई आहे...बाई देखील नाही. मादी आहे. घाणेरडं स्त्रीलिंगी जनावर आहे ...तिला मन नाही... नीती नाही...चारित्र्य नाही...ती पैशासाठी काहीही सौदा करते...ती ह्युमन इनक्यूबेटर आहे...

[ असहाय्यपणे मूठ कपाळावर आपटत चूप बसतो. बराच काळ सुन्न शांतता...छंदा येते. ]

**छंदा :** सेठ आंघोळीला पाणी काढलंय.

**बी. के. :** थँक्स्...राजा, आलोच दहा मिनिटांत...[ जातो ]

**छंदा :** ( राजाला ) मालक, तुम्ही वकील हायसा ?

**राजा :** हो—तुला माहीत नव्हतं ?

**छंदा :** कधी काळा कोट नाय पायला अंगावर...एक इचारायचं होतं.

**राजा :** विचार.

**छंदा ;** एक धर्माची गोष्ट इचारायची होती. मालक कायद्याची गोष्ट इचारायची होती...पण फी द्यायला माझ्याकडे पैसं न्हाईती.

**राजा :** ( हसून ) तुझ्याकडनं फीच नाही घेणार मी. विचार...

**छंदा :** मालक, धरमराजा फासं खेळताना आधी सवता हरला ना ? कौरवांचा दास झाला ना ?

**राजा** : हो.

**छंदा** : स्वतः दास झाला. तवा त्याचा आपल्या भावांवर, बायकूवर, कसला काय बी अधिकार नाय राहिला...खरंय् ना?

**राजा** : खरंय.

**छंदा** : मग त्याला द्रौपदीला पणाला लावायचा काय अधिकार? धरमराजाचं वागणं कायद्याला धरून झालं का?

**राजा** : छंदा, हे तू कशासाठी विचारतीयस?

**छंदा** : मालक...( गहिवरून )—न्हाणदेखील नव्हतं आलं तवा मला लोकांनी मुरळी केली...मल्हारी रायाशी लगीन लावलं...देवदाशी केली. देवाची दाशी झाली मी...आता देवाच्या जगावर माझा काय बी अधिकार नाय उरला. इतर बायांसारखं मी लगीन नाय करू शकत. देवदाशी मी...मला काय बी अधिकार नाय...मग मालक, जी छंदा मुरळी बनून पहिलीच हरली, तिला तिच्या देवानं जन्माला घातलेल्या बाळाला पैशासाठी पणाला लावायचा काय अधिकार?—कायद्याला धरून होईल का? धरमाला धरून होईल का?

[ राजा ताडकन उभा राहतो. सुन्न होतो. ]

सांगा ना मालक...तुम्ही वकील हायसा ना? कायद्याची बुकं वाचलीयत ना?

[ अंधार होतो. ]

अंक तिसरा
प्रवेश दुसरा समाप्त

## प्रवेश तिसरा

[ सिटिंगरूममध्ये बी. के. अस्वस्थपणे पेपर चाळत बसला आहे. वरून टोमॅटोच्या रडण्याचा बारीक सूर...दुपारची वेळ...पण उदास वातावरण. इंटरकॉम वाजतो. बी. के. रिसीव्हर उचलून बोलू लागतो.]

**बी. के.** : काय रे बहाद्दूर?

**बहाद्दूर** : बराचवेळ झाला, राजासाहेब बागेत वाट पाहात बसलेत.

**बी. के.** : ( आश्चर्याने ) बागेत बसलेत? आत पाठवून दे. [ रिसीव्हर ठेवतो। दुसरे बटन दाबून पुन्हा उचलतो. ] ऊर्मे, राजा आलाय. छंदाला तिचं [ सामान बांधायला सांग...रिसीव्हर ठेवतो.]

[ अपराधीपणे राजा येतो. ]

...तिकिटं मिळाली राजा ?

[ राजा चूपचापपणे तिकिटे समोर ठेवतो. ]

...पाहुण्यासारखा खाली का बसलास ? वर नाही आलास ?

**राजा :** ( उदासपणे ) नाही आलो...

**बी. के. :** ( तिकीट चाळत )...चार दिवसांत फिरकला नाहीस इकडे ?

**राजा :** ऑफिसात भेटतोच की आपण...

**बी. के. :** ( त्रासून ) अरे, असा चेहरा टाकायला काय झालंय तरी काय ?

**राजा :** ( खिन्नपणे ) काय झालं ? कधी कधी काही काही गोष्टी आपल्याला कळतात...पण इतक्या उशिरा, की तोवर आपण जन्माचे अपराधी झालेलो असतो.

**बी. के :** काय कळलंय तुला ?

**राजा :** इतकंच की, वकिलानी कायद्याशी, कायद्यातल्या कलमाशी खेळावं... जित्याजागत्या माणसांशी खेळ खेळू नयेत.

**बी. के. :** ( समजून, उमजूनही ) बस कर...सकाळी सकाळी तुझं हे पराभूताचं रडगाणं ऐकायचं नाही मला—गाडी कितीचीय ?

**राजा :** नऊ पन्नास...

[ जिन्याशी ऊर्मिला येते. सुन्न झालेली. ]

**बी. के. :** ऊर्मे, छंदानं सामान बांधलं ?

**ऊर्मिला :** तिनं नाही...मीच तिचं सामान बांधलं.

**बी. के. :** ठीक झालं...ती तयार झाली ?

**ऊर्मिला :** अजूनतरी नाही !

**बी. के. :** अजून नाही...इतका वेळ ?...तिला म्हणावं, नट्टापट्टा करायला काय तू खिडकीत नाही जाऊन बसणार. गाडीत जाऊन बसणारयस.

**ऊर्मिला :** बी. के. ती तयार झाली नाही...म्हणजे 'तयार झाली नाही'...

**बी. के. :** तू...तू...चेक दिलास तिला ?

**ऊर्मिला :** तिनं न पाहाता तो दूर सारला...

**बी. के. :** का ? काय म्हणतीय ती ?

**ऊर्मिला :** काहीच नाही...भिंतीकडे तोंड करून बसलीय—आसवं गाळत... टोमॅटोला मांडीवर घेऊन...पहाटेपासून क्षणभरदेखील टोमॅटोला हात लावून नाही दिला तिनं...मी इतकं समजावलं पण ती काही बोलायलाच तयार नाही...

**बी. के. :** तिनं काही एक बोलायची गरज नाही...तिनं फक्त चालू लागायची गरजय...

**ऊर्मिला :** ( क्षणिक उत्साहाने ) आपण असं करू या का बी. के. ?

**बी. के. :** काय ?

**ऊर्मिला :** टोमॅटो अजून तान्हा आहे ना, म्हणून तिचा पाय निघत नसेल त्याला सोडून जायला...आपण असं करू, दोन तीन वर्षे तिलाच आया म्हणून नोकरीला ठेऊ...

**बी. के. :** नथिंग डुईंग...मूर्ख मूर्ख आहेस तू...अगं चार महिन्यांचा नुसता मांसाचा गोळा...खेळत नाही, बोलत नाही, माणसांनाही धड ओळखत नाही...त्याच्या बाबतीत ती इतकी पझेसीव्ह आहे...आणखीन दोन तीन वर्षांनी किती पझेसीव्ह बनेल ?

**ऊर्मिला :** अरे पण तिची समजूत पटतच नाही...मी तरी काय करू ?

**बी. के. :** काय करू ?...चेक तिच्या तोंडावर मार—टोमॅटोला तिच्या पुढ्यातून हिसकावून घे—आणि तिला हाकून दे.

**ऊर्मिला :** तिला हाकून देता येईल. पण टोमॅटोला कसं तिच्या मांडीवरून ओढून घ्यायचं ?...मला नाही जमणार हा क्रूरपणा...

**बी. के. :** ( संतापत ) नसलेल्या मुलांसाठी वेडं होता येतं तुला...असलेल्या पोरासाठी क्रूर नाही होता येत ?

**ऊर्मिला** (वेडं होण्यासाठी हलकं काळीज पुरतं...क्रूर होण्यासाठी काळीज घट्ट करावं लागतं.)

**बी. के. :** राजा, जा, तू वर जा नि तिला समजाव...सुनाव...

**राजा :** सॉरी बी. के....मी तिच्याशी एक शब्द बोलू शकणार नाही.

**बी. के. :** का ?...तुला काय झालंय ?

**राजा :** मी निरुत्तर झालोय...चार दिवसांपूर्वी तिनं मला एक प्रश्न विचारला ...ज्याचं उत्तरच माझ्याकडे नाहीय...

**बी. के. :** काय, काय होता तो प्रश्न ?

**राजा :** सांगितला तरी तुला कळणार नाही...कारण ज्या प्रश्नाचं उत्तर नसतं तो तुझ्या लेखी अस्तित्वातच नसतो...

**ऊर्मिला :** म्हणजे ?

**राजा :** म्हणजे उमा, मला असं म्हणायचंय...

**बी. के. :** ( मध्येच तोडत ) तुला काहीही म्हणायचं नाही राजा...तू काहीही म्हणणार नाहीयस्...

[ क्षणभर सुन्न शांतता. बी. के. बार उघडून ग्लास भरतो. ]

**ऊर्मिला :** बी. के....तू जरादेखील इतरांना का नाही समजावून घेत ?

**राजा :** उमा, बायको असून तू असं बोलतीस ?...अग आपल्या तिघांच्या

तोंडून शब्द फुटायच्या आधीच आपल्याला काय म्हणायचंय ते सगळं त्याला समजलंय...

[ बी. के. थरथरत्या हाताने भरभर पितोय... ]

बी. के. आय नो...सकाळी देखील तुला प्यायलाच पाहिजे...कारण तुला तुझा मेंटल सेटअप बदलायचाय—पण—

**बी. के.** : ( तिरसटून ) पण काय ?

**राजा** : बोलायचा काही अधिकार नाही मला...पण बी. के. आयुष्यात जेव्हा अशा प्रश्नांची गाठ पडते...गाठ नाजूक हाताने सोडवावी.

**बी. के.** : ( खिन्न हसत ) पश्चातबुद्धी राजा तुझी ही...पश्चातबुद्धी. अरे ही गाठ जेव्हा माझ्या मानेभोवती पडत होती...तेव्हाच मी ओळखलं होतं...ही गाठ इतकी पक्की बसणारय की हलक्या हाताने ती सोडवून नाही...क्रूरपणे ती सोडून टाकावी लागणारंय...ऊर्मे,...जा...वर जाऊन छंदाला मी बोलावलंय म्हणून सांग...

[ ऊर्मिला जाते. नि बी. के. विचारपूर्वक इंटरकॉम उचलतो. ]

—बहादूर, गाडी आली की वर ये...टोमॅटोला फॅक्टरीत घेऊन जा...

[ रिसीव्हर टेवतो. उर्मिला, छंदा येतात. छंदा खालच्या मानेने उभी राहते. ]

**छंदा** : सेठ, मला बोलावलं ?

[ छंदाला पाहताच बी. के. चा नूर उतरतो. ]

**बी. के.** : ( कसंबसं )—हां.. छंदा, मी तुला अशासाठी बोलावलं...कारण काय आमची एक पद्धतय...जे लोक आमच्याकडे येतात . इमाने इतबारीनं राहतात...प्रेमानं आमचं काम करसात...त्यांना जाताना...आम्ही सेंड ऑफची मोठी पार्टी देतो. मोबदल्याबरोबर आमची आठवण म्हणून चांगलसं प्रेझेंट देतो तुला काय देऊ ?...हिऱ्यांचा नेकलेस आवडेल तुला ?

[ छंदा एकदम वर पाहते .. रोखलेल्या नजरेने. बी. के. क्षणभर गोरामोरा होतो. नि एकदम पिसाटतो. ]

**बी. के.** : काय, डोळे फाडफाडून काय बघतेस माझ्याकडे ? डोळ्यांत मावणारय का तुझ्या मी ? ( क्षणभरात शांत होतो. स्वतःला सावरत, खालच्या आवाजात ) छंदा, नोकर माणसांनी अशा वर नजरेनं पाहिलेलं मला आवडत नाही...हं...मग बोल, काय आवडेल तुला ?—हिऱ्यांचा नेकलेस, का मेमसाहेबांसारखी टोयोटो गाडी देऊ तुला ?

**छंदा** : यातलं काय बी नको मला सेठ...मला फक्त ( चूप बसते. )

**बी. के.** : बोल ना, काय पाहिजे तुला ?

**छंदा :** मला माझं बाळ पाहिजे सेठ—

**बी. के.** : हे असं नाही...असं नाही छंदा,...आपलं काय ठरलं होतं ? बाळाला मी घ्यायचं...तू फक्त पैसे घ्यायचे...आता शब्द नाही फिरवायचा...

**छंदा :** शब्द नाही फिरवला मी सेठ, माझं मन फिरलंय.

**बी. के.** : फिरू दे...त्याचा विचार नाही करायचा. व्यवहार करताना, सौदा करताना मनाचा विचार बिलकूल नाही करायचा

**छंदा :** इचार नाही केला हीच चूक झाली सेठ...पैशासाठी शरीराचा सौदा केला....तवा मला ठावं नव्हतं. (मानसाच्या शरीरातच त्याचं मन दडलेलं ऱ्हातं)—

**बी. के.** : असेल, तसं असेल... पण चूक तुझीय की नाही ? तुझ्या चुकीसाठी मला कशाला पैशांचा भुर्दंड...

**छंदा :** तुमचं काय बी नुकसान नाय सेठ—मला तुमचा एकबी पैसा नको—

**बी. के.** : तू नाही घेतलेस पैसे—तरी आतापर्यंत खर्च किती केला मी ? तुला फॉरिनला नेलं...बाळासाठी केवढा खर्च केला ? लाख दीड लाख तरी खर्च झाले.

**छंदा :** सेठ. तुझ्याकडे मोप पैसाय्...त्यातलं लाख दीडलाख रुपयंच जातील .. माझ्याकडं माझ्या बाळाशिवाय काय बी नाय !

**बी. के.** : ( आवाज चढवत ) तुझ्याकडे काही असो नसो...माझा पैसा काही मला वर नाही आला—

**छंदा :** सेठ, जलमभर तुझी चाकरी करीन...तुझा पै-पैसा फेडंन...

**बी. के.** : ( ओरडत ) तुझी चाकरी नकोय मला...मी इन्व्हेस्टमेंट केलीय... त्याचे रिटर्नस् माझे मला पाहिजेत...

**छंदा :** सेठ—माझा काळजाचा तुकडा नको...

[ रडत बी. के. चे पाय धरायला लागते. बी. के. लाथाडतो. ]

**बी. के.** : तुझं काळीज गेलं खड्डयात—चूक तुझीय्, त्याची शिक्षा तू भोग— काय, राजा—बोल चूक कोणाचीय ?

**राजा :** ( शांतपणे )(एक शहाणा माणूस—आणि एक अडाणी माणूस यांच्यात जेव्हा व्यवहार होतो...आणि तो मोडतो, फिसकटतो...तेव्हा चूक शहाण्या माणसाची असते...अडाण्याची नसते.)

**बी. के.** : ( तारस्वरात ) बरोबर, बरोबर बोललास तू...मी...मी . अडाणी ...मूर्ख...गाढव...म्हणून तर तुझ्यासारख्या फालतू पोटार्थी वकिलाचं... ती लायकी नसताना, काडीची अक्कल नसताना माझ्या गळयात पडलेल्या

मूर्ख, वेड्या ऊर्मीचं ऐकलं मी—च्यायला, पूर्वी फक्त पोरं नसल्याची खंत होती ... आता असून ताब्यात मिळत नसल्याचे हे क्लेश—[ एकदम पुढे होतो. झिंज्या धरून छंदाला उभे करतो. ]

**बी. के. :** ए बाजारबसवे...नसती नाटकं नकोयत मला...तुझ्या रडण्या भेकण्याने काही दयामाया यायची नाही मला...ऊर्मे, वर चालती हो ! टोमॅटोला ताब्यात घे...नि हिचं सामान, पैसे खाली पाठव—

[ ऊर्मिला वर जाऊ लागते. छंदा धावते. बी. के. तिला मागे खेचतो. ]

**छंदा :** मेमसाब, माझ्या बाळाला हात नाही लावायचा...पयलंच बोलून ठेवते ...माझ्यासारखी वाईट वाय नाय...

**बी. के. :** ( थोबाडात देत ) काय ? काय...वाईट करणार ग तू माझं ? चार चवल्यांची...

**छंदा :** ( आता चवताळते ) सेठ,—म्या आसंन चार चवल्यांची. माझं बाळ नाय चवल्यांचं...माझं दूध काय बाटलीतनं नाय इकत मिळत...( बी. के. ला दूर ढकलते ) सेठ,—पैशाची लय घमंडय तुला...पर लक्षात ठेव... जगात सगळ्या गोष्टी काय पैशानं नाय इकत घेता येत...

**बी. के. :** पैशानं विकत घेता येत नाही ते ताकदीनं हिसकावून घेईन मी !

**छंदा :** लई जोर दावू नको सेठ—काय मोगलाई नाय लागून गेली—

**बी. के. :** चूप साली—

**छंदा :** शिव्या द्यायचं काम नाय...म्या तर बाजारात उभीय...तुला बी रस्त्यावर खेचंन...

**बी. के. :** तू मला रस्त्यावर खेचणार...कशी ग ?

**छंदा :** पोलिसात जाऊन रिपोर्ट करीन—माझं बाळ तू हिसकावलं म्हून—

**बी. के. :** ( उपरोधाने ) तू—पोलिसात जाणार ? जा—पैसे पाहिले की लाळ गाळणारे पोलीस...काय वाकडं करतात माझं ते बघतो...

**छंदा :** मग कोर्टात जाईन मी—

**बी. के. :** रस्त्यावरचं काळं कुत्रं विचारत नाही तुला—तू काय कोर्टात जाणार ? काय तुझी तिकडे दाद लागणारय ?

**छंदा :** ( एकदम शांत होत ) ठीकय सेठ...माझी नाय दाद फिर्याद लागायची ...तुझी लागंल ना ? मग तूच जा कोरटात... म्या जाते माझ्या बाळाला घेऊन—

[ वर जाऊ लागते. बी. के. तिला मागे खेचतो. ]

**बी. के. :** कशी नेतेस बाळाला पाहातो...बहादूर, गुरखा...हाकलून द्या भडवीला बंगल्याबाहेर—

[ बहाद्दूर येतो. छंदाला फरफटत ओढत घेऊन जातो. छंदा मोठमोठ्याने ओरडत असते. तळतळाट देत असते. ]

**छंदा :** मुडद्या किडे पडून मरशील...सेठ, तुझं तळपट हुईल....माझ्या... माझ्या बाळाचा शाप तुला लागेल...तुझं कदी भलं नाही व्हायचं ...

[ हळू हळू गलका कमी होतो. सुन्न शांतता. राजा दगडासारखा निश्चल उभा—बी. के. घाम पुसत–धापा टाकत बसतो. ]

**बी. के. :** राजा,—काय चवताळली रे वाघिणीसारखी—भर उन्हात कुठे जाईल रे ही आता ?

**राजा :** खरंच ती बोलल्याप्रमाणे पोलिसात जाईल ..कोर्टात जाईल...तुझ्या अब्रूचे धिंडवडे निघतील.

**बी. के. :** अब्रू गेली खड्डयात—इथे काय रोज माझी अब्रू बी. बी. सी. वरून जाहीर नाही होत...बेअब्रू व्हायला—

**राजा :** बी. के. तरीपण—

**बी. के. :** शब्द बोलू नकोस...पोराला...माझ्या पोराला एका वेश्येच्या ताब्यात देऊ ? पोराच्या भविष्यापेक्षा माझी अब्रू जास्त किमतीची आहे काय ?—

( बी. के. जागचा उठत ) जाऊ दे—जाऊ दे तिला कोर्टात...बघू, न्याय एका कुलीन स्त्रीच्या बाजूने आहे ?...का एका बाजारबसवीच्या बाजूने ?

[ अंधार ]

अंक तिसरा

प्रवेश तिसरा समाप्त

## प्रवेश चवथा

[ पेपरवाल्या पोरांच्या आरोळ्या
' छंदा बाळ प्रकरणाचा आज निकाल !
छंदा बाळ कोणाकडे जाणार ? '—ऐकू येतात.
कोर्टातला कोलाहल—चपराशाची ' सायलेन्स ' म्हणून हाळी—हातोड्याचा ठकठक आवाज. हळूहळू प्रकाश. प्रेक्षकच न्यायाधीश आहेत. एका स्पॉटलाईटमध्ये आरोपीच्या पिंजऱ्यात छंदा उभी आहे. बाजूच्या स्पॉट लाईटमध्ये दोन वकील. राजा छंदाचा वकील म्हणून उभा आहे... ]

वकील ( बी. के. चा ) : न्यायाधीश महाराज, अशारीतीने एका कुलीन, अब्रूदार उद्योगपतीची अब्रू भर चव्हाट्यावर टांगूनही. . निव्वळ दोन लाख रुपये नाकारले, आणि स्वतःच्या नऊ महिन्यांचं...दुधाचं भांडवलं केलं...

...म्हणून समाजाची सहानुभूती जिंकून इथं उभी राहिलेली बाई—मुलावर स्वतःचा हक्क सांगत आहे...या मुलाची सारी जन्मकथा, जन्माची पूर्वपीठिका लक्षात घेतल्यावर, कोर्टाला फक्त एकच निर्णय घ्यायचा आहे. . .या मुलाची खरी जन्मदात्री कोण ?

—जिच्या शरीरातून त्यानं जन्म घेतला ती ?

—की, जिच्या इच्छेतून त्यानं जन्म घेतला ती ?

.. न्यायाधीश महाराज, सारी हकीकत समजून घेतलेल्या सगळ्या सुज्ञ माणसाचं यावर एकमत होईल...की, या मुलाचा जन्म, कोणा स्त्री देहावर नव्हे तर इच्छेवर अवलंबून होता.

शरीर ही गोष्टच या मुलाच्या जन्माबावत निरर्थक आहे. बी. के. सारखा उद्योगपती, जे कोणतं भाड्यानं मिळेल, असं कोणतंही स्त्री शरीर भाड्यानं घेण्यास समर्थ होता...छंदा मिळाली नसती...तर दुसरी कोणतीही स्त्री त्याने भाड्याने घेतली असती—

तेव्हा, कोणाच्या शरीरातून या मुलानं जन्म घेतला ही बाब निरर्थकच, तेव्हा मेडिकल रिपोर्टस्‌ना काहीही अर्थ नाही !

आता प्रश्न उरतो, वेदनेचा... त्रासाचा. न्यायाधीश महाराज, मी इथं सांगू इच्छितो की, बाईनं.. छंदानं—जेवढ्या शारीरिक वेदना सहन केल्या ...त्याहून जास्त वेदना, जास्त मानसिक क्लेश ऊर्मिला आणि बी. के. या जोडप्यानं सहन केल्या आहेत. आणि स्वतःच्या शारीरिक वेदनांची तर, पुरेपूर किंमत छंदानं ठरवून घेतली होती.

तिनं ही किंमत ठरवली, जी कोणतीही स्त्री, आई—ठरवणार नाही. कारण, तिला मूल नको तर पैसा पाहिजे होता. तिनं स्वतःचं शरीरच निव्वळ पैशासाठी भाड्यानं दिलं होतं...

थोडक्यात, ही बाई म्हणजे ह्युमन इन्क्यूबेटर आहे. ही बाई म्हणजे, निव्वळ एक सजीव.. चालती बोलती टेस्ट ट्यूब आहे—आणि न्यायाधीश महाराज, निव्वळ जन्म दिला म्हणून काही टेस्टट्यूब जन्मदात्री होत नाही ! आई होत नाही ! ! . शेवटी जिच्या इच्छेमुळे टेस्टट्यूबचा वापर होतो... तेच खरं मुलाचे आईबाप असतात—

तेव्हा आता तुम्हीच ठरवा, या मुलाची खरी जन्मदात्री कोण ?—मुलासाठी पतीला दुसरी स्त्री आणायला सांगणारी ऊर्मिला ?—का, पैशा-

साठी देवाशी लग्न होऊनही माणसाशी शरीराचा सौदा करणारी छंदिता ! या मुलाची खरी जन्मदात्री कोण ?

[ वकील खाली बसतो. त्याच्यावरचा स्पॉट डिम होतो. नि झगा सावरत राजा उभा राहतो. स्पॉट राजावर. ]

**राजा :** न्यायाधीश महाराज—मी कोणताही युक्तिवाद करायला उभा नाही. किंवा, या बाईची, छंदाची बाजू घेऊनही उभा नाही.—मी उभा आहे, ज्याला बोलता येत नाही—विचार करता येत नाही...अस्तित्वात असूनही या केसमध्ये ज्याची दखलही घेतली जात नाहीय, त्या तान्ह्या मुलासाठी ...छंदा बाळासाठी...ज्याच्या जन्माने एक मोठा प्रश्न उभा केला आहे.. ज्याचं उत्तर आपल्या आजच्या कायद्याच्या चौकटीत.. न्यायाच्या विचारात नाही...न्यायाधीश महाराज, हे मला पूर्णपणे मान्य आहे...की, छंदा ही एक बाजारू स्त्री आहे. पैशाच्या लोभानं तिनं आपलं शरीर... ह्यूमन इनक्यूबेटर म्हणून वापरायला दिलं...सन्माननीय वकीलसाहेबांच्या म्हणण्याप्रमाणे ती एक सजीव टेस्टट्यूब आहे...आणि इथेच एक मोठा प्रश्न उभा राहतोय. हा प्रश्न उभा राहतोय...हा प्रश्न छंदाचा नाही. बी. के.चा नाही. ऊर्मिलाचा नाही...तर भावी पिढ्यांचाय...मनुष्य समाजाचाय् ...न्यायाधीश महाराज, आज तुमच्यापुढे एक सजीव टेस्टट्यूब हक्क सांगत उभी आहे...पण उद्या जेव्हा टेस्टट्यूब बेबीचा शोध संपूर्ण यशस्वी होईल तेव्हा निर्जीव टेस्टट्यूबज तुमच्यापुढे येणार नाहीत आणि मग ?

मग न्यायाधीश महाराज, त्या टेस्टट्यूबचा वापर फक्त बी. के. ऊर्मिला सारखी निपुत्रिक जोडपीच वात्सल्यपूर्तीसाठी करणार नाहीत...तर प्रत्येक चांगल्या शोधाचा स्वार्थासाठी दुरुपयोग करणाऱ्या दुष्टशक्तीचाही वापर करतील...स्मगलर, गुंड, व्यापारी, सावकार, जमीनदार...तरुण मुलां-मुलींकडून रक्त विकत घेतल्याप्रमाणे त्यांची बीजं विकत घेतील...टेस्टट्यूब-मधून मुलं काढतील...ज्या मुलांना नसेल आई...नसेल बाप...असेल फक्त मालक !

गुलामांच्या पिढ्यांच्या पिढ्या तयार होतील !

न्यायाधीश महाराज, आज रक्तदान करायला परवानगी लागत नाही. उलट आपण प्रोत्साहन देतोय. पण उद्या 'वीर्यदान' करण्यासाठी प्रत्येक पुरुषाला सरकारकडनं नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट घ्यावं लागेल...नाहीतर गुलामांच्या पिढ्या तयार करण्यासाठी माणसांच्या वंशसातत्य राखण्याच्या शक्तीचा कच्चा माल म्हणून वापर केला जाईल...

न्यायाधीश महाराज, भविष्यातला हा धोका लक्षात घेऊन—आज

वर्तमानात या विचित्र केसचा—छंदावाळ प्रकरणाचा फैसला आपण करायचा आहे...मुलाची खरेदी विक्री आपणांस मान्य आहे का ?...लहान मूल विकत घेतलं काय, किंवा मुलाचा जन्म होण्यासाठी बाई भाड्याने घेतली काय ? फरक नाही ! या व्यवहारातही खरेदी-विक्री अंतर्भूत आहेच ! ती आपण मान्य करणार ?

न्यायाधीश महाराज, या तिन्ही माणसांच्या भावना खऱ्या आहेत...पण कायदा व्यक्तींच्या भावनांसाठी नाही. समाजाच्या स्थैर्यासाठी आहे. कायदा व्यक्तींचा दावा खरा खोटा करण्यासाठी नाही...समाजाचं भवितव्य ठरवण्यासाठी आहे.

न्यायाधीश महाराज, या तिन्ही दुर्दैवी माणसांच्यात 'व्हिलन' कोणीच नाही...आता तुम्ही व्हिलन बना...निर्णय कोणाच्याही बाजूने दिला तरी तो क्रूरच असणारयं...त्यात या बाजूचा नाहीतर त्या बाजूचा बळी जाणार ...तरीपण, असा क्रूर निर्णय द्या—फक्त यांच्यातला कोणीही बळी जावो... पुढल्या पिढ्या बळी जाणार नाहीत... समाजाचं भवितव्य धोक्यात येणार नाही...असा निर्णय द्या ...

अंधार

[ गलका वाढत जातो. ]

अंक तिसरा

प्रवेश चौथा समाप्त

## प्रवेश पाचवा

[ संध्याकाळची वेळ. उदास वातावरण. गाडी पोर्चमध्ये येऊन थांबल्याचा आवाज...ऊर्मिला व बी. के. येतात. वर निघून जाता जाता बहाद्दूरला हुकूम फर्मावतात. ऊर्मिलाच्या सुरात पराभव—बी. के. च्या सुरात संताप...बाळासाठी गुटी उगाळणारी म्हातारी माळीण सारे ऐकतीय.. ]

**ऊर्मिला :** बहाद्दूर, छंदा आली की वर ये छंदाचं सामान आणि बाळ तिच्या ताब्यात दे .

**बी. के. :** आणि एक मिनिट उभी करू नकोस तिला...लाथ घालून हाकलून लाव—पाणीदेखील देऊ नकोस...

[ दोघेही वर जातात. ]

**माळीण** : काय झालं रे बहाद्दूर ?

**बहाद्दूर** : निकाल साहेबांच्या विरुद्ध गेला.

**माळीण** : वाईट झालं रे...वाईट झालं.

**बहाद्दूर** : आजे, कोणाच्याही बाजूने निकाल लागला तरी तू हेच बोलणार-

**माळीण** : खरं रे, मी हेच बोलायची...बहाद्दूर, (या झाडाचं कलम त्या झाडावर करायचं...तर काम मायेनं, हलक्या हातानं करावं लागतं...मनं दुखावली की,...फुंकर घालून काम साधावं...कोर्टात जाऊन काय व्हायचं ? —फक्त निकाल लागायचा, याच्या नाहीतर त्याच्या बाजूचा...दोन्ही बाजू कधी खोट्या नसतात.) छंदा नाही आली बरोबर ?

**बहाद्दूर** : साहेबांनी पाणी द्यायला मना केलीय...ते काय तिला गाडीतनं घेऊन येणार ? येत असंल अनवाणी चालत...

[ बेल वाजते. उघड्या दरवाज्यात छंदा उभी असते. तिला पाहून बहाद्दूर निमूटपणे वर जातो. छंदा आत येते. अपराध्यासारखी मान खाली घालून उभी राहते. ]

**माळीण** : छंदा पोरी...जिंकून आलीस ना तू ?...मग अशी का उभीयस... हरल्यासारखी...

[ छंदा खालच्या मानेने गप्प उभी आहे. बॅगा घेऊन बहाद्दूर येतो. ]

**बहाद्दूर** : यात सगळे कपडेयत्. तुझे, बाळाचे...आईसाहेबांनी विचारलंय...

**छंदा** : ( खालच्या मानेने ) काय ?

**बहाद्दूर** : दोन झबली आठवण म्हणून ठेवून घेऊ का ?

[ छंदा नुसती होकारार्थी मान हलवते. बहाद्दूर झबली घेऊन वर जातो. बाळाला घेऊन खाली येतो.—मूल वेताच्या टोपलीत. बहाद्दूर मूल छंदाच्या ताब्यात देतो. छंदा एकदम गहिवरून, त्याचे पटापटा मुके घेते. ]

**बहाद्दूर** : बाईसाहेबांनी सांगितलंय—

**छंदा** : काय ?

**बहाद्दूर** : बाहेर थंडीय्...बाळाला पदराआड घे.

[ छंदा नुसती मान हलवते. बहाद्दूर निघून जातो. माळीण एकेक यक्ष प्रश्न तिला विचारायला लागते. ]

**माळीण** : छंदा पोरी, चांगलं झालं हो...तुला तुझं बाळ मिळालं.—पण बाळाचं घर गेलं ग—बाळाचं घर गेलं—

[ छंदा जड पावलांनी थबकते. ]

कुठं जाणार तू आता?—पुन्हा कोठ्यात?

**छंदा :** नाय!

**माळीण :** नकोच जाऊस हो. नकोच जाऊस! कोणत्याही पोराला ‘ रांडेचा ’ म्हटलेला आवडायचं नाही...मग जाणार कुठे तू आता?

**छंदा :** देवाच्या जगात—कुठंही.

**माळीण :** जग देवाचंय् ग  पण देव दगडाचा—उखाण्यात सांगायला गोड वाटतं...आभाळाचं छप्पर! पण त्याच्या खाली राहाता येत नाही हो. राहाता येत असतं तर, टिनाची छपरं कशाला बांधली असती माणसांनी?

[ छंदा निरुत्तर. ]

कामधंदा काय करणार? ( गुटी उगाळणे चालूच. )

**छंदा :** कुठंतरी मोलमजुरी!

**माळीण :** चांगली हो. श्रमाची, कष्टाची भाकरी खूप चांगली . पण छंदा पोरी...घाम गाळून पोटापुरती भाकरी मिळेल, बाळापुरतं दूध नाही मिळणार हो...दूध खूप महाग असतं. तू असं कर...भाताची पेज देत जा त्याला...

**छंदा :** अं?

**माळीण :** आता भाताच्या पेजेत दुधाचं बाळसं कुठलं असायला? बाळ हडकेल जरासा...पण जिवंत राहील हो. जिवंत राहील.

[ माळणीच्या आणि छंदाच्याही डोळ्यात पाणी, ] इथं बाळाचं बरं होतं हो, चांगलं औषध पाणी होतं...खुराक होता...सांभाळ होता...

[ छंदाचा पाय निघत नाहीय. ]

—शाळा शिकवणार ना मुलाला?

**छंदा :** शिकवीन.

[ ऊर्मिला येते. जिन्याशीच भिंतीवर मान टाकून उभी राहते. ]

**माळीण :** शिकव हो...शिकव. नाहीतर फुटपायरीवर राहाणारी मुलं आऊट लाईनला जातात. तूच म्हणाली होतीस म्हणून कळलं हो...चांगलं शिकव त्याला...चांगले संस्कार कर...आता तू करशील हो सगळं. खात्रीय माझी चांगल्या घरची शिकल्या सवरल्याली लेक तू...

[ छंदा निरुत्तर...सुन्न उभी ]—शाळेत नाव काय लावणार मुलाचं? —म्हणजे त्याचं नाव लावशील हो...बापाचं नाव काय लावणार? काहीही लाव...खोटं लाव—पण लाव हो...बापाचं नाव नसलं.... तर...

**छंदा :** तर काय?

**माळीण :** बापाशिवाय कोणतंच मूल जन्माला येत नाही हो जगात. पण नुसत्या

खऱ्या बापानं नाव नाकारलं की बेवारशी ठरतं. . तोही असाच टोपलीतून वाहत आला होता हो. सूर्याचा मुलगा. . . पृथ्वीने गिळला. दुर्दैवी ठरला.

[ बोलता बोलता गुटी वेगाने उगाळू लागते. नि मग संतापाने एकदम वाटी पालथी करते. ]

—आता उगाळून काय उपयोग ? तुझ्याच बाळासाठी उगाळत होते हो . . . म्हटलं थंडीवाऱ्याचे दिवस. . . तान्ह्या बाळाला नाही सोसवायचे. . . पण आता काय ? उन्हापावसातच वाढणार तो—

[ माळीण उठते. पदर खोवते. काठी हातात घेते—जाता जाता थबकून, ]

**माळीण :** ( तळतळून ) खरंच हो. . . कुलटा निघालीस. . वळणावर गेलीस. त्या देवानं काय चांगलं केलं तुझं ?—लग्न लावून मुरळी बनवलं. विटाळलं तुझं शरीर. . . कोठ्यात नेऊन ठेवलं तरी त्याला १०० रुपयांचा निवद दावलास. . . चांगला हार चढवलास. . . नारळ फोडलास. . . या देवमाणसाचा स्पर्श झाला तुला. आणि आई झालीस हो तू. विटाळलेला देह पवित्र झाला हो तुझा. मन निर्मळ आणि शुद्ध झालं . . शिळेची अहिल्या झालीस तू. . . वाटलं होतं. पहिलं मूल. . . फूल समजून पायी घालशील त्यांच्या, नि निघून जाशील. . . पण नाही हो, तुला फक्त तुझाच विचार, मुलाचा अजिबात नाही.

[ माळीण निघून जाते. भरल्या डोळ्यांनी छंदा वळते. ऊर्मिलाला पाहून जागीच थबकते. ]

**ऊर्मिला :** छंदा. . .

**छंदा :** तू ऽऽ ?

**ऊर्मिला :** चार महिने आम्ही तुझी बाळाची ताटातूट केली, तुला कसं वाटलं ?

**छंदा :** लई वाईट वाटलं मेमसाब.

**ऊर्मिला :** आता आमची. . . बाळाची तू कायमची ताटातूट करणार. आम्हाल कसं वाटेल ?

**छंदा :** ( गप्प ). . .

[ ऊर्मिला रुमालात बांधलेले नोटांचे पुडके समोर धरते. ]

**ऊर्मिला :** छंदा, हे पैसे. . . पूर्ण दोन लाख रुपये आहेत.

**छंदा :** ( तुटकपणे ) मला नगंत तुमचं पैसं.

**ऊर्मिला :** माहितीय ग. . . तुला पैशाची गरज नाही. पण बाळाला तर आहे ना ? त्याला भाताची पेज मानवणार नाही. थंडीवारा सोसणार नाही. . . [ बळजबरीने छंदाच्या बॅगेत पैसे ठेवते. ]

—घाबरू नकोस. सौदा करायला पैसे देत नाही मी भरपाई करायला

देतेय...

**छंदा** : कसली भरपाई ?

**ऊर्मिला** : खरी आई असून, अंगावर नाही पाजू शकले...बाहेरचं दूध तर दिलं पाहिजे त्याला—

**छंदा** : ( गप्प )

**ऊर्मिला** : एक सांगू तुला छंदा ?

**छंदा** : काय ?

**ऊर्मिला** : टोमॅटोला घेऊन कुठंतरी दूर निघून जा—अगदी दूर...जिथं कधी आम्ही येणार नाही. नाही तर—

**छंदा** : नाय तर काय मेमसाब ?

**ऊर्मिला** : नाही तर, रस्त्यावर भटकणारं प्रत्येक मूल आम्हाला आमचा टोमॅटोच वाटेल—आणि आम्ही वेडे होऊ ग—वेडे होऊ...

**छंदा** : ( गप्प )

**ऊर्मिला** : आणखी एक विनंती करू ?

**छंदा** : काय ?

**ऊर्मिला** : टोमॅटोला कधी खरं सांगू नकोस—त्याचा खरा बाप कोण, खरी आई कोण—नाही तर—

**छंदा** : नाय तर काय मेमसाब ?

**ऊर्मिला** : तू तुझ्या आईवडिलांना देतेस ना—तसाच तोही आम्हाला तळतळाट देईल—'सवताला वारस हवा, म्हून मला बेवारशी जनमाला घातला—किडे किडे पडून मरतील साले'...आणि खरंच खरंच आम्ही किडे पडून मरू ग...छंदा—आम्हाला काही अधिकार नव्हता ग याला जन्म द्यायचा...हारून असा रस्त्यावर सोडून द्यायचा.

**छंदा** : मेमसाब—

[ आणि एकदम हुंदका देत निघून जाते. ऊर्मिला दरवाजा बंद करून त्यावर डोके ठेवून मुसमुसू लागते. तोच संतापाने थरथरत वरून वी. के. येतो. ]

**वी. के.** : ऊर्मे, ऊर्मे...लॉकरमधले पैसे कुठायत ?

**ऊर्मिला** : ( डोळे पुसत ) सामानाबरोबर छंदाला दिले.

**वी. के.** : त्या --त्या रांडेला तू दोन लाख रुपये दिलेस ?

**ऊर्मिला** : तिच्यासाठी नाही रे...बाळासाठी दिले.

**वी. के.** : बेअक्कल...मूर्ख...गाढव आहेस तू गाढव...मूर्ख. तिला पक्कं माहीत होतं—बाळासाठी तू पैसे देशील. तिला आपला वीकपॉईन्ट कळत होता.

म्हणून तर बाजारबसवी एवढ्या तोऱ्यात उभी होती...दोन लाख रु। नाकारणारी बाई म्हणून पेपरात गाजत होती...साली हरामजादी, ३ ई झाल्याचं नाटक करत होती...तू पैसे दिले नसतेस—तर झक मारत पोराला टाकून गेली असती...ती रांड, आता माझ्या पैशाची कोठी बांधेल.. माझ्या पोराची काठी बनवेल. हलकट...नीच..

[ कुत्री एकदम भुंकतात. दरवाज्यावरची बेल वाजते. ]

कोण आलंय ?...हाकलून लाव...मला कोणा कोणाला भेटायचं नाही !

[ ऊर्मिला दरवाजा उघडते. वाऱ्याच्या झोताबरोबर मुलाचं रडणं—बी. के. टोपलीतल्या मुलाला पाहतो—एकदम जातो. मुलाला उचलून छातीशी धरत वेड्यासारखा हसू लागतो. ऊर्मिला बॅग उचलते. ]

**बी. के.** : ( हसत ) बघ—बघ—पळून गेली साली. पोराला सांभाळायची वेळ येताच पैसे घेऊन बाजारबसवी पोराला टाकून गेली...पैशासाठी नाना ढोंगं करणारी रांड साली—

**ऊर्मिला** : ( संतापून कडाडत ) बी. के. नको रे ..नको रे शिव्या देऊन तिला. ( खालच्या सुरात ) पैशाचा सौदा ठरवून तू एका रांडेला घेऊन आला होतास घरात—खरंय रे...पण जाताना...एका निपुत्रिक बाईची आपल्या तान्ह्या मुलाने ओटी भरून एक आई परत गेली ..कोणताही सौदा न करता...[ पैसे काढून बॅग खाली टाकते. ]

—हे तुझे पैसे बी. के.—एकदेखील नोट कमी नाहीए.

[ बी. के. सुन्न होऊन पाहत राहतो. अंधारू लागते. मूल एकदम कळवळून कळवळून रडू लागते. " केला हाताचा पाळणा " ओवी सुरू होते. शक्तिपात झाल्यासारखा एकदम बी. के. कोचावर बसतो. नि ओक्साबोक्शी रडू लागतो. ओवी वाढत जाते...हळू हळू पडदा. ]

**समाप्त**

IRBK-0118837

IRBK-0118837

म. ग्रं. ... वा. ...
वा. क्र. १८८३७ नों. क्र. १५७१७
वि. ...नाटक...

१४ मे १९६४.
सार्व. ग्रंथा.